



# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, शुक्रवार ३ एप्रिल २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०





# कोर्टाचा सवाल अन् भोंदू बाबा अशोक खरातने थेट हातच जोडले

## 8 एप्रिलपर्यंत पोलिस कोठडी

### मालमत्ता बळकावण्याचा कट अन बळजबरीने गर्भपाताचा SIT ला संशय




**नाशिक/प्रतिनिधी :** महिलांचे लैंगिक शोषण करणा-या अशोक खरात याच्या काळ्या कारनाम्यांचे धागेदोरे आता अधिक खोलवर जात आहेत. खरातवर असलेल्या प्रचंड रागामुळे आणि त्याच्या जीवाला असलेला धोका लक्षात घेता, आजची न्यायालयीन सुनावणी अत्यंत कडक बंदोबस्तात व्हिडिओ कान्फरन्सिंग द्वारे करण्यात आले. आज नाशिक जिल्हा सत्र न्यायालयात सुनावणी झाली. न्यायालयाने आरोपी अशोक खरात याला ८ एप्रिलपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. त्याच्या सुरक्षेच्या कारणास्तव SIT ने व्हीसीद्वारे हजर करण्याचा अर्ज केला होता, जो न्यायालयाने मान्य केला. न्यायालयात ही ऑनलाइन सुनावणी पार पडली. कोर्टरू ममध्ये यासाठी ४ स्क्रीन्स लावण्यात आल्या होत्या.

***आजच्या सुनावणीत काय घडले?***

सुनावणी सुरू झाल्यावर न्यायाधीशांनी अशोक खरात यांना नाव विचारले. आवाज कमी येत असल्याने न्यायाधीशांनी त्यांना मोठ्याने बोलण्यास सांगितले. त्यानंतर न्यायाधीशांनी विचारले, तुमचे वकील म्हणून भाटे वकील इथे बाजू मांडत आहेत, ते तुमचे वकील आहेत का? यावर अशोक खरात यांनी हो असे उत्तर दिले. सुनावणीच्या शेवटी न्यायाधीशांनी आरोपीला विचारले, तुम्हाला काही बोलायचे आहे का? यावर अशोक खरातने हात जोडून काही नाही असे सांगितले.

**कोर्टात काय घडलं?**

- आरोपीने पीडितेवर अत्याचार केल्याने ती गर्भवती राहिली.
- त्याने दिलेल्या गोळ्यांमुळे गर्भपात झाला.
- लग्नाचं आमिष दाखवून आणि मराणाची भीती घालून महिलेवर अत्याचार
- पीडितेच्या मुलांनाही धमकी दिली
- गोळ्या व औषध कुठून आणले, त्यात काय होते याचा तपास अद्याप बाकी आहे.
- आरोपी पीडितेकडून आधारकार्ड आणि पॅनकार्ड मागत होता, हे कशासाठी होते याचा तपास करायचा आहे.
- तपासासाठी ७ दिवसांची पोलिस कोठडी आवश्यक असल्याचे तपास अधिका-यांनी सांगितले.



## फरार बायको विरोधात लुकआऊट नोटीस, परदेशात पळून जाण्याचे सर्व मार्ग बंद

**नाशिक/प्रतिनिधी :** शेकडो महिलांचे लैंगिक शोषण केल्याच्या आरोपाखाली अटकेत असलेल्या नाशिकच्या भोंदूबाबा अशोक खरातविरोधात अत्याचार व फसवणुकीचे एकुण अकरा गुन्हे दाखल झाले आहेत. आज नाशिक कोर्टात झालेल्या सुनावणीत खरातला ८ एप्रिलपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. तर दुसरीकडे त्याची पत्नी कल्पना खरात ही फरार असून, एसआयटी पथक व शिर्डी पोलिसांकडून फरार असलेल्या कल्पना खरात हिचा शोध सुरू आहे. गेल्या दोन दिवसांपासून तिचा शोध सुरु असून ती पोलिसांच्या हाती लागलेली नाही. शिर्डी येथे भोंदू अशोक खरातसह त्याची पत्नी कल्पना खरातवर शेतक-यांची फसवणूक आणि बेकायदेशीर सावकारकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल होताच कल्पना खरात फरारी झाल्या. कल्पना खरात यांचा तपास लावण्यासाठी एसआयटी पथकाने त्यांच्या नाशिक येथील घरी धाड टाकली होती. मात्र तिथे त्या आढळून आल्या नाही. मात्र पथकाने त्यांचा मुलगा हर्षवर्धन खरातला ताब्यात घेत चौकशी केली. त्यानंतर त्याची सुटका देखील केली. दरम्यान या प्रकरणात आता नवी अपडेट समोर आली आहे. कल्पना खरात परदेशात पळून जाण्याची शक्यता लक्षात घेता शिर्डी पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. शिर्डी पोलिसांनी कल्पना खरात विरोधात लुकआउट नोटीस जारी केली आहे. त्यामुळे आता कल्पना खरात हिचा परदेशात पळून जाण्याचा मार्ग बंद झाला आहे.दरम्यान याआधी अशोक खरात याने देखील परदेशात पळून (पान २ वर)

## अशोक खरात रूपाली चाकणकरांच्या बहिणीच्या बँक खात्याचा नामिनी?

**नाशिक/प्रतिनिधी :** नाशिकचा भोंदू बाबा अशोक खरातविरोधात एका महिलेनं तक्रार दाखल केली होती, या तक्रारीनंतर त्याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आणि त्याला अटक करण्यात आली. एटीएसच्या चौकशीमध्ये आतापर्यंत अशोक खरात याचे अनेक कारनामे समोर आले आहेत. अशोक खरात याच्यावर अनेक गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, त्यातील काही गुन्हे हे महिलांवर अत्याचार प्रकरणात दाखल करण्यात आले आहेत, तर काही गुन्हे हे फसवणूक प्रकरणात दाखल करण्यात आले आहेत. त्यामुळे अशोक खरातच्या अडचणी वाढल्या आहेत. दरम्यान आता अशोक खरातबद्दल आणखी एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. या बातमीने मोठी खळबळ उडाली आहे. अशोक खरात प्रकरणात सर्वात मोठी अपडेट आहे. अशोक खरात याने अनेकांचे आधार कार्ड आणि पॅन कार्ड घेउन मोठा कारनामा केला आहे. काही पतसंस्था आणि समता पतसंस्थेत उघडण्यात आलेल्या शेकडो बँक खात्याचा खरात नामिनी असल्याची माहिती समोर येत आहे. धक्कादायक बाब म्हणजे सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार रु पाली चाकणकरांच्या बहिणीच्या नावाने देखील एक बँक खातं आहे, त्याचाही अशोक खरात हा नामिनी असल्याची माहिती सूत्रांकडून समोर आली आहे. या सर्व खात्यांच्या माध्यमातून अशोक खरात याने आतापर्यंत स्वतःच तब्बल १०० कोटी रु पयांहून अधिकचे आर्थिक व्यवहार केल्याची माहिती समोर येत आहे. समोर आलेल्या माहितीनुसार अशोक खरात हा स्वतःच हे सर्व बँक खाती हाताळत होता. त्याने या



बँक खात्याच्या माध्यमातून जवळपास १०० कोटी रु पयांहून अधिकचे आर्थिक व्यवहार केल्याची माहिती समोर येत आहे. कळस म्हणजे ज्या खात्यांना अशोक खरात हा नामिनी आहे, त्या सर्व खात्यांना अशोक खरात याचाच (पान २ वर)

## अशोक खरातच्या अटकेनंतर आता पुण्यातील भोंदू बाबा रडारवर



### शिवदत्त आश्रमाचे बिंग फुटले

**पुणे/प्रतिनिधी :** पुण्याच्या खेड तालुक्यातील चांडोली येथील शिवदत्त आश्रमात अध्यात्माच्या नावाखाली महिलांचे शोषण करणा-या नवनाथ गवळीवर गुन्हा दाखल झाला असून या धक्कादायक प्रकारामुळे परिसरात संताप व्यक्त होत आहे. सध्या राज्यात आध्यात्मिक गुरु च्या नावाखाली सर्वसामान्य भाविकांची फसवणूक करणा-या अशोक खरात या भोंदू बाबाची सातत्याने चर्चा सुरु आहे. त्यातच आता पुण्यातील खेड तालुक्यातून माणुसकीला काळिमा फासणारी एक घटना समोर आली आहे. चांडोली येथील शिवदत्त आश्रमात अध्यात्माचा बुरखा पांघरून महिलांचे शोषण करणा-या एका भोंदू बाबावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नवनाथ पंढरीनाथ गवळी असे या भोंदू बाबाचे नाव असून त्याच्या विरोधात राजगुरु नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र, गुन्हा दाखल होऊनही आरोपी अद्याप मोकाट असल्याने नागरिकांमधून संताप व्यक्त केला जात आहे.

**नेमके प्रकरण काय?**

पुण्यातील चांडोली परिसरात नवनाथ गवळी हा स्वतःला महाराज म्हणवून घेत शिवदत्त आश्रम चालवतो. परिसरात त्याला मामा या नावाने संबोधले जाते. पीडित महिलेने दिलेल्या तक्रारीनुसार, या आश्रमात दोष निवारण करण्याच्या बहाण्याने महिलांना बोलावले जाते. मी (पान २ वर)

## आज सोन्यात 3,263, चांदीत 13 हजारची घसरण

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** अमेरिका-इस्त्रायल आणि इराण यांच्यातील युद्धाच्या पार्श्वभूमीवर सोने-चांदीच्या दरात घसरण सुरूच आहे. इंडिया बुलियन अँड ज्वेलर्स असोसिएशन (IBJA) नुसार, गुरु वारी १० ग्रॅम २४ कॅरेट सोन्याचा भाव ५,३४६ रुपयांनी घसरून १.४६ लाख रुपयांवर आला आहे. यापूर्वी बुधवारी तो १.५१ लाखांवर होता.तर, एक किलो चांदीचा भाव १५,१७६ रुपयांनी घसरून २.२५ लाख रु पयांवर आला आहे, जो २५ मार्च रोजी २.४० लाख रु पयांवर होता. अमेरिका-इराण युद्धाच्या कारणामुळे सोने ३४ दिवसांत १३,५९० रु पयांनी आणि चांदी ४२,०४० रु पयांनी स्वस्त झाली आहे.



**वाहतूक आणि सुरक्षा:** एका शहरातून दुस-या शहरात सोने घेउन जाण्यासाठी इंधन आणि सुरक्षा खर्च लागतो, ज्यामुळे अंतर वाढल्यास दर वाढतात.

**खरेदीचे प्रमाण:** दक्षिण भारतात जास्त खप (सुमारे ४०ऽ) असल्यामुळे ज्वेलर्स मोठ्या प्रमाणात खरेदी करतात, परंतु सवलतीचा फायदा मर्यादित राहतो.

**स्थानिक ज्वेलर्स संघटना:** राज्य आणि शहरातील ज्वेलर्स संघटना स्थानिक मागणी-पुरवठ्याच्या आधारावर दर निश्चित करतात.

**जुना साठा आणि खरेदी किंमत:** ज्वेलर्सचा खरेदी दर ठरवतो की ते ग्राहकांना किती किमतीत विकतील.

**सोने सर्वोच्च पातळीवरून ३१ हजार स्वस्त झाले-** वर्षाच्या सुरु वातीला सोन्यात तेजी होती, परंतु अलीकडील आठवड्यांमध्ये नफावसुली आणि इराण युद्धामुळे घसरण झाली आहे.सोनेच्या तुलनेत चांदीमध्ये जास्त चढ-उतार दिसून आले आणि ती सर्वकालीन उच्चांकावरू न वेगाने खाली आली आहे.गेल्या ६३ दिवसांत चांदी १.६१ लाख स्वस्त झाली आहे.

## महिला आरक्षणावर संसदेत 16 एप्रिलपासून चर्चा

### लोकसभेच्या जागा 543 वरून 816 पर्यंत वाढवल्या जाऊ शकतात; अर्थसंकल्पीय अधिवेशनाचे 3 दिवसांचे सत्र

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** संसदेतील अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुस-या सत्राचे आजचे कामकाज पूर्ण झाले. सरकारने सध्याचे अधिवेशन पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यसभा आणि लोकसभा आता १३ दिवसांच्या विश्रांतीनंतर १६ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता पुन्हा एकत्र येतील. ३ दिवस चालणा-या या सत्रात महिला आरक्षण कायद्यातील सुधारणेशी संबंधित महत्त्वाच्या विधेयकावर चर्चा केली जाईल.खरं तर, सरकार लोकसभेतील जागांची संख्या वाढवण्यासाठी सुधारणा विधेयक आणण्याची योजना आखत आहे. सध्या लोकसभेत ५४३ जागा आहेत. प्रस्तावित ५०% वाढीसह जागांची संख्या ८१६ होईल, त्यापैकी २७३ (सुमारे एक तृतीयांश) जागा महिलांसाठी आरक्षित असतील.सरकारचा उद्देश 'नारी शक्ती वंदन अधिनियम' मध्ये सुधारणा करणे हा आहे. याद्वारे महिलांसाठी निश्चित केलेला कोटा परिसीमन प्रक्रियेपासून वेगळा करणे आहे. 'नारी शक्ती वंदन अधिनियम' २०२३ मध्ये मंजूर करण्यात आला होता.

**महिला आरक्षण कायदा संविधानाच्या १०६व्या दुरुस्तीच्या रूपात मंजूर झाला-** २०२३ मध्ये महिला आरक्षण कायदा संविधानाच्या १०६व्या दुरु स्तीच्या रू पात मंजूर झाला होता. यानुसार महिला आरक्षण नवीन जनगणनेनंतर लागू होणार आहे. आता सरकारचा प्रस्ताव आहे की नवीन जनगणनेची वाट पाहण्याऐवजी २०११ च्या जनगणनेच्या आकडेवारीच्या आधारावरच मतदारसंघांची पुनर्रचना (परिसिमन) केली जावी. यामुळे प्रक्रिया वेळेवर पूर्ण होउ शकेल आणि आरक्षण लागू करता येईल.

**२ विधेयक आणले जातील, एससी आणि एसटी कोटा असेल दोन विधेयके:** एका विधेयकाद्वारे नारी शक्ती वंदन अधिनियमात सुधारणा केली जाईल, तर दुसरे विधेयक परिसीमन कायद्यातील बदलांशी संबंधित असेल. हे मंजूर करण्यासाठी संसदेत दोन-तृतीयांश बहुमताची आवश्यकता असेल. याच कारणामुळे सरकार विरोधकांचा पाठिंबा मिळवण्याचा प्रयत्न करत आहे.

**आरक्षण:** प्रस्तावानुसार, महिलांसाठी २७३ जागा आरक्षित असतील. आरक्षणाची रचना अशी असेल की, ज्यात अनुसूचित जाती (SC) आणि अनुसूचित जमाती (ST) प्रवर्गातील महिलांना त्यांच्या कोट्यामध्ये वाटा मिळेल. ओबीसी महिलांसाठी सध्या स्वतंत्र तरतूद समाविष्ट नाही. याच सूत्रानुसार राज्यांच्या विधानसभांमध्येही जागा वाढवून महिलांसाठी आरक्षण लागू करण्याची योजना आहे, जेणेकरू न संपूर्ण देशात एकसमान रचना राहील. **काँग्रेससोबत चर्चा बाकी:** गृहमंत्री अमित शहा यांनी गेल्या काही दिवसांत यासाठी अनेक नेत्यांसोबत बैठका घेतल्या. यात वायएसआर काँग्रेस, समाजवादी पक्ष, (पान २ वर)



20 सप्टेंबर 2023: लोकसभेत 'नारी शक्ती वंदन अधिनियम' मंजूर झाल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महिला खासदारांसोबत फोटो काढला होता.

## प्रशासनात फेरबदल; कोल्हापूर,नागपूर, संभाजीनगरला मिळाले नवे जिल्हाधिकारी

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्य सरकारकडून गुरु वारी (ता.२ एप्रिल) पुन्हा एकदा प्रशासनात मोठे फेरबदल करण्यात आले आहे.सरकारने काढलेल्या आदेशात एकाचवेळी राज्यातील तब्बल २५ सनदी अधिका-यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. यात कोल्हापूर,नागपूर, छत्रपती संभाजीनगरला नवे जिल्हाधिकारी मिळाले आहेत.

मुंबई महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे विजय राठोड यांची कोल्हापूरचे नवे जिल्हाधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तर कोल्हापूर महानगरपालिकेचे नवे आयुक्त डा. राजेंद्र भारू ड तर आयुक्त मंजू लक्ष्मी यांची अतिरिक्त आयुक्त पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण येथे नियुक्ती करण्यात आली आहे. सांगली मनपाचे आयुक्त सत्यम गांधी यांची बदली झाली असून संजिता मोहापात्रा यांची नवे आयुक्तप्रदी नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच कोल्हापूरचे जिल्हाधिकारी अमोल येडगे हे छत्रपती संभाजी नगर महापालिकेचे आयुक्त म्हणून बदली करण्यात आली आहे. तसेच कोल्हापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी एस कार्तिकेन हे सोलापूरचे नवे जिल्हाधिकारी असणार आहेत.तर रत्नागिरीच्या सहाय्यक जिल्हा अधिकारी डॉ. जसस्मिन यांची कोल्हापूर जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नियुक्ती करण्यात आली आहे.




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारकडून राज्यातील आयपीएस आणि आयएएस अधिका-यांच्या बदल्यांचा धडाकाच लावला आहे. दोन दिवसांपूर्वीच महाराष्ट्राच्या प्रशासनातील एकाचवेळी १० ज्येष्ठ सनदी अधिका-यांच्या बदल्या करण्यात आल्या होत्या. त्यात मुख्यमंत्र्यांच्या अतिरिक्त मुख्य आयुक्त अश्विनी भिडे यांची मुंबई महापालिका आयुक्तप्रदी नियुक्ती करण्यात आली होती.तर भिडे यांच्या जागी १९९३ च्या बॅचच्या लोकेश चंद्रा यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका, हिवाळी अधिवेशन अशा विविध कारणांमुळे महाराष्ट्रात मागील ६ महिन्यांपासून सनदी अधिकारी आणि पोलीस खात्यातील अधिका-यांच्या बदल्या झाल्या नव्हत्या. त्यामुळे मार्च महिना संपतानाच या बदल्या होणार हे निश्चित मानले जात होते. त्यानुसार चार दिवसांपूर्वी (२८ मार्च) काही अधिका-यांच्या बदल्या झाल्या होत्या. त्यानंतर आज (३१ मार्च) मुख्यमंत्री कार्यालयापासून मुंबई महापालिका आयुक्तप्रदापर्यंतच्या सनदी अधिका-यांच्या बदल्या झाल्या आहेत.

लोकसभा निवडणुकीपूर्वी राज्यातील १७ अधिका-यांच्या बदल्या झाल्या होत्या. २०१४ च्या आयएएस बॅचचे अधिकारी व मूळचे कराड येथील असलेल्या अमोल येडगे यांची कोल्हापूरचे नवे जिल्हाधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली होती.

यापूर्वी त्यांनी नाशिक येथे सहायक जिल्हाधिकारी,आयटीडीपीचे प्रकल्प संचालक, अमरावती, बीड येथे त्यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून काम पाहिले होते. तसेच यवतमाळचे जिल्हाधिकारी म्हणूनही जबाबदारी सांभाळली होती.

**IAS बदली:**

**१. श्री विनय गौडा** जिल्हाधिकारी चंद्रपूर यांची जिल्हाधिकारी छत्रपती संभाजीनगर येथे बदली करण्यात आली आहे.

**२. डा.प्रविणकुमार देवरे** आयुक्त पशुसंवर्धन पुणे यांची जिल्हाधिकारी बुलढाणा येथे बदली करण्यात आली आहे. (पान २ वर)

## महाराष्ट्रातील जीएसटी महसुलात 12.6 टक्क्यांची वाढ

### राज्याच्या कर महसुलात विभागाचा दोन-तृतीयांश वाटा

**मुंबई/प्रतिनिधी :** वित्तीय वर्ष २०२५-२६ दरम्यान महाराष्ट्र राज्य जीएसटी विभागाने उल्लेखनीय महसूल कामगिरी नोंदवली आहे. वस्तू व सेवा कर (GST), मूल्यवर्धित कर (VAT) आणि व्यवसाय कर (PT) यांमधून एकूण २,५१,२५६ कोटी रु पयांचा महसूल प्राप्त झाला असून, मागील वर्षाच्या २,२३,०८७ कोटी रु पयांच्या तुलनेत १२.६ टक्के वाढ झाली आहे. राज्यांमधील जीएसटी महसूल संकलनात महाराष्ट्राने देशात अव्वल स्थान पटकावले असून, दुस-या क्रमांकाच्या राज्याच्या तुलनेत येथील महसूल दुपटीपेक्षा अधिक आहे. तसेच, राज्यातील जीएसटी महसूल वित्तीय वर्ष २०२४-२५ च्या तुलनेत १४.६ टक्क्यांनी वाढून १,८६,९९१ कोटी रु पयांपर्यंत पोहोचला आहे. राज्याच्या मजबूत अर्थव्यवस्थेचे प्रतिबिंब म्हणून जीएसटी महसुलातील ही वाढ देशातील उच्च वाढ दरांपैकी एक असून, ती राष्ट्रीय सरासरीपेक्षा जवळपास दुप्पट आहे. जीएसटी, व्हॅट आणि व्यवसाय कर मिळून महाराष्ट्राच्या राज्याच्या स्वमालकीच्या कर महसुलात (SOTR) सुमारे ६४ टक्के योगदान देतात, यावरून राज्य (पान २ वर)



## खरीप हंगामावर खतटंचाईचे सावट!; रसायनांच्या दरात 15 ते 50 टक्के वाढ

**मुंबई /प्रतिनिधी-** सध्या शेतक-यांवर चहूबाजूंनी संकट उभे ठाकले आहे. एल निनोमुळे वेळेत आणि पुरेसा पाउस पडेल का? खरीप हंगामातील पेरण्या वेळेत झाल्या तर खतांच्या वाढत्या किमती यामुळे बळिराजा चिंतेत आहे.आखाती युद्धामुळे जागतिक पातळीवर रासायनिक खतांची पुरवठा साखळी विस्कळीत झाल्याचा परिणाम जाणवत आहे. खते तयार करण्यासाठी लागणा-या विविध रसायनांच्या किमती १५ ते ५० टक्क्यांनी वाढल्या आहेत. आगामी खरीप हंगामावर खत टंचाईचे सावट निर्माण झाले आहे. होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होणारी वाहतूक बंद असल्यामुळे युक्रेन, रशिया, बेलारूस, कॅनडा आदी देशांतून होणारा रासायनिक खतांचा आणि खतांसाठी लागणा-या कच्च्या मालाचा पुरवठा बंद आहे. परिणामी सद्यस्थितीत युरियाची टंचाई जाणवत आहे. अन्य संयुक्त आणि मिश्र खतांची सध्या टंचाई नसली तरीही युद्ध लांबल्यास अन्य खतांची टंचाई आणि दरवाढ अटळ आहे. नत्रयुक्त खते तयार करण्यासाठी अमोनिया, नैसर्गिक वायू व नॅफ्थाची आवश्यकता असून, भारत हे घटक सौदी अरेबिया, कतार, संयुक्त अरब अमिराती व ओमानमधून आयात करतो. स्फुरदयुक्त खतांसाठी राक फास्फेट, फास्फोरिक ॲसिड, गंधकाची गरज असून, ही रसायने मोरोक्को, जार्डन, सेनेगल, (पान २ वर)

## गारपिटीमुळे रबी पिकांचे मोठे नुकसान

**मुंबई /प्रतिनिधी-** निसर्गाचा कोप थांबण्याचे नाव घेत नसून, बुधवारी साक्री आणि शिंदखेडा तालुक्यात पुन्हा एकदा अवकाळी पावसाने जोरदार धुमाकूळ घातला. सोसाट्याचा वारा, विजांचा कडकडाट आणि भीषण गारपिटीमुळे रबी पिकांचे कंबरडे मोडले असून, हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेल्याने शेतकरी पूर्णतः हवालदिल झाला आहे. निसर्गाचा कोप थांबण्याचे नाव घेत नसून, बुधवारी धुळे जिल्ह्याच्या साक्री आणि शिंदखेडा तालुक्यात पुन्हा (पान २ वर)



# अवैध जुगारावर गुन्हे शाखेची तीन ठिकाणी कारवाई

## ५ जण गजाआड

**अमरावती/प्रतिनिधीः-**

शहरात अवैध वरली–मटका आणि जुगार धंद्यांवर गुन्हे शाखेने एकाच वेळी तीन वेगवेगळ्या ठिकाणी धडक कारवाई करत मोठे रॅकेट उघडकीस आणले आहे. या कारवाईत एकूण ५ जणांना ताब्यात घेण्यात आले असून, ६,३४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अचानक झालेल्या या छापेमारीमुळे अवैध जुगार चालविणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. पोलीस आयुक्तांच्या स्पष्ट आदेशानंतर आणि मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे २ एप्रिल २०२६ रोजी नागपुरी गेट, बडनेरा आणि राजापेठ पोलीस ठाणे हद्दीत



समन्वय साधून ही कारवाई करण्यात आली. कमेला ग्राउंड परिसरात छापा टाकून बाबुराव महादेव तायडे (वय ७१, रा. हिरपूर, अकोला) आणि नुरुद्दीन उर्फ राजा निजामुद्दीन पठाण (वय ३८, रा. नागपुरी गेट, अमरावती) यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्या ताब्यातून ३,३८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून नागपुरी गेट पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

गवळीपुरा येथे करण्यात आलेल्या कारवाईत शेख आरीफ शेख हसन (वय ४०, रा. मोबीनपुरा) आणि शेख आरीफ शेख कासम नौरंगाबादी (वय ३२, रा. गवळीपुरा) यांना पकडण्यात आले. त्यांच्याकडून २,१३० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून बडनेरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच बेलपुरा गल्ली क्रमांक ३ येथे छापा टाकून गौतम मुकुटलाल दाधीच (वय ३९, रा. चिचफैल) याला ताब्यात घेण्यात आले असून एक आरोपी फरार आहे. येथे ८३० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

ही संपूर्ण कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनात, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, श्याम घुगे, रमेश धुमाळ तसेच सहाय्यक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे यांच्या देखरेखीखाली गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण व पथकाने केली. शहरात अवैध धंद्यांविरोधातील मोहीम अधिक तीव्र करण्यात येणार असल्याचे पोलिसांकडून स्पष्ट संकेत देण्यात आले आहेत.

# महानगरपालिका आयुक्तांच्या हस्ते संगणक विभाग प्रमुख डेंगरे यांचा गौरव



**अमरावती/प्रतिनिधीः-**

शासनाचा महत्त्वकांक्षी उपक्रम मुख्यमंत्री १५० दिवस ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत उत्कृष्ट कामगिरीबद्दल राज्यस्तरीय मूल्यमापनात अमरावती महानगरपालिकेने २९ महानगरपालिका मधून पाचवा क्रमांक पटकावला आहे. विशेष म्हणजे, विदर्भ व मराठवाडा विभागातून या मानाच्या यादीत स्थान मिळवणारी अमरावती महानगरपालिका ही एकमेव संस्था ठरली आहे. सदर स्पर्धेमध्ये आपले सरकार तक्रार निवारण पोर्टल व्हाट्सअप चॅटबोट महानगरपालिकेचे संकेतस्थळ, 'माय अमरावती अँप', शासकीय प्रक्रिया पुनर्रचना अंतर्गत सेवांचे डिजिटायझेशन व नवीन वेब पोर्टल्सची निर्मिती, मुख्यमंत्री डॅशबोर्ड सोबत इंटिग्रेशन, कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर ,ब्लॉकचेन तंत्रज्ञानाद्वारे परवाने व प्रमाणपत्रांची पडताळणी, GIS तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर यांचा समावेश आहे. मर्यादित संसाधनांमध्ये ही मोठ्या महानगरपालिकांशी स्पर्धा करत ई गव्हर्नन्स मध्ये उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी संगणक विभाग प्रमुख सिस्टीम मॅनेजर अमित डेंगरे व त्यांच्या चमूचे प्रशस्तिपत्र देऊन गौरव केला व उल्लेखनीय कामाबद्दल कौतुक करून पुढील भविष्याकरिता शुभेच्छा दिल्या. पुढेही नागरिक केंद्रित डिजिटल सेवा देण्याकरिता प्रयत्न करत राहू अशी आशा व्यक्त केली.

# उत्कृष्ट रिल निर्मात्यांचा सत्कार; मतदान जनजागृतीसाठी तरुणांचा गौरव

## -हर्षल प्रथम, कार्तिक काळबांडे व्दितीय व तनुश्री कडू तृतीय क्रमांकांचे मानकरी





अमरावती/प्रतिनिधी :-

अमरावती महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२० च्या अनुषंगाने शहरात व्यापक मतदार जनजागृती निर्माण करण्यासाठी तसेच मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी स्वीप विभागामार्फत विविध उपक्रम राबविण्यात आले. या उपक्रमांपैकी तरुणांमध्ये विशेष लोकप्रिय ठरलेली रिल स्पर्धा ही एक नाविन्यपूर्ण आणि प्रभावी संकल्पना ठरली.

डिजिटल माध्यमांचा वाढता वापर लक्षात घेता, सोशल मीडियाच्या माध्यमातून मतदानाबाबत जनजागृती करण्याचा उद्देश ठेवून या रिल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत शहरातील अनेक तरुण-तरुणींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून मतदानाचे महत्त्व, लोकशाहीतील नागरिकांची भूमिका आणि प्रत्येक मताचे मूल्य यावर आधारित आकर्षक, सर्जनशील आणि संदेशपूर्ण रिल्स तयार केल्या.

स्पर्धेत सादर झालेल्या रिल्सपैकी उत्कृष्ट रिल्सची निवड तज्ज्ञ समितीमार्फत करण्यात आली. निवड प्रक्रियेत संदेशाची परिणामकारकता, सर्जनशीलता, सादरीकरणाची पद्धत आणि जनजागृतीवर होणारा प्रभाव यांचा विचार करण्यात आला. विजेत्या स्पर्धकांचा गौरव करण्यासाठी पारितोषिक वितरण सोहळा आयोजित करण्यात आला.

या सोहळ्यात मनपा आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिक व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. आपल्या मनोगतात त्यांनी तरुणांनी अशा उपक्रमांमध्ये सहभागी होऊन समाजप्रबोधनात योगदान देणे ही अत्यंत सकारात्मक बाब असल्याचे नमूद केले. तसेच प्रत्येक नागरिकाने मतदानाचा हक्क बजावून लोकशाही बळकट करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

या स्पर्धेत दीक्षांत हर्षल मनोहरे यांनी प्रथम क्रमांक पटकावला, तर कार्तिक काळबांडे यांनी व्दितीय क्रमांक व तनुश्री धीरज कडू यांनी तृतीय क्रमांक मिळविला. जनजागृतीसाठी केलेल्या प्रयत्नांचे सर्व स्तरातून कौतुक करण्यात आले.

कार्यक्रमास अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, उपायुक्त नरेंद्र वानखडे, सिस्टीम मॅनेजर अमित डेंगरे, शिक्षणाधिकारी डॉ. प्रकाश मेश्राम तसेच शाळा निरीक्षक योगेश पखाले उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनीही या उपक्रमाचे कौतुक करत भविष्यात अशाच नाविन्यपूर्ण स्पर्धांद्वारे अधिकाधिक नागरिकांपर्यंत मतदानाचा संदेश पोहोचविण्याची गरज व्यक्त केली.

या रिल स्पर्धेमुळे शहरातील तरुणांमध्ये मतदानाबाबत जागरूकता निर्माण होण्यास मोठी मदत झाली असून, लोकशाही प्रक्रियेत नागरिकांचा सक्रिय सहभाग वाढविण्याच्या दृष्टीने हा उपक्रम प्रभावी ठरला आहे.

# १ व १० वरिल उर्वरित

### मद्यधुंद दुचाकीस्वारांमुळे

आलेल्या दुसऱ्या दुचाकीने त्यांच्या वाहनाला जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की दोन्ही दुचाकींचा अक्षरशः चक्काचूर झाला आणि चारही जण रस्त्यावर फेकले गेले. या अपघातात सलीम शहा, हमीदाबी नाजीम शहा, सतीश महादेवराव शेंदराम (वय २५, रा. मारोळ बिछवा, जि. पांढुर्णा, मध्य प्रदेश) आणि गोलू बाबू कुमरे (वय २८, रा. मारोळ बिछवा) हे चौघे गंभीर जखमी झाले आहेत. सर्वांना प्रथम वरुड उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र प्रकृती गंभीर असल्याने त्यांना अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयात हलवण्यात आले. त्यापैकी एका महिलेची प्रकृती अत्यंत चिंताजनक असल्याचे डॉक्टरांनी सांगितले आहे. प्राथमिक तपासात सतीश शेंदराम आणि गोलू कुमरे हे दोघे मद्यधुंद अवस्थेत दुचाकी चालवत असल्याची माहिती समोर आली आहे. त्यांच्या निष्काळजीपणा आणि भरधाव वेगामुळेच हा अपघात घडल्याचा आरोप प्रत्यक्षदर्शींनी केला आहे. घटनेची माहिती मिळताच शेंदुरजना घाट पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. जखमींचे जबाब नोंदवून पुढील तपास सुरू करण्यात आला आहे. मद्यधुंद वाहनचालकांविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

### चाकू हल्ल्यात दोघे जखमी

माहिती समोर आली आहे. शेख मुसे शेख लुकमान आणि दिलीप पवार असे हल्ल्यामध्ये गंभीर जखमी झालेल्या तरुणांची नावे आहे. माहितीनुसार शेख मुसेब शेख लूकमान (वय २४, सबा नगर मज्जिद जवळ) हे परिसरातून जात होते. त्यावेळी तिथे लपून बसलेल्या आरोपींनी त्यांच्यावर चाकूने हल्ला केला. या मध्ये ते गंभीर जखमी झाले आणि जमिनीवर कोसळले. तसेच दुस-या घटनेमध्ये दिलीप पवार (वय ४०) यांच्यावरही चाकूने हल्ला करण्यात आला आहे. दोघांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यांची प्रकृती गंभीर आहे. हा हल्ला कोणत्या कारणाने झाला हे अजून पर्यंत स्पष्ट झाले नाही. नागपूर गेट पोलिसांनी दोन्ही प्रकरणात गुन्हा दाखल करून आरोपींचा शोध सुरू केला आहे.

### चाकूचा धाक दाखवून ट्रकसह

मोठी गर्दी जमली होती. तपास पूर्ण होईपर्यंत आरोपीची नावे प्रसिद्ध करण्यात येणार नसल्याची माहिती लोहारा पोलिसांनी दिली आहे. दर्यापूर बाजार समितीत याआधी सुद्धा अशाप्रकारे चोरीचा किती शेतमाल विक्रीला आला याचा शोध आता बाजार समिती घेणार का, हे सुद्धा पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

### घरगुती गॅसचा तुटवडा,

डोळेझाक करत असल्याचे चित्र समोर येत आहे. पुरवठ्याचे योग्य नियोजन नसणे, वितरणातील अनियमितता आणि ग्राहकांना दिल्या जाणाऱ्या अपुऱ्या माहितीमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. 'गॅस येईल' या आशेवर दिवसभर थांबणाऱ्या नागरिकांच्या शेवटी निराशाच पदरी पडते. महिला, ज्येष्ठ नागरिक आणि कामगार वर्गाला या समस्येचा सर्वाधिक फटका बसत आहे. घरातील चुली थंड पडल्या असून, रोजच्या स्वयंपाकासाठी मोठी अडचण निर्माण झाली आहे. ही परिस्थिती केवळ प्रशासनाच्या आणि एजन्सीच्या निष्क्रियतेचे जिवंत उदाहरण नाही का?

याहून धक्कादायक बाब म्हणजे, अनेक वेळा एजन्सीकडे चौकशी केल्यास उडवाउडवीची उत्तरे दिली जातात. पारदर्शकतेचा पूर्ण अभाव आणि जबाबदारी टाळण्याची वृत्ती यामुळे नागरिकांमध्ये संताप उफाळून येत आहे. 'सिलेंडर आहे, पण वितरण नाही' अशी परिस्थिती निर्माण झाली असल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगू लागली आहे. प्रशासनाने या गंभीर प्रकाराकडे तातडीने लक्ष देऊन गॅस वितरण सुरळीत करणे अत्यावश्यक आहे. अन्यथा, नागरिकांचा उद्रेक कोणत्याही क्षणी रस्त्यावर उतरू शकतो. दर्यापूरकरांना त्यांच्या हक्काचा गॅस वेळेवर मिळणार का, की अशाच रांगांमध्ये उभे राहून अपमान सहन करावा लागणार याकडे स्थानिक अन्नपुरवठा प्रशासनाने गांभीर्य घेऊन ग्राहकांना घरपोच सिलेंडर मिळावे याकरिता शितल गॅस एजन्सी धारकाला समज द्यावी अशी मागणी दर्यापूर तालुक्यातील नागरिकांनी केली केली आहे.

### रघुवीर मिठाईच्या सातव्या

यांनी फित कापून प्रतिष्ठानचे उद्घाटन केले. यावेळी ५१ किलोचा गदेचा भव्य केक बनविण्यात आला होता. मुख्य अतिथी म्हणुन हंसाबेन दिलीप भाई पोपट, इंदिरा बेन प्रवीणभाई आडतीया, शिवलाल आडतिया, उद्योजक राजेश डागा, वरूण मालू ,जयराज बजाज, केशव डागा, डॉ. गोविंद कासट, निलेश भाई पोपट,प्रियेश पोपट उपस्थित होते. ६०० वर्ग फिट मध्ये मिठाई आणि बेकरी शोरूम स्थापित करण्यात आले आहे. यामध्ये मिठाई च्या व्यतिरिक्त नाश्ता आणि बेकरी प्रोडक्ट याची विशाल श्रृंखला उपलब्ध आहे. गेल्या ५५ वर्षापासून रघुवीर ग्राहकांच्या विश्वसनीयतेवर खरा ठरला आहे. प्रतिष्ठानची ही सातवी शाखा आता ग्राहकांच्या सेवेमध्ये आहे. यालाही ग्राहकांचा प्रतिसाद मिळणार असा विश्वास संचालकांनी व्यक्त केला आहे. यावेळी कुणाल आडतिया, पप्पू आडतिया, सचिन त्रिवेदी, किशोर गणात्रा, दिलीप भाई पोपट, नरेश पोपट, निलेश पोपट, चंद्रकांत पोपट, तेजस पोपट, मोहित पोपट, दिशा पोपट, राधा पोपट, मिस्टी पोपट, धवल पोपट सह शहरातील मान्यवर उपस्थित होते.

### धामणगावात हनुमान जयंती

जवळील हनुमान मंदिर, दत्तापूर येथील हनुमान मंदिर साईबाबा मदिरातील हनुमान मंदिर, पोलीस स्टेशन परिसरातील हनुमान मंदिर ,दिपोरी येथील मारुती मंदिर सह अनेक हनुमानरायाच्या मंदिरात जाऊन दर्शन घेतले. हनुमान चालिसा पठण, स्तोत्र पठण, महाआरती, महारुद्र अभिषेक या धार्मिक कार्यक्रमात भाजपा विधानसभा प्रमुख रावसाहेब रोठे तसेच नगराध्यक्ष अर्चना अडसड - रोठे ह्या सहभागी झाल्या होत्या.

### जळकापट येथे हनुमान जयंतीला

बैलाविना १० गाड्या ओढण्याचा थरार येथे पार पडला. १० पेक्षा अधिक बंडी गाड्या एकमेकांना साखळीने जोडून त्यावर २५ ते ३० भाविक बसविले होते. विशेष म्हणजे या गाड्या ओढण्यासाठी बैल किंवा कोणतीही यंत्रसामग्री वापरली जात नाही. तरी या गाड्या पुढे सरकत असल्याचा अनुभव उपस्थितांना येतो. गावकऱ्यांच्या श्रद्धेनुसार भगत पंडित दामाजी कंगाले यांच्या अंगात देवीचा संचार होते आणि त्यांच्या स्पर्शाने किंवा उपस्थितीनेस या जड गाड्या चालू लागतात.अनेक पिढ्या पासून सुरू असलेली ही परंपरा पाहण्यासाठी राज्य भरातून हजारो भाविक जळका पट येथे दाखल होतात. लक्ष्मी माता आणि तेलंगा माताच्या साक्षीने पार पडणारा हा सोहळा केवळ धार्मिक नसून सामाजिक एकतेचा संदेश देणारा ठरतो. यंदाही हा उत्सव शांततेत उत्साहात साजरा झाला. उत्सवाची सांगता महाप्रसादाने करण्यात आली. मात्र या अनोख्या परंपरेची आणि चमत्काराची चर्चा संपूर्ण परिसरात रंगलेली आहे.

### हनुमंत रायाच्या भक्तीत अंबानगरी

आले. प्रत्येक मंदिरात दर्शनासाठी भक्तांची गर्दी उसळली होती. हनुमान जयंती निमित्य शहरापासून तीन किलोमीटर अंतरावर असणाऱ्या चांगापूर मंदिर, रवी नगर येथील संकट मोचन हनुमान मंदिर, घंटाघर, पंचमुखी हनुमान मंदिर, पांढरी हनुमान मंदिर, जुनी टाकसाळ, मुधोळकर पेठ हनुमान मंदिर, तारखेडा येथील काळा मारुती, खरकाडी पुरा येथील गडीचा मारुती, धनराज लाईन, विलास नगर हनुमान मंदिर, अंजनीसुत हनुमान मंदिर, दसरा मैदान येथील संकट मोचन हनुमान मंदिर सह शहरातील सर्व मंदिरामध्ये भाविकांची गर्दी सकाळपासूनच पाहायला मिळाली. जागो जागी महाप्रसाद आयोजित करण्यात आला होता. ठिकाणीय मठ्ठा,पना,रसना, चणे, खिचडी वाटप करण्यात आली होती. हनुमानाच्या गजराने अंबानगरी दुमदुमली होती. शहरात सर्वत्र हनुमान जन्मोत्सवाची धूम पाहायला मिळाली.

**चांगापूरमध्ये रक्तदान शिबिर-** हनुमान जयंती निमित्त चांगापूर मंदिरामध्ये रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरामध्ये भक्तांनी रक्तदान करून सामाजिक दारित्व पार पडले. डॉ. पंजाबराव देशमुख ब्लड बँक व रक्तदान समितीच्या पदाधिकाऱ्यांनी सहकार्य केले.

### उडाणपुलाच्या कामात निष्काळजीपणा;

जवळ ही घटना घडली. यावेळी उडाणपुलाच्या बांधकामासाठी लावलेल्या लोखंडी प्लेटा काढण्याचे काम सुरू होते. कामादरम्यान एक लोखंडी प्लेट थेट ईश्वर भुरभुरे यांच्या डोक्यावर पडली आणि ते गंभीर जखमी झाले. तसेच त्यांच्यासोबतचा एक व्यक्तीही जखमी झाला. या घटनेनंतर ईश्वर यांचा उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

बांधकामस्थळी कोणतीही सुरक्षित उपाययोजना न करता आणि निष्काळजीपणे काम सुरू ठेवण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. याच हलगर्जीपणामुळे हा दुर्दैवी प्रकार घडल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी फिर्यादी जोत्सा अण्णाजी भुरभुरे (वय ३०, रा. दाभेरी) यांच्या जबाबावरून संबंधित ठेकेदाराविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून भारतीय न्याय संहिता कलम १०६(१) तसेच भादंवि कलम ३०४-अ अंतर्गत कारवाई सुरू करण्यात आली आहे. पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

### वर्षा लड्ढा महापालिका आयुक्त,

या प्रसूती रजेवर जात असल्याने त्यांच्या रिक्त जागी वर्षा लड्ढा यांची वर्णी लागली आहे. लड्ढा या सध्या पुणे येथील महाराष्ट्र कृषी संशोधन व शैक्षणिक परिषदेत सदस्य सचिव म्हणून कार्यरत होत्या. त्या महाराष्ट्र प्रशासन सेवेतील अनुभवी अधिकारी असून, त्यांना नुकतेच आयएएस केडरचे नामांकन मिळाले आहे.

जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता मोहपात्रा यांची सांगली मिरज कुपवाडा मनपा आयुक्त म्हणून बदली झाली आहे. तेथील मनपा आयुक्त सत्यम गांधी हे आता अमरावती जीपचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहणार आहे. तसेच शासनाने छत्रपती संभाजीनगर येथील जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांना अकोला महाराष्ट्र बीज महामंडळाचे संचालक म्हणून नियुक्त केले आहे. संचालक विनय गवडा यांच्या जागी त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. अधिकारी लवकरच आपला पदभार स्वीकारतील.

### सामूहिक अत्याचार प्रकरणातील

कृत्यांमुळे समाजातील कायदा व सुव्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. या प्रकरणातील सर्व आरोपींवर तात्काळ कारवाई करून त्यांना कठोरात कठोर फाशीची शिक्षा मिळावी. या घटनेमुळे महिला आणि तरुणीच्या सुरक्षेच्या प्रश्न उत्पन्न झालेला आहे.या प्रकरणाची जलदगती न्यायालयामार्फत सुनावणी करून पीडितेला लवकरात लवकर न्याय मिळावा तसेच महिलांच्या सुरक्षेसाठी शहरात अधिक प्रभावी उपाययोजना राबविण्यात याव्यात, तसेच भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी कडक पावले उचलण्यात यावीत, अशी मागणी करण्यात आली आहे.

यावेळी शहराध्यक्ष डॉ. नितीन धांडे, किरण पातुरकर, सुनील खराटे, ललित समदुरकर, नगरसेविका राधा कुरील, सुरेखा लुंगारे ,पंचफुला चव्हाण, मिलिंद बाबल, विनोद तानवैस, सुनील काळे, राजेश आखेगावकर, गजानन देशमुख ,सुनील साहू, मंगेश खोंडे, विकी शर्मा, सचिन नाईक ,सुधीर थोरात, प्रफुल बोके, सुनील मालोदे ,अशोक नागवानी, पंकज गुप्ता, जुगल ओझा ,श्रीकांत धानोरकर, माया चौहान, संजय शादी, सुधीर रोहनकर, गजानन चिंचोलकर, आकाश पाटील, संजय चव्हाण, शुभम सोनटक्के, अमित कुलवंत, जय राजे, अंकेश वर्मा, अनमोल गुप्ता, प्रसन्न मार्कंडेय, प्रवीण उईकेसह भाजपा पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

### अशोक खरातच्या अटकेनंतर

जेव्हा आश्रमात गेली, तेव्हा आरोपी गवळीने तिच्यासोबत अश्लील चाळे करून विनयभंग केला. इतकेच नव्हे तर, अध्यात्माच्या नावाखाली शारीरिक संबंधांची मागणी करून मानसिक व शारीरिक छळ केल्याचा आरोपही पीडितेने केला आहे.

**पतीने दिला आधार, मग फुटलं वाचा**

सुरु वातीला आरोपीच्या भीतीपोटी पीडितेने हा प्रकार कोणालाही सांगितला नाही. मात्र, आरोपीचा त्रास वाढल्याने तिने धाडस करून आपल्या पतीला सर्व हकीकत सांगितली. पतीने तिला पूर्ण पाठिंबा देत पोलीस तक्रार करण्यास प्रवृत्त केले. पीडितेच्या तक्रारीनंतर राजगुरु नगर पोलिसांनी तातडीने विनयभंगाचा गुन्हा दाखल केला आहे. ज्या पद्धतीने माझ्यासोबत अश्लील प्रकार करण्याचा प्रयत्न झाला, तसा तो इतर कोणत्याही महिलेसोबत होउ नये. या भोंदू बाबावर कडक न्यायालयीन कारवाई झालीच पाहिजे. गुन्हा दाखल होउनही तो अजून बाहेर कसा?, असा सवाल पीडित महिलेने उपस्थित केला आहे.

**पोलीस तपासावर प्रश्नचिन्ह-** दरम्यान एकीकडे भोंदू बाबांविरोधात कडक कायदे असताना दुसरीकडे राजगुरु नगर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद होउनही आरोपी अद्याप फरार आहे. आरोपीला अटक करण्यास विलंब होत असल्याने पोलिसांच्या कार्यक्षमतेवर स्थानिक प्रश्नचिन्ह उपस्थित करत आहेत. या प्रकरणाचा अधिक तपास पोलीस करत असून, आरोपीचा शोध घेण्यासाठी पथके रवाना करण्यात आली आहेत.

### फरार बायको विरोधात

जाण्याचा प्रयत्न केला होता. मात्र पोलिसांनी तो हाणून पाडला होता. आता त्याची पत्नी कल्पना खरात परदेशात पळून जाण्याची शक्यता लक्षात घेता पोलिसांनी आधीच तीचे मार्ग बंद केले आहेत. दरम्यान पोलिसांनी लुकआउट नोटीस जारी केल्यामुळे देशातील सर्व विमानतळांवर कल्पना खरातची माहिती देण्यात आली आहे. तिच्या परदेश प्रवासावर पूर्णपणे बंदी आली आहे. पोलिसांनी तिची सर्व बाजूंनी नाकेबंदी केली असून कोणत्याही मार्गाने ती देश सोडून पळून जाणार नाही याची दक्षता घेतली आहे. त्यामुळे या लुकआउट नोटीसमुळे फरार कल्पना खरात यांच्या मुसक्या आवळण्यासाठी पोलिसांना मोठी मदत होणार आहे.

### अशोक खरात रूपाली चाकणकरांच्या

मोबाईल नंबर लिंक आहे. दरम्यान या प्रकरणात आता दोन पतसंस्थेच्या चेअरमन आणि मॅनेरजची एसआयटीने चौकशी केली आहे. अशोक खरात याच्यासोबत रुपाली चाकणकर यांचे काही फोटो समोर आले होते. या फोटोंमुळे चाकणकर या चांगल्याच अडचणीत सापडल्या, अखेर त्यांनी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. दरम्यान त्यानंतर आता सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार चाकणकर यांच्या बहिणीच्या नावाने असलेल्या बँक अकाउंटचा खरात नामिनी असल्याची माहिती समोर येत आहे.

### महिला आरक्षणावर संसदेत

राष्ट्रवादी काँग्रेस (एसपी), आरजेडी आणि एआयएमआयएमच्या नेत्यांचा समावेश होता. बीजेडी आणि शिवसेना (यूबीटी) यांच्याशीही चर्चा झाली. महिला आरक्षण विधेयक कायदा बनला नाहीः महिला आरक्षण कायदा २०२३ मध्ये संविधानाच्या १०६ व्या दुरु स्तीच्या रूपात मंजूर झाला होता. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी याला मंजुरी दिली आहे. लोकसभेत हे विधेयक जवळपास एकमताने आणि राज्यसभेत एकमताने मंजूर झाले होते. मात्र, हा कायदा अजून लागू झालेला नाही. तो लागू होण्याची तारीख केंद्र सरकार अधिसूचनेद्वारे निश्चित करेल आणि गरज पडल्यास संसद यात सुधारणा करू शकते.

### प्रशासनात फेरबदल; कोल्हापूर,नागपूर,

३. डा.किरण पाटील जिल्हाधिकारी बुलढाणा यांची आयुक्तपशुसंवर्धन पुणे येथे बदली करण्यात आली आहे.

४. श्री दीपक सिंगला अतिरिक्त आयुक्त पीएमआरडीए पुणे यांची मनरेगा आयुक्तनागपूर येथे बदली करण्यात आली आहे.

५. डा. भारत बस्तेवाड आयुक्तमनरेगा नागपूर यांची लातूरच्या जिल्हाधिकारी येथे बदली करण्यात आली आहे.

६. डा.विजय राठोड जाइंट सीईओ एमआयडीसी मुंबई यांची कोल्हापूरच्या जिल्हाधिकारी येथे बदली

७. डा. मंगेश गोंदवले एमडी महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मुंबई यांची जिल्हाधिकारी गोंदिया येथे बदली करण्यात आली आहे.

### महाराष्ट्रतील जीएसटी महसुलात

जीएसटी विभागाची वित्तीय बळकटीत असलेली महत्त्वपूर्ण भूमिका अधोरेखित होते. विभागाने सलग चौथ्या वर्षी आपला अर्थसंकल्पीय अंदाज (एक) ओलांडत १००.२ टक्के लक्ष्य साध्य केले आहे. जीएसटी दर संयुक्तिकरणामुळे निर्माण झालेल्या काही अडचणींनंतरही विभागाने सातत्यपूर्ण प्रयत्न आणि सुधारित अनुपालनाच्या जोरावर या आव्हानांवर मात करत १४.६ टक्क्यांची भक्कम वाढ नोंदवली आहे. जीएसटी व्यवस्थेअंतर्गत झालेली ही मजबूत वाढ दर संयुक्तिकरणानंतर वाढलेल्या देशांतर्गत उपभोगामुळे तसेच कर प्रशासनाच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे शक्य झाली आहे. महाराष्ट्र राज्य जीएसटी विभागाने डेटा-आधारित अभिप्राय यंत्रणा, प्रगत विश्लेषणावर आधारित अंमलबजावणी, उच्च जोखमीच्या करदात्यांवर अधिक लक्ष, तसेच प्रामाणिक करदात्यांसोबत सातत्यपूर्ण संवाद यांसारख्या विविध सुधारणा उपाययोजना राबवल्या आहेत. यासोबतच, ईज ऑफ डुईंग बिझनेस (Ease of Doing Business) सुधारण्यावरही विभागाचा सातत्याने भर असल्याची माहिती विभागामार्फत देण्यात आली आहे.

### खरीप हंगामावर खतटंचाईचे सावट!;

ट्युनिशिया, सौदी अरेबिया, यूएईमधून तर पालाशयुक्त खतांसाठी म्युरेट ऑफ पोटॅशची आवश्यकता असल्याने ते कॅनडा, रशिया, बेलारूस, इस्त्रायल व जार्डनमधून आयात केले जाते. या रसायनांच्या वाहतुकीचा मार्ग होर्मुझ खाडी असून, युद्धामुळे ही खाडी पूर्णपणे बंद आहे.

### गारपिटीमुळे रबी पिकांचे

एकदा अवकाळी पावसाने जोरदार धुमाकूळ घातला.

सोसाट्याचा वारा, विजांचा कडकडाट आणि भीषण गारपिटीमुळे रबी पिकांचे कंबरडे मोडले असून, हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेल्याने शेतकरी पूर्णतः हवालदिल झाला आहे.शेणपूर, मलांजन, सामोडे आणि कासारे परिसरात पावसाने रौद्र रूप धारण केले. शेणपूर येथील डाळिंब उत्पादक आकाश काकुस्ते यांच्या ७ एकर क्षेत्रातील बागेचे अतोनात नुकसान झाले आहे.ग

### शासनाने तातडीने पंचनामे करावेत!

साक्री आणि शिंदखेडा तालुक्यात बुधवारी झालेल्या भीषण गारपिटीमुळे रबी पिकांचे मोठे नुकसान झाले असून शेतकरी पूर्णतः हवालदिल झाला आहे. शेणपूर येथील ७ एकर डाळिंब बागेसह कासारे परिसरातील टरबूज व पपईची पिके पूर्णपणे उद्ध्वस्त झाल्याने पंचनामे करण्याची मागणी होत आहे.

# जनमाध्यम

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ शुक्रवार, ३ एप्रिल २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

एक प्रतिष्ठित सवय

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# दीर्घ विश्रांतीनंतर पेट्रोल डिझेलच्या 'रॉयल' माफियाची पुन्हा दमदार एन्ट्री!

## काटेपूर्णात पेट्रोल–डिझेलचा उघड काळाबाजार पूर्वरत सुरू ; बोरगाव मंजू पोलिसांची 'मूक' साथ ?

■ समीर ठाकूर ■

**अकोला :** कायदा, नियम आणि प्रशासनाला सरळ आव्हान देत काटेपूर्णा येथे पेट्रोल-डिझेलच्या काळयाबाजाराचा 'रॉयल' खेळ पुन्हा जोमात सुरू झाला आहे. अकोला-मूर्तिजापूर राष्ट्रीय महामार्गावरील एका ढाब्यावर दिवसाढवळ्या पेट्रोल पंपासारखी यंत्रणा उभी करून हजारो लिटर इंधनाची बेकायदेशीर विक्री केली जात असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. विशेष म्हणजे, हा सगळा प्रकार उघड्यावर सुरू असताना संबंधित यंत्रणा मात्र संशयास्पद शांतता बाळगत असल्याने 'मूक' संमतीचा आरोप अधिकच गडद होत आहे.

**गुजरात यंत्रणेची कारवाई ; तरीही माफिया निर्धास्त**

याच ठिकाणी यापूर्वी एका टँकरमधून तब्बल हजारो लिटर पेट्रोल काढल्याचा प्रकार उघडकीस आला होता. या घटनेने गुजरात प्रशासनालाही हादरवले होते. त्यांनी थेट अकोल्यात येऊन सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तपास केला, झडती घेतली आणि संबंधितांवर कारवाई केली. लाखोंचा दंड, गुन्हे दाखल—सगळं होऊनही हा 'रॉयल' माफिया पुन्हा पूर्ववत सक्रिय होणे, हे प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उभे करणारे आहे. तर या गोरखधंद्यात भागीदार असलेला ' गजू ' आजही गुजरात न्यायालयाच्या चकरा मारीत आहे, हे विशेष !



**प्रशासन गप्प का? 'रॉयल' माफियाच्या मागे कोण?**

उघडपणे सुरू असलेल्या या काळाबाजाराकडे संबंधित यंत्रणा जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहे का? 'रॉयल' माफियाच्या मागे कोणाचे पाठबळ आहे? हे प्रश्न आता जनतेतून जोरात विचारले जात आहेत. काटेपूर्णातील हा प्रकार केवळ एका ढाब्यापुरता मर्यादित नसून, संपूर्ण व्यवस्थेतील निष्काळजीपणा उघड करणारा आहे. नागरिकांमध्ये प्रचंड संताप असून, तात्काळ कठोर कारवाईची मागणी होत आहे. आता तरी प्रशासन या 'रॉयल' माफियावर धडक कारवाई करणार का, की 'मूक' संमतीचे सावट कायम ठेवणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून या भागात पेट्रोल-डिझेल तस्करीचे जाळे कार्यरत आहे. दरम्यान, जिल्हा पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांनी पदभार स्वीकारल्यानंतर त्यांच्या धडाकेबाज कारवाईच्या भीतीने 'रॉयल' माफियाने काही काळासाठी भूमिगत होत बिळात घुसणे पसंत केले होते. मात्र, हा केवळ 'वादळापूर्वीची शांतता' ठरली. १ एप्रिलपासून या माफियाने पुन्हा आपले जाळे सक्रिय करत काळाबाजाराचा धंदा पूर्ववत सुरू केल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांकडून मिळत आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, यंत्रणेतल्या काही 'आतील हातां'शी साटेलोटे करून हा धंदा नव्याने उभा करण्यात आला आहे.

टँकर चालकांशी थेट संगनमत साधून इंधन काढणे, ते ढाब्यावर साठवणे आणि नंतर खुलेआम विक्री करणे—हा संपूर्ण व्यवहार इतक्या बिनधास्तपणे सुरू आहे की जणू काही याला अधिकृत परवानगीच मिळालेली आहे! इतकेच नव्हे, तर 'धंदा पुन्हा सुरू झाला आहे, निर्धास्तपणे थांबा' असा उघड संदेश चालकांपर्यंत पोहोचवण्यात आल्याची माहिती आहे. हा प्रकार केवळ बेकायदेशीर नाही, तर शासनाच्या महसुलावर कोट्यवधींचा डल्ला मारणारा आहे. त्याचबरोबर निकृष्ट किंवा मिसळयुक्त इंधनामुळे वाहनधारकांची फसवणूकही होत असल्याची शक्यता नाकारता येत नाही. तरीही प्रशासनाची निष्क्रियता अनेक प्रश्न उपस्थित करत आहे.

**दररोज हजारो लिटरचा काळाबाजार**

काटेपूर्णा येथील या ठिकाणी दररोज अंदाजे ५ ते ६ हजार लिटर पेट्रोल-डिझेलची बेकायदेशीर विक्री होत असल्याची माहिती आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणावर इंधन विक्री होत असताना महसूल विभाग, पुरवठा विभाग किंवा पोलिस यंत्रणा यांना याचा पत्ताच नाही का, असा संतप्त सवाल नागरिक करत आहेत.

**शेतात गुप्त गोडाऊन; कोट्यवधींचा साठा दडवला?**

या माफियाने पातूर-नंदापूर रोडलगत शेतशिवारात भलेमोठे गोडाऊन उभारून पेट्रोल-डिझेलचा साठा करून ठेवला असल्याची माहिती समोर आली आहे. येथे कोट्यवधी रुपयांचे इंधन साठवले असल्याचा संशय असून, झडती घेतल्यास मोठा साठा उघडकीस येऊ शकतो. याठिकाणी इथेनॉलचा देखील मोठ्या प्रमाणात साठा असल्याची चर्चा आहे, ज्यामुळे मिसळयुक्त इंधन विक्रीचा प्रकारही घडत असल्याची शक्यता वर्तवली जात आहे.

---

## सुशील मालवी यांना ध्येय एज्युकेशनचा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार



■ प्रतिनिधी | मालेगाव ■

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोळगाव खुर्द ता.मालेगाव येथील प्राथमिक शिक्षक सुशील विजय मालवी यांना ध्येय एज्युकेशन फाउंडेशन महाबळेश्वर,जि.सातारा यांच्या वतीने दिला जाणारा सन २०२५-२६ यावर्षीचा आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. दि. २९ मार्च रोजी ग. दि. माडगूळकर नाट्यगृह निगडी,पिंपरी चिंचवड,जि.पुणे येथे ध्येयतरंग व ध्येय एज्युकेशन समिट हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात राज्यभरातून शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या शिक्षकांना प्रोत्साहित करण्याचे उद्देशाने संस्था अध्यक्ष सुदाम शेंडगे यांनी या भव्य समारंभाचे आयोजन केले होते. वेगवेगळ्या जिल्ह्यातील विविध शिक्षकांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार बहाल केला गेला.

## तुलंगा बु. येथे घरफोडी; आरोपी अटकेत

### चान्नी पोलिसांची कारवाई : सोने-चांदीचे दागिने जप्त

■ प्रतिनिधी | खेट्री ■

चान्नी पोलीस स्टेशन हद्दीतील तुलंगा बु. येथे झालेल्या घरफोडी प्रकरणाचा उलगडा करत पोलिसांनी अवघ्या आठवड्यात आरोपीला अटक केली. अजय भारत डाखोरे (वय २०, रा. बार्शीटाकळी) असे अटकेतील आरोपीचे नाव असून, त्याच्याकडून चोरीस गेलेले सोने-चांदीचे दागिने जप्त करण्यात आले आहेत.



याबाबत अधिक माहिती अशी की, तुलंगा बु. येथील बेबीबाई गणेश हातोले यांचे कुटुंब २२ ते २७ मार्चदरम्यान उपचारासाठी नागपूर येथे गेले होते. यावेळी घराला कुलूप असल्याचा फायदा घेत अज्ञात चोरट्यांनी घर व कपाटाचे कुलूप तोडून सुमारे १ लाख ५३ हजार रुपयांचे सोने-चांदीचे दागिने लंपास केले होते.


या घटनेची तक्रार मिळताच चान्नी पोलिसांनी तपासाची सूत्रे वेगाने फिरवली. गुप्त व तांत्रिक माहितीच्या आधारे १ एप्रिल रोजी बार्शीटाकळी येथून सापळा रचून आरोपी अजय डाखोरे याला ताब्यात घेण्यात आले. कसून चौकशीदरम्यान त्याने घरफोडीची कबुली दिली. पोलिसांनी त्याच्याकडून चोरीस गेलेले दागिने जप्त केले आहेत. २ एप्रिल रोजी आरोपीला पातूर येथील न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्याला न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अप्पर पोलीस अधीक्षक चंद्रकांत रेड्डी, बाळापूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी गजानन पडघन यांच्या मार्गदर्शनाखाली चान्नीचे ठाणेदार रवींद्र लांडे, उपनिरीक्षक विजय घुगे व त्यांच्या पथकाने केली. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

> तुलंगा बु. येथील घरफोडी प्रकरणात गुप्त व तांत्रिक माहितीच्या आधारे आरोपीला बार्शीटाकळी येथून अटक करण्यात आली. आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली असून त्याच्याकडून चोरीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. न्यायालयाने त्याला कोठडी सुनावली आहे.
>
> **रवींद्र लांडे,** ठाणेदार, चान्नी पोलीस स्टेशन

## कृषी विभागामार्फत विविध पुरस्कार आता ऑनलाईन पध्दतीने स्विकारणार : कृषि मंत्री

■ प्रतिनिधी | वाशिम ■



कृषी विभागामार्फत देण्यात येणाऱ्या विविध पुरस्कार प्रस्तावांची प्रक्रिया अधिक सुलभ, वेळबद्ध, पारदर्शक व प्रभावी करण्याच्या दृष्टीने कृषी विभागामार्फत पुरस्कार प्रस्ताव ऑनलाईन स्वरूपात स्वीकारण्यासाठी स्वतंत्र संगणकीय प्रणाली विकसित करण्यात आलेली आहे. सदर प्रणाली कृषी विभागाच्या संकेतस्थळावर (https://krishi.maharashtra.gov.in) कृषी पुरस्कार टॅब मध्ये उपलब्ध आहे.सन २०२५ करीता विविध कृषी पुरस्कार बाबतचे अर्ज ऑनलाईन संगणक प्रणालीद्वारे सादर करण्यास कृषी विभागाकडून मुदतवाढ देण्यात आलेली असून अंतिम मुदत दि.१५ एप्रिल २०२६ करण्यात येत आहे .तरी इच्छुक शेतकऱ्यांनी अर्ज करावेत असे आवाहन कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी केले आहे.


महाराष्ट्र राज्य हे कृषि उत्पादन व कृषि उद्योग क्षेत्रात देशात अग्रगण्य राज्य म्हणून ओळखले जाते. राज्यामध्ये दरवर्षी शेती व पूरक क्षेत्रात अतुलनीय व उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकरी, महिला, व्यक्ती तसेचसंस्थांचा सन्मान महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत करण्यात येतो. यामध्ये डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न,वसंतराव नाईक कृषिभूषण,जिजामाता कृषिभूषण, वसंतराव नाईक शेतीमित्र, वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी, उद्यानपंडित पुरस्कार, कृषिभूषण (सेंद्रिय शेती), युवा शेतकरी पुरस्कार तसेच कृषी विभागातील अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठीचा पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी सेवारत्न पुरस्कार इत्यादी पुरस्कारांचा समावेश आहे. हे पुरस्कार माननीय राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते प्रदान करून संबंधितांना सन्मानित करण्यात येते. यापूर्वी विविध कृषी पुरस्कारांचे प्रस्ताव चार प्रतींमध्ये ऑफलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येत होते.प्रस्ताव बनविण्यासाठी व आवश्यक कागदपत्र जमा करणेसाठी होणारा त्रास व लागणारा खर्च यामुळे सर्व इच्छुक शेतकरी अर्ज करू शकत नव्हते. या पारंपारिक पद्धतीमुळे प्रस्ताव सादरीकरण,पडताळणी व संकलनासाठी अधिक कालावधी लागत होता. या पार्श्वभूमीवर पुरस्कार प्रस्तावांची प्रक्रिया अधिक सुलभ, वेळबद्ध, पारदर्शक व प्रभावी करण्याच्या दृष्टीने कृषी विभागामार्फत पुरस्कार प्रस्ताव ऑनलाईन स्वरूपात स्वीकारण्यासाठी स्वतंत्र संगणकीय प्रणाली विकसित करण्यात आलेली आहे. सदर प्रणाली कृषी विभागाच्या संकेतस्थळावर (https://krishi.maharashtra.gov.in) कृषी पुरस्कार टॅब मध्ये उपलब्ध आहे. सदर संगणकीय प्रणालीच्या माध्यमातून पुरस्कार प्रस्ताव सादरीकरण, तपासणी, मूल्यांकन तसेच अहवाल निर्मिती ही संपूर्ण प्रक्रिया डिजिटल स्वरूपात राबविणे शक्य होणार आहे.

## क्रांतीसूर्य महात्मा जोतीराव फुले जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

सामाजिक क्रांतीचे प्रणेते, शिक्षणाचे पुरस्कर्ते आणि समतेचा दिप प्रज्वलित करणाऱ्या क्रांतीसुर्य महात्मा जोतीराव फुले यांच्या १९९ व्या जयंतीनिमित्त वाशिम शहरात विविध उपक्रमांनी सजलेला भव्य जयंती उत्सव साजरा करण्यात येणार आहे. क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने या उत्सवाचे आयोजन करण्यात आले असून, यामध्ये सामाजिक एकता, बंधुभाव आणि प्रबोधनाचा संदेश देणारे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आल्याची माहिती उत्सव समितीच्या वतीने प्रसिद्ध पत्रकाद्वारे देण्यात आली आहे.

या उत्सवानिमित्त शनिवार, दि. ११ एप्रिल रोजी सकाळी ८.३० वाजता भव्य मोटरसायकल सद्भावना रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. ही रॅली क्रांतिसूर्य महात्मा फुले व सावित्रीबाई फुले स्मारक परिसरातून प्रारंभ होऊन शहरातील प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करत फुले स्मारक येथेच रॅलीचा समारोप होणार आहे. या रॅलीद्वारे सामाजिक ऐक्य, समता आणि शिक्षणाचा संदेश जनतेपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.



तसेच सायंकाळी ६ वाजता प्रबोधनात्मक जाहीर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले असून, ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. अशोक राणा यवतमाळ हे 'क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले यांचे समाजकार्य आणि आजची सामाजिक स्थिती ' या विषयावर सखोल मार्गदर्शन करणार आहेत. या व्याख्यानातून समाजातील विविध घटकांना प्रेरणा मिळणार असून, युवकांना दिशा देणारे विचार मांडले जाणार आहेत.

या जयंती उत्सवाच्या पूर्वसंध्येला शुक्रवार, दि. १० एप्रिल रोजी दुपारी ३. ३० वाजता भव्य रंगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेसाठी महिलांची संयोजन समिती परिश्रम घेत आहे. या स्पर्धेत महिला, युवक-युवती तसेच विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग अपेक्षित असून, सामाजिक विषयांवर आधारित कलाकृतींमधून समाजप्रबोधनाचा संदेश देण्यात येणार आहे.

तसेच सायंकाळी ६ वाजता प्रबोधनपर भव्य किर्तनाचा कार्यक्रम होत आहे. सत्यपाल महाराज यांचे शिष्य असलेले सप्तखंजेरी वादक युवा प्रबोधनकार पंकजपाल महाराज हे किर्तनातून समतेचा संदेश देणार आहेत.

उत्सवातील सर्व कार्यक्रम क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्मारक परिसर, वाशिम येथे पार पडणार आहेत. या माध्यमातून फुले यांच्या विचारांचा प्रसार करत समाजात समता, बंधुभाव आणि शिक्षणाची जाणीव अधिक दृढ करण्याचा संकल्प आयोजकांनी व्यक्त केला आहे.

समाजातील सर्व नागरिक, युवक, महिला तसेच विद्यार्थी बांधवांनी या जयंती उत्सवात मोठ्या संख्येने सहभागी होऊन कार्यक्रमांना यशस्वी करावे, तसेच समतेचा व शिक्षणाचा संदेश प्रत्येकापर्यंत पोहोचविण्यास हातभार लावावा, असे आवाहन क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## फळे व भाजीपाला निर्जलीकरण तंत्रज्ञान प्रशिक्षण; भूमी सुपोषणाद्वारे शाश्वत शेतीचा संदेश



■ प्रतिनिधी | वाशिम ■

दि. २७मार्च रोजी कृषी विज्ञान केंद्र, वाशिम यांच्या वतीने कामरगाव येथे फळे व भाजीपाला निर्जलीकरण तंत्रज्ञान या विषयावर वैज्ञानिक प्रशिक्षण कार्यक्रम कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. आर.एल.काळे यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या आयोजित करण्यात आला.

या प्रशिक्षणात केंद्राच्या गृहविज्ञान शाखेच्या कार्यक्रम सहाय्यक कु. शुभांगी वाटाणे यांनी सखोल व वैज्ञानिक मार्गदर्शन केले. त्यांनी फळे व भाजीपाला निर्जलीकरण प्रक्रियेचे तत्त्वज्ञान, आर्द्रता कमी करण्याच्या पद्धती, सूक्ष्मजीवांची वाढ रोखण्याचे विज्ञान, तसेच साठवण व शेल्फ-लाईफ वाढविण्याच्या तांत्रिक बाबींचे सविस्तर स्पष्टीकरण दिले. याशिवाय, मूल्यवर्धन, प्रक्रिया उद्योगातील संधी, आणि बाजारपेठेतील मागणी याबाबतही माहिती देण्यात आली. या तंत्रज्ञानाच्या अवलंबामुळे काढणीनंतर होणारे नुकसान लक्षणीयरीत्या कमी करून शेतमालाचे आर्थिक मूल्य वाढविता येते, असे त्यांनी स्पष्ट केले.

## जीना इसी का नाम है : विहंग कटोरेचा वाढदिवस पुस्तकदानातून साजरा



■ प्रतिनिधी | कारंजा ■

जे.डी. चवरे विद्यामंदिरात आज एक हृदयस्पर्शी आणि प्रेरणादायी उपक्रम राबविण्यात आला. दोन वर्षांपूर्वी दुर्धर कॅन्सरमुळे निधन झालेल्या विहंग कटोरे या विद्यार्थ्याचा वाढदिवस अनोख्या पद्धतीने साजरा करण्यात आला.

विहंगच्या स्मृतीप्रित्यर्थ त्यांचे वडील श्री. विशाल कटोरे यांनी शाळेला पुन्हा एकदा पुस्तकांची भेट देत मुलांमध्ये वाचनाची प्रेरणा जागवली. विशेष म्हणजे, विहंगसोबत शिकलेल्या त्याच्या वर्गातील प्रत्येक विद्यार्थ्याला अग्निपंख हे डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचे आत्मचरित्र भेट देण्यात आले. या उपक्रमामुळे शाळेचे वातावरण अत्यंत भावूक झाले होते. विद्यार्थ्यांच्या डोळ्यांत अश्रू तरळले होते आणि प्रत्येकाच्या मनात विहंगच्या आठवणी दाटून आल्या. विहंगच्या निधनाला आज दोन वर्षे पूर्ण झाली असली तरी त्याच्या वडिलांनी केलेल्या या पुस्तकदानाच्या माध्यमातून तो आजही शाळेत जिवंत असल्याची भावना मनात निर्माण झाली.

# बोर्डी दंड प्रकरणात 'सरकारी खेळखंडोबा'!

## महसूलमंत्र्यांच्या आदेशालाच केराची टोपली; प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह

■ प्रतिनिधी | अकोट ■

सातपुड्याच्या पायथ्याशी वसलेल्या बोर्डी ग्रामपंचायतीतील तब्बल ३५ लाख रुपयांच्या दंड वसुली प्रकरणात आता प्रशासनाचा ढिसाळ कारभार उघडपणे समोर आला आहे. एकीकडे महसूलमंत्र्यांनी स्पष्ट आदेश देत फेरचौकशी करून एक महिन्यात प्रकरण निकाली काढण्याचे निर्देश दिले, तर दुसरीकडे उपविभागीय अधिकारी (एसडीओ) अकोट यांनी त्या आदेशालाच अक्षरशः केराची टोपली दाखवल्याचा धक्कादायक आरोप पुढे आला आहे.

**दंड भरला, बोजा चढवला आता पुढे काय?**

गैरअर्जदारांकडून काही रक्कम शासन खजिन्यात जमा झाली असताना आणि उर्वरितांवर बोजा चढवण्यात आला असताना तिन्ही स्तरांवरील आदेश रद्द केल्याने प्रशासन अडचणीत सापडले आहे. या संपूर्ण प्रक्रियेत पुढील कायदेशीर दिशा काय असेल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**महसूलमंत्र्यांच्या आदेशालाही 'ब्रेक'!**

एक महिन्याची मुदत देऊनही तीन महिने उलटले तरी चौकशी सुरू नाही. त्यामुळे महसूलमंत्र्यांच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यास प्रशासन का टाळाटाळ करत आहे? हा मोठा सवाल निर्माण झाला आहे.

> 'मी केलेल्या तक्रारीनंतर सखोल चौकशी होऊन ३५ लाखांचा दंड ठोठावण्यात आला होता. तो तिन्ही न्यायालयांनी कायम ठेवला होता. मात्र महसूलमंत्र्यांनी तो रद्द करून फेरचौकशीचे आदेश दिले. तरीही चौकशीच होत नाही, ही गंभीर बाब आहे. मला न्याय मिळावा.'
>
> **- देवानंद खिरकर,** तक्रारदार

सन २०१० ते २०१५ दरम्यान बोर्डी येथे सिमेंट काँक्रिट रस्ते व नाल्यांच्या कामात गौण खनिज चोरीचा गंभीर आरोप करत सामाजिक कार्यकर्ते देवानंद खिरकर यांनी तक्रार दाखल केली होती. त्यानंतर प्रशासनाने केलेल्या चौकशीत संशयास्पद बाबी आढळून आल्याने संबंधितांवर ३५ लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला होता. हा दंड उपविभागीय अधिकारी, अप्पर जिल्हाधिकारी आणि अप्पर आयुक्त अशा तिन्ही स्तरांवर कायम राहिला होता.

मात्र, गैरअर्जदारांनी महसूलमंत्र्यांकडे धाव घेतल्यानंतर एकाच सुनावणीत तिन्ही आदेश रद्द करून फेरचौकशीचे आदेश देण्यात आले. इथेच संपूर्ण प्रकरणाने नवा वळण घेतले. आदेशाला तीन महिने उलटूनही अकोट प्रशासनाने साधी चौकशी सुरू करण्याची तसदी घेतलेली नाही.

दरम्यान, काही गैरअर्जदारांनी दंडाची रक्कम अंशतः भरली असून इतरांच्या मालमत्तेवर बोजाही चढवण्यात आला आहे. अशा परिस्थितीत महसूलमंत्र्यांच्या आदेशानंतर भरलेला दंड परत मिळणार का? मालमत्तेवरील बोजे उठवले जाणार का? आणि आधीचे आदेश देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई होणार का? असे अनेक अनुत्तरित प्रश्न निर्माण झाले आहेत. या संदर्भात उपविभागीय अधिकारी मनोज लोणारकर यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता तो होऊ शकला नाही. एकूणच, या प्रकरणामुळे प्रशासनाच्या कार्यपद्धतीवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, आदेश देणारे आणि अंमलबजावणी करणारे यांच्यातील विसंगती उघड झाली आहे. आता या प्रकरणात पुढे नेमकी कोणती कारवाई होते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १२६ ■ शुक्रवार, ३ एप्रिल २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

# मध्यरात्रीचा अवकाळी हल्ला; वर्धा जिल्हा पावसाच्या तडाख्यात; घरांचे नुकसान, जनावराचा बळी

**वर्धा जनमाध्यम :** बुधवारी मध्यरात्री अचानक बदललेल्या वातावरणाने वर्धा शहरासह संपूर्ण जिल्ह्याला झोडपून काढले. वादळी वाऱ्यासह कोसळलेल्या अवकाळी पावसाने काही भागांत तासन्तास धुमाकूळ घातला. विजांच्या कडकडाटात सुरू झालेला हा पाऊस गुरुवारी पहाटे साडेपाचपर्यंत सुरू राहिला. अचानक आलेल्या या पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून अनेक ठिकाणी शेतीमाल भिजला, तर घरांचेही नुकसान झाले असून एका जनावराचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे.







वीजांच्या कडकडाटात आणि प्रचंड वेगाच्या वाऱ्यांमध्ये आलेल्या या पावसाने जनजीवन विस्कळीत केले. शेतात साठवून ठेवलेले कुटार, धान्य आणि इतर कृषी उत्पादने भिजल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. कापणीसाठी तयार असलेल्या गव्हाच्या पिकालाही या अवकाळीने फटका बसला.

आर्वी तालुक्यातील चोरांबा येथे वाऱ्याच्या जोरात घरावरील टिन पत्रे उडून भिंत कोसळली. खुबगाव येथे एका जनावराचा मृत्यू झाला, तर दुसऱ्या घराचे छप्परही कोसळले. कारंजा (घाडगे) तालुक्यातील सुसुंद येथे दोन ते तीन घरांची टिन छप्परे उडाली. तसेच तीन वीज खांब कोसळल्याने वीज पुरवठा खंडित झाला. देवळी तालुक्यातील पिंपळगाव, दिघी व आंजी येथेही घरांवरील टिन पत्रे उडाल्याच्या घटना घडल्या आहेत.

वादळी वाऱ्यामुळे जिल्ह्यातील अनेक भागांत वीज पुरवठा खंडित झाला. रात्री अंधाराचे साम्राज्य पसरले होते. पाऊस ओसरल्यानंतर वीज वितरण विभागाने तातडीने दुरुस्तीची कामे हाती घेतली असून काही भागांत अजूनही पुरवठा सुरळीत करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

शहर व ग्रामीण भागात अनेक ठिकाणी मोठमोठी झाडे उन्मळून पडली. मुख्य बाजार परिसरातील वनमाली हॉस्पिटल मार्गावर झाड कोसळल्याने काही काळ वाहतूक ठप्प झाली होती. प्रशासनाच्या नोंदीनुसार मागील १२ तासांत जिल्ह्यात १३.८ मिमी पावसाची नोंद झाली आहे. वर्धा तालुक्यात सर्वाधिक ३०.४ मिमी, आर्वी १८.९ मिमी, हिंगणघाट १२.१ मिमी, देवळी १३.८ मिमी, सेलू व कारंजा प्रत्येकी ९.८ मिमी तर समुद्रपूरमध्ये ७.८ मिमी पाऊस झाला. आष्टी तालुका मात्र कोरडाच राहिला. अवकाळी पावसामुळे निर्माण झालेल्या नुकसानीमुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत असून प्रशासनाने तातडीने पंचनामे करून नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत द्यावी, अशी जोरदार मागणी होत आहे.

# अवकाळी पावसाचा तडाखा; बाजार समितीत धान्य भिजून शेतकऱ्यांचे मोठे नुकसान

**सेलू जनमाध्यम :** हवामान विभागाचा अंदाज खरा ठरत बुधवारी (१ एप्रिल) मध्यरात्रीच्या सुमारास सेलू व परिसरात वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली. या पावसामुळे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात उघड्यावर ठेवलेले गहू, हरभरा व तूर धान्य मोठ्या प्रमाणात भिजल्याने शेतकरी व व्यापाऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे.



रात्री उशिरापर्यंत वादळी वाऱ्यासह पावसाचा जोर कायम होता. अचानक आलेल्या या पावसामुळे बाजार समितीच्या यार्डमध्ये साठवून ठेवलेले धान्य सुरक्षित ठेवण्यास वेळ मिळाला नाही. परिणामी मोठ्या प्रमाणावर धान्य पावसाच्या पाण्यात भिजले.

भिजलेल्या धान्याची गुणवत्ता घसरल्याने त्याला अपेक्षित बाजारभाव मिळण्याची शक्यता कमी झाली आहे.

त्यामुळे आधीच आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना याचा मोठा फटका बसणार आहे. व्यापाऱ्यांनाही या नुकसानाचा फटका बसल्याने बाजारातील व्यवहारांवर परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

दरम्यान, नुकसानग्रस्त शेतकरी व व्यापाऱ्यांना तातडीने शासकीय मदत द्यावी, अशी मागणी पुढे येत आहे. तसेच भविष्यात अशा परिस्थितीत धान्य सुरक्षित ठेवण्यासाठी बाजार समितीत आवश्यक उपाययोजना करण्याची गरजही व्यक्त होत आहे.

# शेतातूनच गाय चोरी; पोरगव्हाणमध्ये खळबळ

**आष्टी जनमाध्यम :** तालुक्यातील पोरगव्हाण येथे शेतात बांधून ठेवलेली गाय अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. ही घटना २ एप्रिल रोजी सकाळी समोर येताच परिसरात खळबळ उडाली.

पोरगव्हाण येथील शेतकरी संजय रमेश राऊत यांचे गावालगत शेत असून त्यांनी रात्रीच्या वेळी शेतात गाय व वासरू बांधून ठेवले होते. दरम्यान, अज्ञात चोरट्याने रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत संधी साधून गाय लंपास केली.

सकाळी शेतात गेल्यानंतर गाय आढळून न आल्याने राऊत यांनी परिसरात शोध घेतला.

मात्र, गाय मिळून न आल्याने त्यांनी आष्टी पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार नोंदवली.

या घटनेमुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून चोरट्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी पुढे येत आहे. पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

# सिलेंडर टंचाईचा फटका; हनुमान जयंतीला चुलीवरच मांडला महाप्रसादाचा गंज

**सेलु जनमाध्यम :** हनुमान जयंतीच्या पावन पर्वावर महाप्रसादाच्या आयोजनात यंदा गॅस सिलेंडरच्या तुटवड्याने अडथळा निर्माण केला. मात्र, या संकटासमोर न झुकता ग्रामस्थांनी पारंपरिक चुलींचा आधार घेत महाप्रसादाचा गंज थाटला.





संकट मोचन हनुमान मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणावर भक्तांची गर्दी उसळली असताना, महाप्रसादासाठी आवश्यक असलेल्या गॅसची कमतरता भासत होती. यावर उपाय म्हणून ग्रामस्थांनी एकत्र येत मोठ्या चुली तयार केल्या आणि लाकूडफाट्याच्या साहाय्याने स्वयंपाकाला सुरुवात केली. चुलीवर शिजणाऱ्या अन्नाचा सुगंध परिसरात दरवळत होता, तर दुसरीकडे भक्तीमय वातावरणात महाप्रसादाची तयारी रंगत होती. या पारंपरिक पद्धतीमुळे काही प्रमाणात मेहनत आणि धुराचा त्रास सहन करावा लागला, तरीही ग्रामस्थांचा उत्साह कमी झाला नाही. उलट, सामूहिक श्रमातून तयार होणाऱ्या महाप्रसादाने एकतेचा आणि परंपरेचा संदेश अधिकच दृढ केला.

गॅस टंचाईमुळे निर्माण झालेल्या अडचणीवर मात करत, जुनीच पद्धत... पण नवा उत्साह, असे चित्र सेलुतील हनुमान जयंती महोत्सवात पाहायला मिळाले. चुलीवर मांडलेला हा महाप्रसाद केवळ अन्न नव्हे, तर गावकऱ्यांच्या जिद्दीचा आणि संस्कृतीच्या जतनाचा एक जिवंत पुरावा ठरला.

# गांजा विक्रीवर पोलिसांचा छापा; पती-पत्नी अटकेत, २.११ लाखांचा मुद्देमाल जप्त

**गिरड जनमाध्यम :** जिल्ह्यात अंमली पदार्थांविरोधातील कारवायांना वेग देत स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गिरडजवळील कोरा येथे छापा टाकून गांजा विक्री करणाऱ्या पती-पत्नीला अटक केली. या कारवाईत पोलिसांनी २ लाख ११ हजार ७७५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.



पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थांच्या विरोधात विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. त्याच पार्श्वभूमीवर मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने कोरा येथील रहिवासी संजय विनायक कोम्पलवार यांच्याज्ज्ज्ज्ज्घरी छापा टाकला.

या वेळी संजय कोम्पलवार व त्यांची पत्नी ज्ञानेश्वरी कोम्पलवार हे गांजा विक्री करताना आढळून आले. पोलिसांनी त्यांच्या ताब्यातून ४.५१ किलो गांजा, एमएच-३२ एझेड-९६९० क्रमांकाची दुचाकी तसेच मोबाईल असा एकूण २.११ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

या प्रकरणी दोन्ही आरोपींविरुद्ध गिरड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई पोलिस उपनिरीक्षक प्रकाश लसुंते, अरविंद येनुरकर, रोशन निंबोळकर, रवि पुरोहित, अभिषेक नाईक आणि दुर्गा सिडाम यांच्या पथकाने केली.

## 'गुरू की गिधाड

# शाळेतच मदतनीस महिलेचा विनयभंग; शिक्षकाचा घाणेरडा चेहरा उघड

**हिंगणघाट जनमाध्यम :** संस्कारांचे धडे देणाऱ्या शाळेतच एका शिक्षकाने मर्यादांची पायमल्ली केल्याचा संतापजनक प्रकार समोर आला आहे. तालुक्यातील एका जिल्हा परिषद शाळेत कार्यरत मदतनीस महिलेचा विनयभंग केल्याप्रकरणी संबंधित शिक्षकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून परिसरात संतापाची लाट उसळली आहे.

पीडित महिला ही शाळेत मदतनीस म्हणून काम करत असून विद्यार्थ्यांसाठी पोषण आहार शिजविणे व वाटप करण्याची जबाबदारी पार पाडते. याच शाळेत २०१८ पासून कार्यरत असलेला सतीश लांबे नावाचा शिक्षक गेल्या महिनाभरापासून तिच्याशी अनावश्यक जवळीक साधण्याचा प्रयत्न करीत होता.

२७ मार्च रोजी सकाळच्या सुमारास महिला शाळेत पोषण आहार तयार करत असताना, या शिक्षकाने तिचा विनयभंग केल्याचा धक्कादायक प्रकार घडला.

घटनेनंतर घाबरलेल्या महिलेने बदनामीच्या भीतीने काही दिवस मौन बाळगले. मात्र, आरोपीची वाढती धाडस पाहता अखेर तिने पतीला सर्व प्रकार सांगितला.

यानंतर पतीसह हिंगणघाट पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल करण्यात आली. पोलिसांनी तत्काळ गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

या घटनेमुळे ज्यांच्यावर विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेची जबाबदारी, त्यांच्याकडूनच असा घृणास्पद प्रकार असा प्रश्न उपस्थित होत आहे. शाळेसारख्या पवित्र स्थळी घडलेल्या या प्रकारामुळे पालकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे.

# पालकमंत्र्यांच्या हस्ते ८ जणांना शासकीय नोकरीचे आदेश

## अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये लाभ; ३० उमेदवार पात्र

**वर्धा जनमाध्यम :** अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये पीडित कुटुंबांना दिलासा देण्यासाठी वर्धा जिल्ह्यातील ८ पात्र उमेदवारांना शासकीय नोकरीचे नियुक्ती आदेश पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित कार्यक्रमात हा उपक्रम पार पडला.



या योजनेअंतर्गत गंभीर गुन्ह्यांमध्ये पीडित कुटुंबातील पात्र सदस्यांना शासकीय नोकरी देण्याचे धोरण आहे. त्यानुसार जिल्ह्यात एकूण ३० उमेदवार पात्र ठरले असून, उपलब्ध जागांनुसार ८ उमेदवारांना वर्धा जिल्ह्यात नियुक्ती देण्यात आली. उर्वरित उमेदवारांना चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा व नागपूर या जिल्ह्यांत नियुक्ती देण्यात आली आहे. अनुसूचित जमातीतील ११ उमेदवारांना आदिवासी विकास विभागामार्फत नियुक्ती देण्याची प्रक्रिया सुरू आहे. यावेळी जिल्हाधिकारी वान्मथी सी., अतिरिक्त जिल्हाधिकारी संजय तेली, समाजकल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त अंकेश केदार, प्रकल्प अधिकारी गीतांजली निकम, जिल्हा माहिती अधिकारी मंगेश वरकड यांच्यासह अन्य अधिकारी उपस्थित होते.

**'पीडित कुटुंबांना आधार देण्याचा प्रयत्न'**

या प्रसंगी पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी सांगितले की, घरातील कर्ता व्यक्ती गमावलेल्या कुटुंबांना वाऱ्यावर न सोडता त्यांना आधार देण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. या योजनेद्वारे आर्थिक मदतीसोबतच रोजगाराची संधी देऊन कुटुंब उभे करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

नियुक्ती मिळालेल्या उमेदवारांमध्ये पूजा आनंदराव रनधिर, राहुल ज्ञानेश्वर वाहने, निलेश वसंतराव हातमोडे, स्वप्नील सुरेश ओंकार, प्रगती गजानन देवतळे, विकास दौलतराव शंभरकर, शुभम रमेश घोरपडे आणि मन्टी अशोकराव तायवाडे यांचा समावेश आहे. हे उमेदवार समाजकल्याण विभागाच्या निवासी शाळा व वसतिगृहांमध्ये विविध पदांवर कार्यरत राहणार आहेत.

# मातीवर काँक्रिट'चा घोटाळा उघड

## -घोराडच्या रस्त्यावर भ्रष्टाचाराचा थरच थर

**सेलू जनमाध्यम:** श्रीक्षेत्र घोराड येथील भक्तनिवासासमोरील सिमेंट रस्त्याचे काम म्हणजे विकासाच्या नावाखाली सुरू असलेला उघड लूटप्रपंचच असल्याचे चित्र समोर आले आहे. मजबुतीकरण नावाखाली मातीवरच थेट काँक्रिट टाकून जनतेच्या पैशांचा अक्षरशः चुराडा केला जात असल्याचा संतापजनक प्रकार उघड झाला आहे.



रस्त्याच्या कामासाठी आवश्यक असलेली बेस लेयर, दर्जेदार मुरम, योग्य दाबणी या सर्व नियमांना फाटा देत काम सुरू आहे. साईड पट्ट्याचे खोदकाम करून त्यात मातीमिश्रित मुरम टाकण्यात आला आणि त्यावरच थेट काँक्रिट ओतले जात असल्याने हा रस्ता काही दिवसांतच खचण्याची शक्यता नाकारता येत नाही.

या प्रकारामुळे संतप्त नागरिक म्हणतात, 'हा रस्ता नाही, तर भ्रष्टाचाराचा सापळा आहे, विशेष म्हणजे, हा सर्व प्रकार उघडपणे सुरू असतानाही संबंधित अधिकाऱ्यांकडून मात्र संशयास्पद शांतता पाळली जात आहे. त्यामुळे 'वरिष्ठांचे मौन म्हणजे संमती?' असा थेट सवाल उपस्थित होत आहे.

स्थानिक पातळीवर अशी जोरदार चर्चा आहे की, काही नेत्यांच्या जवळच्या लोकांना काम देण्यात आल्याने अधिकाऱ्यांकडून हेतुपुरस्सर दुर्लक्ष केले जात आहे. त्यामुळे हा केवळ निकृष्ट कामाचा प्रश्न नसून, संपूर्ण व्यवस्थेतील सडलेपणाचे प्रतीक ठरत आहे.

घोराडसारख्या पवित्र क्षेत्रात भाविकांसाठी बनवला जाणारा रस्ता जर असा निकृष्ट दर्जाचा असेल, तर सामान्य नागरिकांच्या कामांची अवस्था काय असेल, याची कल्पनाच करवत नाही,

**तात्काळ चौकशी करा, दोषींना शिक्षा द्या**

ग्रामस्थांनी या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून संबंधित ठेकेदार आणि जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची जोरदार मागणी केली आहे. अन्यथा, येत्या काळात तीव्र आंदोलन उभारण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

# जलसंवर्धन व लैंगिक समानतेवर येळाकेळीत जनजागृती

**वर्धा जनमाध्यम :** जागतिक जल दिनानिमित्त महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठ, वर्धा येथील समाजकार्य विभागाच्या विद्यार्थ्यांनी येळाकेळी येथे जलसंवर्धन व लैंगिक संवेदनशीलतेवर जनजागृती कार्यक्रम आयोजित केला. यूथएड फाउंडेशनच्या सहकार्याने ग्रामपंचायत परिसरात हा उपक्रम उत्साहात पार पडला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. शिवाजी जोगदंड होते, तर डॉ. गजानन निलामे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी यूथएड फाउंडेशनचे गणेश बोरकर, सौरभ चौधरी, धनश्री काले तसेच सरपंच भारती चालख यांची उपस्थिती लाभली. सूत्रसंचालन सोनाली सिंह यांनी केले.

डॉ. जोगदंड यांनी जलसंवर्धनाचे महत्त्व पटवून देत पाणी बचतीचे सोपे उपाय सांगितले, तसेच लैंगिक समानतेची गरज अधोरेखित केली. कार्यक्रमांतर्गत 'महिला सशक्तीकरण, सेव वॉटर, सेव गर्ल' या विषयावर रंगोली स्पर्धा घेण्यात आली. यात ब्यूटी कुमारी व तनुश्री दुरबुडे प्रथम, निशा श्रृंगारे द्वितीय, तर कस्तुरी कलोशिया तृतीय ठरल्या.

कार्यक्रमात सानिका भागवत यांनी गीत सादर केले. सुलोचना ठेला यांनी रूफटॉप वॉटर हार्वेस्टिंग व किचन गार्डनद्वारे जलसंवर्धनाचे उपाय स्पष्ट केले. कार्यक्रमास ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

# एका दिवसात ८२ लाखांची कर वसुली; वर्धा पालिकेची उल्लेखनीय झेप

## -नागपूर विभागात द्वितीय स्थान; 'अभय' योजनेचा मोठा फायदा

**'वर्धा जनमाध्यम :** शहराच्या विकासासाठी आवश्यक निधी उभारण्याच्या दृष्टीने वर्धा नगरपालिकेच्या कर विभागाने आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये उल्लेखनीय कामगिरी नोंदवली आहे. विशेष म्हणजे, आर्थिक वर्षाच्या शेवटच्या दिवशी म्हणजेच ३१ मार्च रोजी एका दिवसात तब्बल ८२ लाख रुपयांची कर वसुली करत पालिकेने विक्रम प्रस्थापित केला. यंदाच्या एकूण कामगिरीमुळे वर्धा पालिका नागपूर विभागात द्वितीय स्थानावर पोहोचली आहे.

पालिकेसमोर चालू व थकीत मिळून एकूण ११ कोटी ८१ लाख रुपयांच्या कर वसुलीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते. यामध्ये चालू कर ६ कोटी ८७ लाख तर थकीत कर ४ कोटी ९३ लाखांचा समावेश होता. या पार्श्वभूमीवर पालिकेच्या अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी विशेष मोहीम राबवत नागरिकांना कर भरण्यास प्रवृत्त केले. परिणामी, वर्षअखेरीस एकूण ९ कोटी ५० लाख रुपयांची कर वसुली करण्यात यश आले.

शहरात सुमारे २८ हजार मालमत्ता धारक असून, कर भरण्यासाठी नागरिकांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. थकीत करापैकी सुमारे ८५ टक्के तर चालू वर्षातील ७८ टक्के कराची वसुली करण्यात आली आहे. शहरातील नागरी सुविधा सक्षम करण्यासाठी कर वसुलीला अत्यंत महत्त्व असल्याने पालिकेने सातत्याने जनजागृती मोहीम राबवली.

दरम्यान, 'अभय' योजनेमुळे कर वसुलीला मोठी चालना मिळाली. या योजनेअंतर्गत थकीत करावरील व्याज माफ करण्यात आले. त्यामुळे सुमारे ८५ टक्के करदात्यांनी या योजनेचा लाभ घेतला. यामुळे जवळपास २ कोटी रुपयांचे व्याज माफ करण्यात आले असून, कर भरण्यास नागरिकांचा प्रतिसाद वाढला. या सर्व प्रयत्नांमुळेच एका दिवसात ८२ लाख रुपयांची वसुली शक्य झाल्याचे पालिकेकडून सांगण्यात आले. या यशस्वी कामगिरीबद्दल पालिकेच्या कर विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे कौतुक करण्यात येत आहे. तसेच, भविष्यातही शहर विकासासाठी कर वसुली वाढवण्यावर भर देण्यात येणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

### नगराध्यक्षांचे मत

वर्धा शहराच्या सर्वांगीण विकासासाठी कर वसुली अत्यंत महत्त्वाची आहे. नगराध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर नागरिक, नगरसेवक आणि कर्मचारी यांना विश्वासात घेऊन काम करण्यावर भर दिला. 'अभय' योजनेमुळे थकीत करावरील व्याजातून दिलासा मिळाल्याने नागरिकांनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला. नागपूर विभागात मिळालेले द्वितीय स्थान ही वर्धाकरांसाठी अभिमानाची बाब आहे. भविष्यातही अशाच नाविन्यपूर्ण उपक्रमांद्वारे शहर विकासाला गती देण्याचा प्रयत्न राहील.

**-सुधीर पांगुळ,** नगराध्यक्ष, वर्धा

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# छत्रपती शिवाजी महाराज राजस्व अभियानातून सामान्यांमध्ये विश्वासनिर्मिती व्हावी-महसूल मंत्री



## पहिल्या टप्प्यात लाखो नागरिकांची प्रलंबित कामे निकाली

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील नागरिकांना महसूल सेवा सुलभ, वेगवान आणि पारदर्शक पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज राजस्व अभियान राज्यभर प्रभावीपणे राबविले जावे. या अभियानांतर्गत आयोजित केल्या जाणा-या शिबिरांमध्ये जनसामान्यांची महत्वपूर्ण कामे करण्यास प्राधान्य देण्याचे स्पष्ट निर्देश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी राज्यस्तरीय समितीच्या आढावा बैठकीदरम्यान दिले.

मंत्रालयात झालेल्या या बैठकीस राज्यमंत्री योगेश कदम, आमदार, अपर मुख्य सचिव विकास खारगे, संबंधित अधिकारी उपस्थित होते. दि ७ आणि १४ मार्च रोजी पार पडलेल्या या अभियानाचा पहिला टप्पा यशस्वी झाला असून, याद्वारे लाखो नागरिकांची प्रलंबित प्रकरणे त्वरीत निकाली काढण्यात आली आहेत. महसूल विभागाशी संबंधित लोकांची केवळ किरकोळ स्वरूपाची नव्हे तर महत्वाच्या कामांचाही प्राधान्याने निपटारा होईल यादृष्टीने शिबिरांचे नियोजन करण्याचे निर्देश मंत्री डा. बावनकुळे यांनी यावेळी दिले.छत्रपती शिवाजी महाराज राजस्व अभियानांतर्गत राज्यभर शिबिरांचे नियोजन करण्यात आले आहे. त्याचा सविस्तर आढावा घेताना महसूल मंत्री श्री. बावनकुळे म्हणाले की, या अभियानाच्या माध्यमातून लोकांमध्ये शासनाविषयी विश्वास निर्माण होण्यास मदत होत आहे. हे अभियान म्हणजे केवळ प्रशासकीय उपक्रम नसून नागरिकांच्या विश्वासाशी निगडित आहे. त्यामुळे संपूर्ण महसूल यंत्रणेने हे अभियान गांभीर्याने घ्यावे, शिबिरांचे नियोजन आणि सामान्य नागरिकांची कामे प्राधान्याने करावीत. शेतक-यांपासून थेट शहरी नागरिकांपर्यंत महसूल सेवा अधिक तत्पर आणि वेगवान झाल्याची भावना नागरिकांमध्ये रु जावी, या दृष्टीने प्रत्येक शिबीर पार पाडले जावे, असे निर्देश त्यांनी दिले.

**लाखो नागरिकांना तात्काळ दिलासा-** गावपातळीवर आयोजित राजस्व शिबिरांमध्ये एक खिडकी व्यवस्थेअंतर्गत नागरिकांच्या ५७,१५२ अर्जांचा त्वरित निपटारा करण्यात आला. यामध्ये ४४,७७६ फेरफार प्रकरणे निकाली करू न जमिनीच्या मालकीच्या नोंदी अद्ययावत करण्यात आल्या आहेत. त्याचबरोबर १७,४१४ सातबारा दुरुस्तीसाठी स्वीकारलेले अर्ज देखील त्वरीत निकाली काढण्यात आले आहेत. त्यामुळे शेतक-यानी समाधान व्यक्त केले.

**डिजिटल सातबारा आणि इतर प्रमाणपत्रे-**अभियानात तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करत १,९०,१६२ डिजिटल सातबारा, १,२२,७३९ आठ-अ उतारे आणि २,४६,४५३ प्रमाणपत्रे नागरिकांना वाटप करण्यात आली. यामुळे नागरिकांना संबंधित कार्यालयात जाउन वेळ खर्ची घालावा लागला नाही. ऑनलाइन-डिजिटल दस्तऐवज तत्काळ मिळू शकले. भूसंपादन प्रकरणे आणि अकृषक परवानगीच्या अनुक्रमे २,६९९ आणि १,०४७ प्रकरणांमध्ये कमी-जास्त पत्रकांची तयारी करून गाव दप्तर अद्ययावत करण्यात आले असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

**अभियानाच्या प्रगतीचा जिल्हानिहाय आढावा-** महसूल मंत्री श्री बावनकुळे यांनी अभियानाच्या प्रगतीचा जिल्हानिहाय आढावा देखील घेतला. शिबिरांमध्ये येणा-या प्रत्येक अर्जावर ठराविक वेळेत निर्णय घ्यावा. तसेच नागरिकांना अनावश्यक त्रास होउ नये, याची विशेष दक्षता घेण्याचे निर्देश अधिका-यांना त्यांनी दिले. लोकांपर्यंत या शिबिरांची माहिती पोहोचावी यासाठी व्यापक जनजागृती करावी. शिबिरांमध्ये जमिनीच्या नोंदी, फेरफार, वारस नोंद आणि इतर प्रलंबित प्रकरणे तत्काळ निकाली काढण्यावर यंत्रणेने विशेष भर द्यावा, असे निर्देश मंत्री श्री बावनकुळे यांनी यावेळी दिले.

# 71 लाख बहिणींना योजनेतून वगळले

## निवडणुकीसाठी तिजोरीवर डल्ला; शशिकांत शिंदेंचा सरकारवर घणाघात

**मुंबई/प्रतिनिधी :** निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून लाडकी बहीण योजनेचे श्रेय अनेकांनी घेतले. निवडणुकीत फायदा व्हावा म्हणून निकष, नियम न बघता राज्याच्या तिजोरीतून पैसे वाटण्यात आले. आता आर्थिक बोजा पडू लागला म्हणून नियम, निकष लावण्यात आले आणि आता ७१ लाख बहीणींना त्यापासून वंचित केले जात असून एक प्रकारे महिलांची फसवणूक केली जात असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी सरकारवर केला आहे.राज्य सरकारची मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना आता मोठ्या वादाच्या भो-यात सापडण्याची शक्यता आहे. विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर सुरू झालेल्या या योजनेत तब्बल ७१ लाख महिला अपात्र ठरल्याची माहिती समोर आली आहे. विशेष म्हणजे, या अपात्र महिलांच्या खात्यावर गेल्या २० महिन्यांत सरकारने सुमारे २१ हजार ३०० कोटी रुपये जमा केले आहेत. विशेषतः कुटुंबातील सरकारी नोकरीबाबत चुकीचा पर्याय निवडला गेल्याने अनेक बहिणींचे १५०० रुपये बंद झाले होते.

या प्रकरणामुळे राज्यातील अनेक महिला सरकारवर नाराज झाल्या. विरोधकांकडून विरोध होत असल्याने पुन्हा एकदा या तक्रारीची दखल घेत ज्या महिलांची ई-केवायसी प्रलंबित राहिली होती, त्यांच्यासाठी सरकारने पून्हा ३० एप्रिल २०२६ पर्यंत मुदतवाढ दिली आहे.

**३० एप्रिल पर्यंत मुदतवाढ**

३० एप्रिल २०२६ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. ज्या महिला आपली ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करणार नाहीत, त्यांच्या खात्यात मे महिन्यापासूनचे पुढील हप्ते जमा केले जाणार नाहीत. अर्ज भरा आणि लाभ मिळवा या धोरणामुळे लाभार्थ्यांचा आकडा २ कोटी ४७ लाखांवर गेला होता. मात्र, आता ई-केवायसी आणि डेटा शुद्धीकरण मोहिमेत यातील ७१ लाख महिला निकषात बसत नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

**सरकारचे दरमहा १०६५ कोटी वाचणार-**महिला व बालविकास विभागाने केलेल्या या पडताळणीमुळे आता सरकारचे दरमहा होणारे १०६५ कोटी रुपयांचे नुकसान टळणार आहे. एप्रिल २०२६ पासून या अपात्र महिलांना मिळणारे १५०० रुपये बंद केले जाणार आहेत. चारचाकी वाहन असणे, कुटुंबातील सदस्य सरकारी सेवेत असणे किंवा तांत्रिक कारणांमुळे जवळपास १० लाख महिला आधीच अपात्र ठरल्या होत्या. मात्र, गेल्या २० महिन्यांपासून जे मानधन दिले गेले, त्या अवाढव्य खर्चाची जबाबदारी कोणाची? असा प्रश्न आता विरोधकांकडून विचारला जात आहे.




## ई-केवायसी न केल्याने लाडकी बहीण योजनेतील 68 लाख खाती बंद

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र सरकारच्या लाडकी बहिण योजना संदर्भात एक मोठी बातमी समोर आली आहे. या योजनेअंतर्गत अनिवार्य ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण न केल्यामुळे सुमारे ६८ लाख खाती बंद करण्यात आली आहेत, ज्यामुळे योजनेतील लाभार्थ्यांच्या संख्येत मोठा बदल दिसून आला आहे. सरकारी अधिका-यांच्या माहितीनुसार, एकूण २.४३ कोटी खात्यांपैकी ६८ लाख खाती निर्धारित कालमर्यादेत ई-केवायसी पूर्ण न केल्यामुळे निष्क्रिय करण्यात आली.यानंतर आता सक्रिय खात्यांची संख्या घटून सुमारे १.७५ कोटींवर आली आहे. मात्र, लाभार्थ्यांना दिलासा देत सरकारने ई-केवायसीची अंतिम तारीख ३१ मार्चवरून वाढवून ३० एप्रिलपर्यंत केली आहे.अधिका-यांनी सांगितले की, नव्या मुदतीत माहिती अद्ययावत करणा-या लाभार्थ्यांची खाती पुन्हा सक्रिय केली जाउ शकतात. या योजनेअंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील महिलांना दरमहा १५०० रुपयांची आर्थिक मदत दिली जाते. राज्य सरकार या योजनेसाठी दर महिन्याला सुमारे ३७०० कोटी रुपये खर्च करते. तपासादरम्यान असे समोर आले की अनेक अपात्र व्यक्ती ज्यामध्ये पुरुष आणि सरकारी कर्मचारी यांचाही समावेश होता या योजनेचा लाभ घेत होते. याच कारणामुळे सरकारने मोठ्या प्रमाणावर पडताळणी मोहीम राबवली. सरकारचे मत आहे की या निर्णयामुळे योजनेत पारदर्शकता वाढेल आणि बनावट किंवा निष्क्रिय खाती हटवता येतील. ज्या लाभार्थ्यांची खाती बंद झाली आहेत, त्यांनी लवकरात लवकर ई-केवायसी पूर्ण करावी, असे आवाहनही करण्यात आले आहे, जेणेकरून त्यांना योजनेचा लाभ सुरू राहील. ही योजना २०२४ च्या विधानसभा निवडणुकांपूर्वी सुरू करण्यात आली होती आणि राज्यातील महिलांसाठी एक मोठा दिलासा मानली जाते. आता, नवीन ई-केवायसी मुदतीमुळे, किती लाभार्थी या योजनेत पुन्हा सामील होतात हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

# जागतिक तणावामुळे शेअर बाजारात मोठी घसरण; सेन्सेक्स 1300 अंकांनी कोसळला

**मुंबई/प्रतिनिधी :**भारतीय शेअर बाजार गुरुवारी मोठ्या प्रमाणात कोसळले. सेन्सेक्स सुमारे १३०० हून अधिक अंकांनी घसरला, तर बुधवारी झालेल्या वाढीनंतर निफ्टी २२,२५० च्या खाली आला. इराण-अमेरिका तणावाबाबत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या वक्तव्यांवर गुंतवणूकदारांनी नकारात्मक प्रतिक्रिया दिल्याने बाजारात मोठी घसरण दिसून आली. सकाळी ९.३९ वाजता सेन्सेक्स १,३९४.३८ (-१.९०%) अंकांनी घसरून ७१,७३९.९४ वर व्यवहार करत होता, तर निफ्टी ४०७.७५ (-१.८०%) अंकांनी घसरून २२,२७१.६५ वर पोहोचला. या काळात बँकिंग आणि फार्मा क्षेत्रातील शेअर्समध्ये मोठी विक्री दिसून आली.परदेशी गुंतवणूकदारांकडून सुरू असलेली विक्री आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या इशा-यानंतर सेन्सेक्स आणि निफ्टीमध्ये जवळपास २ टक्क्यांची मोठी घसरण नोंदवली गेली. गुरुवारी सकाळच्या व्यवहारात ३० शेअर्सचा बीएसई सेन्सेक्स १,४३३.७२ अंकांनी (१.९६%) घसरून ७१,७००.६० वर आला. तर ५० शेअर्सचा एनएसई निफ्टी ४४५.७० अंकांनी (१.९७%) घसरून २२,२३३.७० या स्तरावर पोहोचला.याच्या अगोदर बुधवारी सेन्सेक्स १,१८६.७७ अंकांच्या उसळीने ७३,१३४.३२ वर आणि निफ्टी ३४८ अंकांच्या वाढीसह २२,६७९.४० वर बंद झाला होता. बाजारातील या मोठ्या घसरणीमागे जागतिक भू-राजकीय तणाव हा प्रमुख घटक असल्याचे मानले जात आहे. जिओजित इन्व्हेस्टमेंट्स लिमिटेडचे मुख्य गुंतवणूक रणनीतीकार वी. के. विजयकुमार यांच्या मते, राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी पुढील दोन ते तीन आठवड्यांत इराणवर कठोर कारवाई करू अशी घोषणा केल्यानंतर बाजारातील भावना पुन्हा नकारात्मक झाल्या आहेत. या लष्करी तणावाच्या भीतीमुळे उर्जा बाजारातही मोठे चढ-उतार दिसून आले. कच्चे तेल: जागतिक तेल बेंचमार्क ब्रेंट क्रूड सुमारे ४.४४ ते ५ टक्क्यांनी वाढून प्रति बॅरल १०५.६५ डालरवर पोहोचले. बान्ड यील्ड आणि कमोडिटी: अमेरिकेच्या १० वर्षांच्या बाँड यील्डमध्ये वाढ होउन ती ४.३६ टक्क्यांवर गेली, ज्याचा सोने-चांदीच्या



किमतींवर किरकोळ नकारात्मक परिणाम झाला.परदेशी निधीची माघार: एक्स्चेंजच्या आकडेवारीनुसार, बुधवारी विदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांनी (FII) ८,३३१.१५ कोटी रुपयांच्या शेअर्सची विक्री केली. मात्र, देशांतर्गत संस्थात्मक गुंतवणूकदारांनी (DII) ७,१७१.८० कोटी रुपयांची खरेदी करून बाजाराला काहीसा आधार देण्याचा प्रयत्न केला. सुरुवातीच्या व्यवहारात सेन्सेक्समधील सर्व ३० कंपन्यांचे शेअर्स तोट्यात होते. सर्वाधिक घसरण झालेल्या शेअर्समध्ये सन फार्मा, इंडिगो, अदाणी पोर्ट्स, इटरनल, लार्सन अँड टुब्रो, एशियन पेंट्स, एनटीपीसी, स्टेट बँक ऑफ इंडिया, ट्रेंट, कोटक महिंद्रा बँक, ॲक्सिस बँक आणि पावरग्रिड यांचा समावेश होता. याचा परिणाम केवळ भारतापुरता मर्यादित राहिला नाही. अमेरिकन बाजार बुधवारी वाढीसह बंद झाले असले तरी गुरुवारी आशियाई बाजारांमध्ये मोठी विक्री झाली. दक्षिण कोरियाचा कोस्पी ४.३१ टक्के, जपानचा निक्केई २.२४ टक्के, हाँगकाँगचा हँगसेंग १.०४ टक्के आणि शांघाय कंपोझिट निर्देशांक ०.५३ टक्क्यांनी घसरला.

भारतीय रुपयाने ऐतिहासिक नीचांकी स्तरावरून मजबूत पुनरागमन करत गुरुवारी सुरुवातीच्या व्यवहारात अमेरिकन डालरच्या तुलनेत १५१ पैशांची वाढ नोंदवली. भारतीय रिझर्व्ह बँकेने ऑनशोर फारवर्ड डिलिव्हरी मार्केटमध्ये बँकांच्या नेट ओपन पोझिशनवर मर्यादा घालण्याच्या तातडीच्या निर्णयामुळे ही तेजी दिसून आली. आंतरबँक विदेशी चलन बाजारात रुपया ९४.६२ वर उघडला आणि सुरुवातीच्या व्यवहारात डालरच्या तुलनेत वाढत ९३.१९ पर्यंत पोहोचला. मागील बंद भावाच्या तुलनेत रुपया १५१ पैशांनी म्हणजेच १.६ टक्क्यांनी मजबूत झाला.जागतिक अस्थिरतेचा थेट परिणाम भारतीय रुपया आणि देशांतर्गत अर्थव्यवस्थेवर होत असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

# मुख्यमंत्री पद सोडल्यानंतरही नीतीश कुमार यांना मिळणार झेड-प्लस सुरक्षा

**पाटणा/वृत्तसंस्था :** बिहारचे मुख्यमंत्री नीतीश कुमार आता राज्यसभेत जाणार असल्याने त्यांच्या सुरक्षेत बदल करण्यात आला आहे. आता मुख्यमंत्री नीतीश कुमार यांना झेडअ श्रेणीची सुरक्षा प्रदान करण्यात येणार आहे. यासंदर्भात राज्याच्या गृह विभागाने पोलिस महासंचालकांना (DGP) आदेश जारी केले आहेत. जारी करण्यात आलेल्या निर्देशांमध्ये स्पष्ट करण्यात आले आहे की, त्यांना बिहार स्पेशल सिक्युरिटी ॲक्ट-२००० अंतर्गत सुरक्षा देण्यात येईल, जी मुख्यमंत्री पद सोडल्यानंतरही कायम राहणार आहे.



बिहार सरकारच्या गृह विभागाने यासंबंधी अधिकृत अधिसूचना जारी केली आहे. या अधिसूचनेत आगामी काळात नीतीश कुमार मुख्यमंत्री पदाचा राजीनामा देणार असल्याचा उल्लेख करण्यात आला आहे. या आदेशामुळे ते लवकरच मुख्यमंत्री पदाचा राजीनामा देणार असल्याचेही स्पष्ट झाले आहे. मुख्यमंत्री पद सोडल्यानंतर सुरक्षेत कोणतीही त्रुटी राहू नये यासाठी झेडअ श्रेणीची कडक सुरक्षा व्यवस्था करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या सुरक्षाव्यवस्थेत त्यांच्या संरक्षणासाठी ५५ सुरक्षाकर्मी तैनात करण्यात येणार असून त्यामध्ये १० हून अधिक NSG (नॅशनल सिक्युरिटी गार्ड) कमांडो सहभागी असतील.

पोलिस महासंचालकांना पाठविलेल्या पत्रात नमूद करण्यात आले आहे की, बिहार स्पेशल सिक्युरिटी ॲक्ट-२००० अंतर्गत नीतीश कुमार यांना सुरक्षा प्रदान करण्यात येईल. नीतीश कुमार सध्या राज्यसभेसाठी निवडून आले आहेत. येत्या काळात ते बिहार विधान परिषदेच्या सदस्यत्वाचा तसेच मुख्यमंत्री पदाचा राजीनामा देउन राज्यसभेचे सदस्यत्व स्वीकारतील.अधिसूचनेत असेही म्हटले आहे की, नीतीश कुमार यांच्या सुरक्षेचा आढावा घेतल्यानंतर त्यांना झेडअ श्रेणीची सुरक्षा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

दरम्यान, या महिन्याच्या सुरुवातीला राज्यसभेसाठी निवडून आलेल्या मुख्यमंत्री नीतीश कुमार यांनी सोमवारी बिहार विधान परिषदेच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला होता. जनता दल (युनायटेड) चे राष्ट्रीय अध्यक्ष नीतीश कुमार यांनी विधान परिषदेचे सदस्यत्व सोडल्यानंतर राज्याच्या नव्या मुख्यमंत्र्याबाबत राजकीय चर्चांना वेग आला आहे.नीतीश कुमार यांच्या निकटवर्तीय सहका-यांकडून काही काळापासून संवैधानिक तरतुदींचा हवाला देत असे संकेत दिले जात आहेत की, एखादी व्यक्ती विधानसभा किंवा विधान परिषदेची सदस्य नसतानाही ६ महिन्यांपर्यंत मुख्यमंत्री पदावर राहू शकते.

# *राज्यसभेत राघव चड्ढांना हटवून आपकडून अशोक मित्तल यांची उपनेतेपदी नियुक्ती*

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**आम आदमी पार्टीने (आप) खासदार राघव चड्ढा यांना राज्यसभेच्या उपनेतेपदावरून हटवले. त्यांच्या जागी राज्यसभा खासदार अशोक मित्तल यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षाने राज्यसभा सचिवालयाला पत्र लिहून ही माहिती दिली. त्याचबरोबर, पक्षाने अशोक मित्तल यांच्यावर नवीन जबाबदा-या सोपवून त्यांच्यावर विश्वास व्यक्त केला आहे. मित्तल हे राज्यसभेचे सदस्य असून, आता त्यांना उपनेतेपदी नियुक्त करून पक्षाने त्यांच्यावर आणखी मोठी जबाबदारी टाकली आहे. ते सभागृहात पक्षाची रणनीती अधिक प्रभावीपणे पुढे नेण्यासाठी काम करतील, असा विश्वास आहे.अशोक मित्तल हे पंजाबमधून 'आप'चे राज्यसभा खासदार आहेत. ते जालंधरचे रहिवासी असून पंजाबमधील 'लवली प्रोफेशनल युनिव्हर्सिटी'चे संस्थापक आणि कुलपती आहेत. ते २०२२ मध्ये राज्यसभा खासदार झाले. राजकारणात येण्यापूर्वी ते एक यशस्वी उद्योजक होते.राघव चड्ढा यांनी राज्यसभेत पक्षाचे उपनेते म्हणून दीर्घकाळ सक्रिय भूमिका बजावली होती. ते पक्षातील एक प्रमुख व्यक्तिमत्व मानले जात होते आणि त्यांनी संसदेत अनेक महत्त्वाचे मुद्दे उपस्थित केले होते. त्यांना पदावरून हटवण्याच्या निर्णयामुळे राजकीय वर्तुळात तीव्र चर्चा सुरू झाली आहे.राघव हे २०२२ पासून पंजाबमधून राज्यसभेचे खासदार आहेत. त्यांचा



कार्यकाळ २०२८ मध्ये संपत आहे. पक्षाने या निर्णयामागे कोणतेही कारण दिलेले नाही. पण, ते ब-याच काळापासून पक्षापासून दूर होते आणि 'आप'बद्दल कोणतेही वक्तव्य करत नव्हते. २७ फेब्रुवारी रोजी, जेव्हा एका कनिष्ठ न्यायालयाने दिल्ली दारू धोरण प्रकरणात अरविंद केजरीवाल यांना दिलासा दिला, तेव्हा त्यांनी कोणतेही वक्तव्य केले नाही. राज्यसभेतही ते गिग वर्कर्स आणि शालेय शुल्काचा मुद्दा उपस्थित करत होते.

# अवैध प्रवासी वाहतुकीवर कठोर कारवाई करणार-परिवहन मंत्री

**मुंबई/प्रतिनिधी :** अवैध प्रवासी वाहतूक रोखण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने कार्य करणे गरजेचे असून अवैध प्रवासी वाहतूकीवर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी दिला.



अवैध प्रवासी वाहतुकीस आळा घालण्यासाठी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली परिवहन विभागाच्या बांद्रा येथील कार्यालयात मोटार परिवहन विभाग व एसटी महामंडळाची उच्चस्तरीय आढावा बैठक झाली.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले, अवैध वाहतूक रोखण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने कार्य करणे अत्यावश्यक आहे. एसटीकडून उपलब्ध करून दिलेल्या वाहनांचा वापर केवळ कारवाईसाठीच करण्यात यावा. त्याचा कोणताही गैरवापर सहन केला जाणार नाही. तसेच, आर.टी.ओ.च्या सर्व ५९ कार्यालयांना आवश्यक संसाधने उपलब्ध करून देण्यासाठी एसटीने तातडीने कार्यवाही करावी. प्रत्येक संयुक्त कारवाईचा फोटो व लेखी अहवाल मुख्य कार्यालयात सादर करणे बंधनकारक असून, निष्क्रिय व जबाबदारी टाळणा-या अधिका-यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, असा इशाराही परिवहन मंत्री सरनाईक यांनी दिला. एसटीने बेकायदेशीर मार्ग व वाहनांची माहिती नियमितपणे संकलित करून आर.टी.ओ. विभागास देणे, संगनमत व गैरप्रकारांविरोधात स्वतंत्र चौकशी समिती नेमणे, तसेच जीपीएस व फोटो रिपोर्टिंगसारख्या तंत्रज्ञानाचा वापर करून कारवाई अधिक पारदर्शक करण्याचे निर्देशही यावेळी देण्यात आले. अवैध प्रवासी वाहतूक रोखण्यासाठी परिवहन विभाग व महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने संयुक्तपणे काम करण्यावर भर देण्याचे निर्देशही यावेळी देण्यात आले.

# हेड-नेक कॅन्सरचा धोका 30 टक्क्यांनी वाढला

**मुंबई/प्रतिनिधी :** तोंडात किंवा घशामध्ये झालेली जखम, गाठ किंवा आवाजात झालेला बदल याकडे अनेकदा दुर्लक्ष केले जाते. मात्र हीच लक्षणे हेड आणि नेक कॅन्सरची सुरुवातीची लक्षणे असू शकतात, असा इशारा तज्ज्ञांनी दिला आहे. भारतात सर्व कॅन्सर रुग्णांपैकी अंदाजे २६ % ते ३० % रुग्णांना हेड आणि नेक कॅन्सर असल्याची माहिती आहे. ज्याचे प्रमुख कारण तंबाखू, गुटखा, बीडी, सिगारेट आणि इतर सवयींशी संबंधित आहे. हे प्रमाण इतर कर्करोगांच्या तुलनेत अधिक आहे.

जागतिक आरोग्य संघटना अंतर्गत आयएआरसी ग्लोबल कॅन्सर ऑब्जर्वेटरीनुसार, जगभरात सुमारे ९.३ ते ९.५ लाख नवीन हेड आणि नेक कॅन्सरची प्रकरणे नोंदवली गेली आहेत. देशात दरवर्षी सुमारे १० ते १२ लाख नवीन कर्करोगाचे रुग्ण आढळतात. यापैकी जवळपास ३० टक्के कर्करोग हे हेड अॅण्ड नेक कर्करोगाचे असतात. तंबाखू, गुटखा, धूम्रपान, दारूचे व्यसन तसेच काही विषाणुजन्य संसर्ग ही या कॅन्सरची प्रमुख कारणं मानली जातात. विशेष म्हणजे हा कॅन्सर सुरुवातीच्या टप्प्यात ओळखला गेल्यास पूर्णपणे बरा



होण्याची शक्यता अधिक असते.तज्ज्ञांच्या मते, तोंडात तीन आठवड्यांपेक्षा जास्त काळ बरी न होणारी जखम, गालाच्या आत पांढरे किंवा लाल चट्टे, पाणी किंवा पदार्थ गिळताना त्रास होणे, सतत घसा दुखणे, मानेला गाठ येणे किंवा आवाजात बदल होणे ही लक्षणे आढळल्यास त्वरित डाक्टरांचा सल्ला घेणे गरजेचे आहे. याबाबत माहिती देताना डा. प्रथमेश पै (प्रमुख हेड अॅण्ड नेक कॅन्सर विभाग, ग्लेनईगल्स हास्पीटल, मुंबई) म्हणाले, बहुतेक रुग्ण डाक्टरांकडे येण्यास विलंब करतात. सुरुवातीच्या टप्प्यात आढळलेला हेड-नेक कॅन्सर ८० ते ९० टक्के प्रकरणांमध्ये यशस्वीरीत्या बरा होउ शकतो. त्यामुळे तोंडातील कोणत्याही जखमेकडे दुर्लक्ष करु नका.

चेंबूर येथील झेन मल्टीस्पेशालिटी हास्पिटलमधील सर्जिकल ऑन्कोलाजिस्ट डा. तनवीर अब्दुल मजीद यांनी तंबाखूच्या सवयींबाबत इशारा देताना सांगितले की तंबाखू आणि दारू च्या व्यसनांमुळे हेड अॅण्ड नेक कॅन्सरचा धोका अनेक पटींनी वाढतो. जनजागृती, नियमित तपासणी आणि सवयींमध्ये बदल हेच या कॅन्सरपासून संरक्षणाचे प्रभावी मार्ग आहेत.

**कॅन्सरचा धोका टाळता येउ शकतो?-**हेड आणि नेक कॅन्सरचा धोका टाळता येउ शकतो, यासाठी योग्य जीवनशैली आणि वेळोवेळी आरोग्य तपासणी करणे गरजेचे आहे.

# 40 उत्पादनांवरील आयात शुल्क हटवले

## केंद्राकडून यादी जाहीर सूट 30 जूनपर्यंत लागू

**नवी दिल्ली :** पश्चिम आशियात अमेरिका, इस्त्रायल आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या संघर्षाला १ महिन्याहून अधिक काळ लोटला आहे. या युद्धामुळे जगभरात महागाईचा धोका वाढला आहे. दरम्यान, भारत सरकारने एक अत्यंत महत्त्वाचे पाउल उचलले आहे. सरकारने मोठा निर्णय घेत पेट्रोकेमिकल उत्पादनांसह ४० उत्पादनांवरील आयात शुल्क पूर्णपणे रद्द केले आहे. जागतिक पुरवठा साखळी विस्कळीत होणे आणि कच्च्या तेलाच्या किंमतीत जोरदार वाढ लक्षात घेता देशातील वस्तूंचा तुटवडा आणि महागाई रोखण्यासाठी सरकारने हे पाउल उचलले आहे. ही सूट ३० जूनपर्यंत लागू राहणार आहे.सरकारने सीमा शुल्क हटविलेल्या उत्पादनांमध्ये प्रामुख्याने नॅहायड्रस, अमोनिया, मिथेनॉल, टोल्यून, स्टायरीन आणि विनाइल क्लोराईड मोनोमर्स यासारख्या आवश्यक वस्तूंचा समावेश आहे. याशिवाय मोठ्या प्रमाणात



उत्पादनात वापरल्या जार्णा या पालिथिलीन आणि पालीप्रोपाइलीन सारख्या श्रेणींनाही सूट देण्यात आली आहे. यासह, फार्मास्युटिकल्स आणि ऑटोमोटिव्ह पार्ट्सच्या निर्मितीमध्ये वापरल्या जाणार्या इपाक्सी रेजिन, पालीयुरेथेन आणि फार्मल्डिहाइड डेरिव्हेटिव्ह्जचा देखील या यादीमध्ये समावेश करण्यात आला आहे.

**उत्पादन शुल्कातही कपात-** २८ फेब्रुवारी रोजी अमेरिका व इस्त्रायलने संयुक्तपणे इराणवर हल्ला चढविला, त्यानंतर संघर्ष सुरू झाला. या संघर्षामुळे जागतिक स्तरावर कच्च्या तेलाच्या किंमती सुमारे ५० टक्क्यांनी वाढल्या आहेत. भारत आपल्या गरजेचा मोठा भाग मध्यपूर्वेतून आयात करतो. अशा परिस्थितीत त्याच्यासाठी ही चिंताजनक परिस्थिती होती. हा दबाव कमी करण्यासाठी सरकारने गेल्या आठवड्यातही काही मोठे निर्णय घेतले होते. पेट्रोल आणि डिझेलवरील उत्पादन शुल्कात प्रतिलिटर १० रुपयांनी कपात करण्यात आली आहे. सध्या पेट्रोलवर ३ रुपये प्रति लिटर उत्पादन शुल्क आहे, तर डिझेलवर ते मुक्त ठेवण्यात आले आहे.

# 3 चिमुकल्यांना विष पाजून पित्याची आत्महत्या

**सोलापूर /प्रतिनिधी**

उत्तर सोलापूर तालुक्यातील ति-हे गावात वडिलांनी स्वतःच्या तीन चिमुकल्या मुलांना विष पाजून स्वतःही विष प्राशन केल्याची घटना उघडकीस आली. उत्तर सोलापूर तालुक्यातील ति-हे गावात ही घटना घडली. भीमाअण्णा वाघमारे (३४) असे विष प्राशन केलेल्या व्यक्तीचे नाव असून, तो एका सिमेंट कंपनीत सिक्युरिटी गार्ड म्हणून काम करीत होता. भीमा वाघमारे आणि त्याच्या पत्नीमध्ये गेल्या काही दिवसांपासून घरगुती कारणावरून वाद सुरू होता. या वादातून पत्नी माहेरी निघून गेली होती. नातेवाईकांनी समजूत काढण्याचा प्रयत्न केला. मात्र, महिलेने सासरी परत येण्यास नकार दिला. याच मानसिक तणावातून भीमा वाघमारे याने आपल्या जानवी, प्रगती आणि बाबू या तीन लहान मुलांना वळसंगजवळील शेतात नेले. त्या ठिकाणी त्यांनी तिन्ही मुलांना विष दिले आणि त्यानंतर स्वतःही विष घेतल्याची प्राथमिक माहिती समोर आली. या घटनेत भीमा वाघमारेचा दुर्दैवी मृत्यू झाला तर तिन्ही लहान मुलांची प्रकृती गंभीर असून त्यांना तातडीने सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## भांडवल गुंतवणूक

सीमावाद, तणावपूर्ण राजनैतिक संबंध आणि डिजिटल पायाभूत सुविधांमध्ये वाढणारी परकीय उपस्थिती या सगळ्यांच्या पार्श्वभूमीवर सरकारने चीनकडून होणाऱ्या आयातीसाठी 'ऑटोमॅटिक रूट' ऐवजी 'गव्हर्नमेंट रूट' द्वारे मंजुरी आवश्यक केली. त्यामुळे प्रत्येक गुंतवणुकीची बारकाईने तपासणी करता येऊ लागली; मात्र काही वर्षांनंतर परिस्थिती बदलत गेली. जागतिक अर्थव्यवस्था मंदावली. पुरवठा साखळीतील अडथळे वाढले आणि उद्योगांना नव्या गुंतवणुकीची गरज भासू लागली. 'मेक इन इंडिया' सारख्या उपक्रमांना गती देण्यासाठी मोठ्या प्रमाणावर भांडवलाची आवश्यकता होती. अशा वेळी दरवाजे पूर्णपणे बंद ठेवणे भारताला आर्थिकदृष्ट्या परवडणारे नव्हते. याच पार्श्वभूमीवर निबंध शिथिल करण्याचा विचार पुढे आला. या निर्णयामागील एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे जागतिक स्पर्धा. व्हिएतनाम, इंडोनेशिया, बांगलादेश यासारखे देश परकीय गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी आक्रमक धोरणे राबवत आहेत. भारताने अत्यंत कठोर निर्बंध कायम ठेवल्यास गुंतवणूक इतर देशांकडे वळण्याचा धोका निर्माण झाला होता. त्यामुळे 'सुरक्षा' आणि 'विकास' यामध्ये संतुलन साधणे ही सरकारसमोरील मोठी कसरत होती. निर्बंध शिथिल करण्याचा अर्थ पूर्णपणे मोकळीक देणे असा नाही. उलट, अधिक सूक्ष्म आणि क्षेत्रनिहाय दृष्टिकोन स्वीकारण्याचा प्रयत्न दिसतो. संवेदनशील क्षेत्रांमध्ये दूरसंचार, संरक्षण, डिजिटल डेटावर कडक नियंत्रण कायम ठेवले जात असताना, उत्पादन, पायाभूत सुविधा आणि इतर औद्योगिक क्षेत्रांमध्ये गुंतवणुकीसाठी काही प्रमाणात सवलती दिल्या जात आहेत. म्हणजेच, 'निवडक उदारीकरण' ही या धोरणामागील मध्यवर्ती संकल्पना आहे. परकीय गुंतवणुकीमुळे उद्योगांना भांडवल मिळेल, रोजगारनिर्मिती होईल आणि तंत्रज्ञान हस्तांतरणाला चालना मिळेल. विशेषतः उत्पादन क्षेत्रात याचा मोठा फायदा होऊ शकतो. जागतिक कंपन्यांना भारतात उत्पादन केंद्रे उभारण्यास प्रोत्साहन मिळाल्यास आपला देश जागतिक पुरवठा साखळीतील एक महत्त्वाचा खेळाडू बनू शकतो. तथापि, या निर्णयाबाबत काही गंभीर चिंतादेखील व्यक्त केल्या जात आहेत. चीनसारख्या देशांकडून येणारी गुंतवणूक ही केवळ आर्थिक नसून, तिच्यामागे रणनीतिक उद्दिष्टे असू शकतात, अशी भीती व्यक्त केली जाते. विशेषतः स्टार्टअप्स, डिजिटल प्लॅटफॉर्म्स आणि डेटा संबंधित क्षेत्रांमध्ये परकीय नियंत्रण वाढल्यास राष्ट्रीय सुरक्षेवर दीर्घकालीन परिणाम होऊ शकतो. याशिवाय, स्थानिक उद्योगांवर होणारा परिणामही दुर्लक्षित करता येणार नाही. मोठ्या परकीय गुंतवणुकीमुळे स्पर्धा वाढेल; पण त्याच वेळी लघु आणि मध्यम उद्योगांना टिकून राहणे अधिक कठीण होऊ शकते. त्यामुळे सरकारने या क्षेत्रासाठी संरक्षणात्मक उपाययोजना करणे आवश्यक ठरते. शेजारी देशांच्या गुंतवणुकीवरील निर्बंध शिथिल करण्याचा निर्णय हा काळाच्या गरजेनुसार उचललेले एक व्यावहारिक पाऊल मानले जाऊ शकते; पण या निर्णयाचे यश केवळ प्रभावी अंमलबजावणीमध्ये आहे. पारदर्शकता, काटेकोर तपासणी आणि राष्ट्रीय हिताला प्राधान्य या तत्त्वांवर ठाम राहिल्यासच या धोरणाचा अपेक्षित लाभ मिळू शकतो. आजच्या युगात पूर्णतः बंद राहणे शक्य नाही आणि पूर्णतः उघडे होणेही धोकादायक ठरू शकते. त्यामुळे 'मध्यम मार्ग' स्वीकारणे हीच खरी शहाणपणाची भूमिका ठरते. केंद्र सरकारने गेल्या आठवड्यात परदेशी थेट भांडवल गुंतवणुकीसंबंधी काही धोरणात्मक बदल केले. मोबाइल फोनचे घटक आणि रेअर अर्थ मॅग्नेट्स, म्हणजेच दुर्मिळ खनिज क्षेत्रात गुंतवणूक वाढावी, हा त्यामागील हेतू आहे हे धोरण भारताच्या सीमेला लागून असलेल्या देशांशी संबंधित आहे. एप्रिल २०२० पासून सीमावर्ती देशांमधून येणाऱ्या (लँड बार्डरिंग कंट्रीज एलबीसी) गुंतवणुकीसंबंधात पूर्वी काही निर्बंध जाहीर करण्यात आले होते. त्यावेळी करोना होता आणि गलवान खोऱ्यात चीनने घुसखोरी केली होती. भारत आणि चीन यांचे संबंध अत्यंत तणावपूर्ण बनले होते. कोविड महामारीच्या काळात अनेक स्थानिक भारतीय कंपन्यांचे मूल्यांकन कमी झाले होते. त्यामुळे चिनी कंपन्यांनी, भारतीय कंपन्या ताब्यात घेऊन आपला फायदा करून घेतला असता. हे लक्षात घेऊन ही नियंत्रणे लादण्यात आली होती. आता भांडवली सामग्री, इलेक्ट्रॉनिक भांडवली वस्तू, इलेक्ट्रॉनिक घटक, पॉलिसीलिकॉन इनगॉट वेफर आणि रेअर मॅग्नेट या क्षेत्रांमध्ये 'एलबीसीं' कडून गुंतवणूक आल्यास ६० दिवसांमध्ये निर्णय घेतला जाणार आहे. दहा टक्क्यांपर्यंत भागभांडवल गुंतवणूक केली जाणार असल्यास त्याला ऑटोमेटिक मंजुरी दिली जाईल. मुख्यतः प्रायव्हेट इक्विटी आणि व्हेंचर कॅपिटल फंडांना या सवलतीचा अधिक फायदा मिळणार आहे. भारतात जास्तीत जास्त भांडवल तसेच तंत्रज्ञान यावे, त्याच वेळी कंपन्यांच्या मालकीवर भारतीयांचेच वर्चस्व रहावे, हा त्यामागील हेतू आहे. संरक्षण सामग्री, वाहने अशा उद्योगांमध्ये इलेक्ट्रॉनिक घटक आणि दुर्मिळ खनिजे हे महत्त्वाचे भाग असतात. उच्च किमतीच्या उद्योगांमध्ये ही सामग्री महत्त्वाची ठरते. दुर्मिळ खनिजांच्या प्रक्रिया क्षेत्रात जगात चीनचे वर्चस्व आहे आणि अमेरिकेबरोबरच्या टॅरिफ युद्धात चीनने याच गोष्टीचा फायदा घेतला. म्हणूनच या क्षेत्रात स्वयंपूर्णता प्राप्त करणे भारताच्या दृष्टीने देखील फायदेशीर आहे. जागतिक व्यापार क्षेत्रात अमेरिकेच्या वा कोणाच्याही दादागिरीचा मुकाबला करायचा असेल, तर या बाबतीत चीनचे अनुकरण करणे योग्य आहे. हे नवे धोरण भारत सरकार प्रभावीपणे अमलात आणेल, अशी अपेक्षा आहे. सध्या आखातात भूराजकीय तणाव वाढू लागला असून घरगुती गॅसचा तुटवडा पाहता केंद्र सरकारने युद्धपातळीवर उपाय सुरू केले आहेत. मालवाहतुकीचा खर्च वाढल्यामुळे सर्वच वस्तूंच्या किमतींमध्ये वाढ झाली आहे. कच्च्या तेलाचे दर ९० डॉलर प्रति बॅरल या दरापेक्षा वाढल्यास किरकोळ महागाई दर ०.८ टक्क्यांनी वाढण्याची भीती आहे. अर्थात भारतातच नाही, तर सर्वच देशांमध्ये अशी स्थिती आहे. या सर्व प्रतिकूल वातावरणाचा फटका विदेशी गुंतवणुकीला बसू शकतो; मात्र भारताला आपल्या उत्पादन क्षेत्राचा विस्तार करायचा असल्यामुळे आणि पुरवठा साखळीत खंड पडू नये ही इच्छा असल्याने, संकटातूनही मार्ग काढावा लागणार आहे, म्हणूनच केंद्र सरकारने विदेशी गुंतवणुकीसंदर्भात नियम शिथिल करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे विशेषतः चीनहून होणाऱ्या गुंतवणुकीवर गेल्या काही वर्षांपासून लागू असलेले निर्बंध हटवले जाणार आहेत.

# 'इंडिया' आघाडीसमोर आव्हान

**'इंडिया' आघाडी आज विस्कटण्याच्या उंबरठ्यावर आली आहे. राज्यसभा निवडणुकीचे निकाल, त्यातील 'क्रॉस व्होटिंग'च्या घटनांनी या आघाडीच्या पायालाच तडे दिले आहेत.**



भारतीय राजकारणात सत्ताधारी भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाखालील 'एनडीए'ला प्रबळ आव्हान देण्यासाठी ज्या मोठ्या अपेक्षेने 'इंडियन नॅशनल डेव्हलपमेंटल इन्क्लुझिव्ह अलायन्स' अर्थात 'इंडिया' आघाडीची स्थापना करण्यात आली होती, ती आता अंतर्गत संघर्षाच्या गर्तेत अडकल्याचे चित्र स्पष्ट होत आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत या आघाडीने भाजपला बहुमतापासून रोखण्यात काही प्रमाणात यश मिळवले असले, तरी त्यानंतरच्या सहा महिन्यांतच या मित्रपक्षांमधील विसंवाद पराकोटीला पोहोचला. विशेषतः अलीकडेच पार पडलेल्या राज्यसभा निवडणुकीचे निकाल आणि त्यातील 'क्रॉस व्होटिंग'च्या घटनांनी या आघाडीच्या पायालाच तडे दिले आहेत. या संपूर्ण प्रकरणाचा रोख आता आघाडीचे नेतृत्व करणाऱ्या काँग्रेस पक्षाकडे वळला असून, मित्रपक्षांनी काँग्रेसवर विश्वासघाताचा गंभीर शिक्का मारला आहे.

या राजकीय नाट्यातील सर्वात महत्त्वाचा अंक म्हणजे केरळचे मुख्यमंत्री आणि कम्युनिस्ट पक्षाचे (सीपीएम) ज्येष्ठ नेते पिनाराई विजयन यांनी केलेले विधान. त्यांनी काँग्रेसला थेट संघ परिवाराची बी टीम संबोधून खळबळ उडवून दिली. राज्यसभा निवडणुकीत काँग्रेसने प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे भाजपला मदत केली, असा त्यांचा आरोप आहे. ही टीका केवळ एका राज्यापुरती मर्यादित नाही, तर ती संपूर्ण आघाडीच्या मूळ उद्देशावर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारी आहे. आघाडीचा मुख्य पक्षच संशयाच्या भोवऱ्यात असतो, तेव्हा इतर प्रादेशिक पक्षांचा आत्मविश्वास डळमळीत होणे स्वाभाविक आहे. सीपीआयसारख्या पक्षांनीही काँग्रेसमधील अंतर्गत धुसफूस ओळखून ती वेळीच रोखण्याचा सल्ला दिला आहे. त्यांच्या मते, काँग्रेस आपल्या आमदारांची घोडेबाजार रोखण्यात अपयशी ठरली, ज्याचा फटका आघाडीच्या इतर उमेदवारांना बसला आणि भाजपला आयती संधी मिळाली.

या वादाचे मूळ कारण म्हणजे बिहार, हरियाणा आणि ओडिशामध्ये झालेल्या राज्यसभा निवडणुका. या राज्यांमध्ये काँग्रेसच्या काही आमदारांनी पक्षाच्या आदेशाचे उल्लंघन करून भाजपच्या उमेदवारांच्या बाजूने मतदान केले. क्रॉस वोटिंग केवळ काँग्रेसपुरते मर्यादित नव्हते आणि इतर काही प्रादेशिक पक्षांच्या आमदारांनीही भाजपला मदत केली असली, तरी आघाडीतील सर्वात मोठा पक्ष म्हणून काँग्रेसलाच टीकेचे धनी व्हावे लागत आहे. समाजवादी पक्षानेही काँग्रेसवर अत्यंत तिखट शब्दांत प्रहार केला आहे. काँग्रेस नेहमी ऐन मोक्याच्या वेळी मित्रपक्षांना धोका देते आणि त्यामुळे संपूर्ण महाआघाडीला मान खाली घालावी लागते, असे सपा प्रवक्त्यांनी म्हटले आहे. अशा विधानांमुळे हे स्पष्ट होते की, भाजपला रोखण्याच्या नावाखाली जमलेली ही मंडळी वैचारिकदृष्ट्या विखुरलेली आहेत.

राजकीय विश्लेषकांच्या मते, इंडिया आघाडीचे भविष्य आता अंधारात दिसत आहे. या विसंवादाचे सर्वात मोठे कारण म्हणजे, या पक्षांचे केंद्र आणि राज्यस्तरावरील परस्परविरोधी हितसंबंध. केंद्रात हे पक्ष भाजपला रोखण्यासाठी एकत्र आले असले, तरी राज्यांच्या राजकारणात ते एकमेकांच्या विरोधात आहेत. उदाहरणार्थ, पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेस आणि काँग्रेस-डावे यांच्यात विळ्या-भोपाळ्याचे नाते आहे. दिल्ली आणि पंजाबमध्ये आम आदमी पक्ष आणि काँग्रेस समोरासमोर आहेत. केरळमध्ये काँग्रेस आणि डावे यांच्यातच मुख्य लढत असते. 'दिल्लीत दोस्ती आणि गल्लीत कुस्ती' असे हे चित्र आहे. त्यामुळे मतदारांना काही पटवून देण्यात ही आघाडी अपयशी ठरली आहे. काँग्रेसला गमावलेली राष्ट्रीय प्रतिमा आणि राज्यांमधील सत्ता परत मिळवायची आहे; परंतु प्रादेशिक पक्ष त्यांना जागा सोडायला किंवा मोठेपण द्यायला तयार नाहीत. ही काँग्रेससाठी गळ्यात अडकलेल्या हाडासारखी स्थिती झाली आहे.

या कलहाचा परिणाम २०२४ नंतर झालेल्या विधानसभा निवडणुकांमध्ये स्पष्टपणे दिसून आला. महाराष्ट्रात नोव्हेंबर २०२४ मध्ये झालेल्या निवडणुकीत महायुतीने २३५ जागा जिंकून महाविकास आघाडीचा अक्षरशः धुव्वा उडवला. या पराभवानंतर काँग्रेस आणि उद्धव ठाकरेंची शिवसेना यांच्यातील आरोप-प्रत्यारोप शिगेला पोहोचले आहेत. दिल्लीत २०२५ च्या सुरुवातीला झालेल्या विधानसभा निवडणुकीत आप आणि काँग्रेसने स्वतंत्रपणे लढण्याचा निर्णय घेतला, ज्यामध्ये दोन्ही पक्षांचा दारुण पराभव झाला. पराभवानंतर 'आप'ने काँग्रेसला व्होट कटुआ (मते खाणारा पक्ष) ठरवले, तर राहुल गांधींनी केजरीवाल यांच्यावर भष्टाचाराचे आरोप केले. हे सर्व पाहता ही आघाडी केवळ निवडणुकीपुरता केलेला एक 'कागदी वाघ' ठरत आहे की काय, असा प्रश्न पडतो.

काँग्रेससमोरील आव्हाने केवळ बाह्य मित्रपक्षांकडूनच नाहीत, तर पक्षांतर्गत शिस्तीबाबतही आहेत. आमदारांचे क्रॉस व्होटिंग हे पक्षाचे आपल्या लोकप्रतिनिधींवर नियंत्रण राहिलेले नाही, ही बाब स्पष्ट करणारे आहे. काँग्रेसने या आमदारांवर कारवाई सुरू केली असली आणि हरियाणात राज्यपालांकडे घोडेबाजाराची तक्रार केली असली, तरी गेलेली विश्वासार्हता परत मिळवणे कठीण आहे. प्रादेशिक पक्षांना असे वाटू लागले आहे की, काँग्रेससोबत असण्यापेक्षा स्वतंत्र लढणे जास्त सुरक्षित आहे. भाजपच्या इलेक्शन मशिनचा मुकाबला करण्यासाठी ज्या शिस्तीची आणि रणनीतीची गरज आहे, तिचा या आघाडीत पूर्णतः अभाव दिसतो. भाजपचे संघटन ग्रासरूट स्तरावर अत्यंत मजबूत असताना, इंडिया आघाडी केवळ सोशल मीडिया आणि पत्रकार परिषदांपुरती मर्यादित राहिल्याचे राजकीय तज्ज्ञांचे मत आहे.

एकूणच इंडिया आघाडीचे टिकणे हे केवळ काँग्रेसच्या धोरणांवर अवलंबून नाही, तर प्रादेशिक पक्षांच्या लवचिकतेवरही अवलंबून आहे. या पक्षांनी संकुचित प्रादेशिक हित बाजूला ठेवून सामायिक कार्यक्रमावर लक्ष केंद्रित केले नाही, तर २०२९ च्या निवडणुकीपर्यंत या आघाडीचे अस्तित्व इतिहासाच्या पानांवर उरेल. भाजपला केवळ सत्तेतून बाहेर काढणे हा एकच उद्देश या पक्षांना दीर्घकाळ एकत्र ठेवू शकत नाही. त्यांना देशासमोर एक सकारात्मक आणि ठोस पर्याय ठेवावा लागेल. सध्याची स्थिती पाहता काँग्रेसवर होणारे 'बी-टीम'चे आरोप आणि मित्रपक्षांमधील अविश्वासाचे वातावरण हे एनडीएसाठी पथ्यावर पडणारे आहे. आगामी काही महिने या आघाडीसाठी 'करा किंवा मरा' अशा स्वरूपाचे असतील. कारण, यातून सुधारणा झाली नाही, तर विरोधी पक्षांच्या एकजुटीचे स्वप्न धुळीला मिळण्याची दाट शक्यता आहे.

**पोपट नाईकनवर**

# भारताच्या नौदलविरोधात पाकिस्तानचे 'मिशन सी सुलतान'

पाकिस्तानने भारतीय नौदलाविरोधात 'मिशन सी सुलतान' सुरू केले आहे. यासाठी पाकिस्तानी नौदलाने आपल्या ताफ्यात लांब पल्ल्याच्या सागरी गस्ती विमानांचा समावेश केला आहे. यामुळे अरबी समुद्रातील भारतीय पाणबुड्यांवरील धोका वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. पाकिस्तानचे हे पाऊल सामरिकदृष्ट्या महत्त्वाचे मानले जात आहे. शत्रूच्या पाणबुड्यांचा शोध घेण्यासाठी सागरी गस्ती विमाने कोणत्याही नौदलासाठी एक महत्त्वाचे साधन आहेत. तसेच, ती जहाजविरोधी कारवायांना मार्गदर्शनही करू शकतात.

मध्य पूर्वेत इराण विरुद्ध भीषण युद्ध सुरु असताना कुरापतखोर पाकिस्तानी नौदलाने भारताविरोधात 'मिशन सी सुल्तान' लॉन्च करून भारताला आव्हान देण्याचा प्रयत्न केला आहे. भारतीय नौदलाच्या आव्हानांचा सामना करण्यासाठी पाकिस्तानी नौदलाने 'सी सुल्तान' कार्यक्रम सुरु केला आहे. समुद्रातील भारतीय वर्चस्व कमी करणं आणि अरबी सागरात भारतीय पाणबुड्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवणे हा या मिशनचा मुख्य उद्देश आहे.



पाकिस्तानने 'सी सुल्तान' प्रोजेक्ट अंतर्गत ज्या समुद्री गस्ती विमानांचा समावेश केलाय त्यात एम्ब्रेयर लीनेज १००० ई-बिजनेस जेट विमाने आहेत. पाकिस्तानी नौदलाच्या अभियानासाठी खास पद्धतीने ही विमाने बनवण्यात आली आहेत. एडमिरल नवीद अशरफ यांनी पाकिस्तानी नौदलाच्या आधुनिकीकरणाचा भाग म्हणून या प्रकल्पाचा उल्लेख केला आहे. पाकिस्तानने ही विमाने विकसित करण्यासाठी इटलीच्या 'लिओनार्दो' आणि 'पॅरामाउंट' कंपनीशी करार केला आहे.

पाकिस्तानच्या 'सी सुल्तान' प्रकल्पाच्या तुलनेत भारताची सागरी शक्ती अधिक मजबूत आणि व्यापक आहे. भारतीय नौदल हिंद महासागर क्षेत्रात आपली समुद्री टेहळणी क्षमता अत्याधुनिक टेक्नोलॉजी, स्वदेशी युद्धनौका आणि अत्याधुनिक विमानांद्वारे मजबूत करत आहे. भारतीय नौदल समुद्री टेहळणीसाठी पी-८आय पोसायडन विमानाचा वापर करते. बोइंग कंपनीने बनवलेले हे विमान आहे. लांब पर्यंत नजर ठेवणे आणि खास पाणबुडी विरोधी युद्धासाठी हे विमान डिझाइन करण्यात आले आहे. त्याशिवाय भारतीय नौदलाकडे MH-60R 'रोमियो' हेलिकॉप्टर सुद्धा आहेत. ही हेलिकॉप्टर्स खोल समुद्रातील शत्रुच्या पाणबुड्या शोधून ते नष्ट करण्यासाठी सक्षम आहे.

भारतीय नौदलाकडून पाणबुडी विरोधी जहाज सुद्धा ऑपरेट केली जातात. यात आयएनएस माहे, आयएनएस अर्नाळा आणि आयएनएस आन्द्रोत सारख्या युद्धनौका आहेत. भारताकडे २९३ हून अधिक नौदल मालमत्ता आहेत, तर पाकिस्तानकडे १२१. प्रगत गस्त विमान आहे 'सी सुल्तान' ला चोख प्रत्युत्तर देण्यासाठी भारत दाग्हु इ-८६ नजूल्हा विमाने वापरतो, जी लांब पल्ल्याच्या सागरी गस्तीसाठी अत्यंत प्रगत आहेत. भारताकडे विमानवाहू युद्धनौका आहे. (भारताकडे घ्ए विक्रमादित्य आणि INS विक्रांत या दोन विमानवाहू नौका आहेत, ज्यामुळे भारताची निळ्या पाण्यातील क्षमता पाकिस्तानपेक्षा खूप जास्त आहे. भारताकडे अण्वस्त्रसज्ज आणि पारंपरिक पाणबुड्यांचा मोठा ताफा आहे, जो हिंदी महासागरात पाकिस्तानच्या हालचालींवर बारीक नजर ठेवतो.

**प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल,** वर्धा
मो.९५६१५९४३०६

# भोंदूगिरीचा सुळसुळाट आणि हरवलेला विवेक

नाशिकच्या एका भोंदू बाबाच्या अघोरी कृत्यांनी सध्या संपूर्ण महाराष्ट्र ढवळून निघाला आहे. या प्रकरणात केवळ सामान्य जनताच नाही, तर मोठे राजकीय नेते, उच्चपदस्थ प्रशासकीय अधिकारी आणि महिलांचाही सहभाग असल्याचे समोर आले आहे. सरकार या प्रकरणाची चौकशी करून योग्य ती कारवाई करेलच; परंतु या निमित्ताने एक भीषण सामाजिक प्रश्न ऐरणीवर आला आहे: प्रगत आणि वैचारिक वारसा लाभलेल्या महाराष्ट्रात माणूस अशा भोंदूंच्या नादी इतका का लागतो?

## माझेही मत

आजच्या 'इन्स्टंट' युगात माणसाला प्रत्येक गोष्ट तात्काळ हवी आहे. कष्ट, संयम आणि सातत्य या शब्दांचा जणू विसरच पडत चालला आहे. जीवनात कोणतेही संकट आले की, त्याला धैर्याने तोंड देण्याऐवजी किंवा परिश्रमाने मार्ग काढण्याऐवजी माणूस 'चमत्कारी' उपायांच्या मागे धावू लागतो. याच असुरक्षिततेचा आणि 'शॉर्टकट' शोधण्याच्या वृत्तीचा फायदा हे तथाकथित भोंदूबाबा घेतात. तेव्हा समाजाच्या वैचारिक प्रगतीवर मोठे प्रश्नचिन्ह उभे राहते. संकटाच्या काळात हिंमत न हारता कष्टावर आणि देवावर, सत्यावर विश्वास ठेवणे हा खरा धर्म आहे, पण दुर्दैवाने क्षणिक सुखाच्या नादात विवेकाचा बळी दिला जात आहे.

महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य असून येथे कडक 'अंधश्रद्धा निर्मूलन कायदा' अस्तित्वात आहे. तरीही, लोक स्वतःहून या संकटाच्या गर्तेत ओढले जातात आणि स्वतःचे आयुष्य उद्ध्वस्त करून घेतात, हे दुर्दैव आहे.

वेळ आली आहे आता की समाजाने आता अंतर्मुख होऊन विचार करावा. चमत्काराने आयुष्य बदलत नसते, ते केवळ प्रामाणिक कष्टाने आणि विचारी आचरणानेच घडते. सरकारने कायद्याचा बडगा उगारणे आवश्यकच आहे, पण त्यासोबतच आपण आपली विवेकबुद्धी जागृत ठेवून अशा प्रवृत्तींना थारा न देणे, हेच या सामाजिक आजारावरचे खरे उत्तर आहे. अन्यथा, या अंधश्रद्धेच्या आहारी जाऊन नाहक बळी जातील.

**अविनाश देशपांडे**

## रेडीरेकनर दर स्थिर पण..!

यंदाच्या आर्थिक वर्षासाठी रेडी रेकनरच्या दरामध्ये कोणती वाढ न करता स्थिर ठेवण्याचा निर्णय वाचण्यात आला. निर्णय स्वागतार्थ आहे परंतु अगोदरच सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेरचे दर असताना त्यात मुद्रांक शुक्ल, नोंदीची फी आदी अन्य करांची एकूण बेरीज, मालमत्तांचे बाजार भाव पाहता मध्यमवर्गीय सामान्य माणसास ते आजच्या घडीलाच न पेलणारे, न परवडणारे आहेत त्यामुळे मध्यमवर्गीय माणूस नाईलाजाने मोठ्या शहरांच्या बाहेर जातोय तो सर्वसामान्य माणूस ज्या वेळी त्याच्या पसंतीच्या मोठ्या शहरातच स्थिरावेल यासाठी परवडणाऱ्या घरांसाठीचे ठोस धोरण राबविणे गरजेचे आहे तेव्हाच विकासाचा सुदिन उगवेल.

**विश्वनाथ पंडित**

## ट्रम्प यांची धरसोड वृत्ती

गेले महिनाभर अमेरिका-इस्त्राएल व इराण यांचे युद्ध सुरु आहे. या युद्धात ट्रम्प यांची भूमिका सतत बदलती आहे. कधी ते नाटो राष्ट्रांची मदत मागतात तर कधी त्याची गरज नाही असे भासवितात. तेहरान मधील अणुऊर्जा प्रकल्पाबाबत सुविधा नष्ट करण्याची धमकी देणे व लगेच काही तासात तो हल्ला पुढे ढकलणे. अमेरिकेचा काही राज्यात ट्रम्प विरोधी आंदोलनाने वातावरण ढवळून निघाले. काही दिवसापूर्वी हॉर्मुझ समुद्रधुनीचे रक्षणासाठी युरोपिअन राष्ट्रांची मदत मागितली होती तर दुसऱ्या बाजूला आम्हाला मदतीची गरज नाही आम्ही सार्वभौम आहोत असेही सांगितले. खुद्द अमेरिकेत सुद्धा ट्रम्प विरोधी वातावरण आहे. एक सर्वेक्षणानुसार ६१टक्के नागरिकांनी ट्रम्प यांच्या विरोधी मत नोंदविले आहे तर ३७ टक्के लोकांनी समर्थन दिले आहे . एकूणच ट्रम्प यांना अमेरिकेत सुद्धा निर्भेळ सपोर्ट नाही. नाटो राष्ट्रांनी तर विरोध प्रदर्शित केला आहे. सर्वात महत्वाचा मुद्दा हे युद्ध केव्हा संपणार? या युद्धामुळे जगभरात तेलाचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. अनेक देशात किमती वाढल्या आहेत. काही देशांनी यावर काही उपाय सुद्धा योजले आहेत ट्रम्प आता युद्धविराम घेणार का? कारण या युद्धाचा परिणाम खुद्द अमेरिकेसह जगाला होत आहे .ट्रम्प यांच्याकडे कोणतीही ठोस भूमिका दिसत नाही . खरे तर इराणने त्यांना जेरीस आणले आहे. इराणचे सुद्धा खूप नुकसान झाले आहे . जगातील कोणत्याही राष्ट्राने ट्रम्प यांना पाठींबा दिलेला नाही. ट्रम्प यांनी युद्ध विरामाची घोषणा करून त्याची त्वरित अंमलबजावणी करणे जरूर आहे.

**शांताराम वाघ**

## मुलांना पोहायला शिकवताय.... जरा जपून

मागील काही वर्षांपेक्षा यंदा उन्हाळ्यातील उष्णतेचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून येते आहे सकाळी दहा नंतर उन्हाचे चटके बसू लागल्याने अंगाची लाहीलाही होत आहे अशातच शाळांना उन्हाळी सुट्टी पडली आहे त्यामुळे मुले घरातच आहेत याच संधीचा फायदा घेऊन पालक आपल्या पाल्यांना पोहायला शिकविणेसाठी नदी, विहीर, तलाव या ठिकाणी घेवून जात आहेत यामध्ये लहान मुलेसुद्धा पोहायला जात आहेत नदी - विहिरीवर मुलांची गर्दी असल्यामुळे कोण कुठे पोहत आहेत हे समजत नसल्याने अडचणीचे ठरू शकते मुलांना पोहायला शिकवून झाल्यानंतर पालक अंघोळ करत असतात याच संधीचा फायदा घेऊन मुले नदी, विहीर, तलाव याकडे डोकावून पाहणे, दगड मारणे यासारखे खेळ खेळत असतात मात्र हाच खेळ जीवावर बेतण्याची शक्यता नाकारता येत नाही. लहान मुलांना नदी, विहीर अथवा तलावामधील पाण्याचा अंदाज येत नसल्याने मुले पाण्यामध्ये बुडण्याची शक्यता असते अनेक ठिकाणी पोहायला गेल्यावर मुले पाण्यात बुडून मृत्यू झाल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. मुलांच्या जीवनामध्ये पोहायला शिकणे अत्यंत गरजेचे आहे त्यासाठीच पालक प्रयत्न करत असतात मात्र लहान मुलांना पाण्याचा अंदाज लागत नसल्याने अथवा त्याची माहिती नसल्याने अशा दुर्दैवी घटना घडतात त्यासाठी पालकांनी जबाबदारीने, आपण अंघोळ करताना लक्ष ठेवून पोहायला शिकवले पाहिजे तरच अशा घटनांना आळा बसेल.

**राजू जाधव**

शुक्रवार, ३ एप्रिल २०२६
E-mail :-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सत्य

आरोग्य विभाग ठरले कुचकामी, आठ दिवसापासून घंटागाडी गेली सुट्टीवर ;नागरिक कचरा टाकत आहे रस्तावर!

# महावीर नगर मधील नागरिक अनेक समस्याच्या विळख्यात

■ जनमाध्यम प्रतिनिधी

**पुसद :** नगर परिषद अंतर्गत प्रभाग क्रं.१५ मध्ये येत असलेल्या महावीर नगर मध्ये सर्वत्र घाणीचे साम्राज्य पसरले असून यामुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे. महावीर नगर मध्ये दलित वस्ती योजनेअंतर्गत २० वर्षा अगोदर रोड व नाल्या झाले आहे तेव्हापासून या ठिकाणी कोणतेही विकासात्मक काम झाले नसून या नगरातील रोड मध्ये खड्डे पडले आहे व नाल्या फुटल्या आहे त्यामुळे सांडपाणी सर्वत्र पसरल्यामुळे पाण्याची दुर्गंधी येत आहे. गेल्या एक महिन्यापासून नाल्या साफसफाई न केल्यामुळे गाळ व कचरा तुडुंब भरल्याने मच्छराचा प्रदुभाव वाढला आहे.

गेल्या एक महिन्यापासून या ठिकाणी कर्मचारी साफसफाई करण्यासाठी फिरकले सुद्धा नाही त्यामुळे लहान मुलाच्या जीवितास धोकादायक ठरू शकते डासांचा प्रदुभाव वाढल्यामुळे साथीच्या रोगाचे प्रमाण वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच गेल्या आठ दिवसापासून कचरा नेण्यासाठी असलेली घंटागाडी ही महावीर नगर मध्ये कचरा घेण्यासाठी आली नसल्यामुळे नागरिकांच्या घरात भरगच्च कचरा जमा झाल्यामुळे नागरिक हा कचरा रोडवर टाकत आहे. त्यामुळे नगरात सर्वत्र दुर्गंधी पसरली आहे त्यामुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. नगरपरिषद आरोग्य विभागात नगरातील



नागरिकांनी वारंवार तोंडी सूचना करून तसेच आरोग्य सभापती व कर्मचारी यांना फोनवर संभाषण करून महावीर नगर मधील समस्याचा पाढा वाचून दाखविला परंतु यावर तीळ मात्र त्यांच्याकडून प्रतिसाद मिळाला नाही व दखलही घेण्यात आली नाही. त्यामुळे नगरातील काही सुज्ञ नागरिकासह नगरपरिषद समोर आरोग्य विभाग व घंटागाडी यांच्या विरोधात रिपाइं आठवले व भिमशक्ती सामाजिक संघटने कडून आंदोलन करण्याच्या तयारीत आहेत असे काही सामाजिक कार्यकर्त्याकडून व नागरिकाकडून सांगण्यात आले आहे.

पुसद नगरपरिषद मधील आरोग्य विभागात एकूण सफाई कर्मचारी पुरुष (१०३)आहे तर महिला सफाई कर्मचारी ह्या (७९) आहेत परंतु सफाई कर्मचाऱ्यापैकी दररोज सफाई काम करण्यासाठी दररोज २० ते २५ कर्मचारी कामावर येतात आणि इतर बाकी गायब राहतात तरीही त्यांचा दरमहा पगार निघतो यामागे दरमहा प्रत्येक कर्मचारी यांच्याकडून १० हजार रुपये दरमहा ठरलेला हप्ता मिळत असल्यामुळे या कर्मचाऱ्यांना सूट दिली आहे आणि महीन्याकाठी या कर्मचाऱ्यांकडून ५ ते ७ लाख रुपये जमा होऊन यामध्ये मुख्य प्रशासन आरोग्य विभाग व इतर यामध्ये हिसे वाटणी होऊन हा गौड बंगाल अनेक वर्षांपासून सुरू आहे. मागील प्रभारी असलेले मुख्याधिकारी यांनी हा प्रकार उजेडात आणला होता परंतु त्या अच्छा मुख्याधिकाऱ्यांचा प्रभार काढून घेण्यात आला त्यामुळे नगरपरिषद मधील प्रशासनासह आरोग्य विभाग हा कुचकामी ठरत आहे याची विद्यमान असलेले मुख्याधिकारी यांनी या प्रकरणाचा छडा लावून सर्व कर्मचाऱ्यांना सफाई कामावर रुजू करून घेण्यात यावे व पुसद शहरातील संपूर्ण प्रभागात साफसफाई करून नागरिकांच्या समस्या सोडविण्यावर भर द्यावी अन्यथा पुढील काळात आंदोलन केल्याशिवाय पर्याय नाही..रिपाइं आठवले व भिमशक्ती सामाजिक संघटना पुसद.

महागाव तालुका पत्रकार संघाचा आंदोलनाचा इशारा

## पत्रकारावर खोटे गुन्हे दाखल करणाऱ्या ठाणेदारांवर कारवाई करा




■ जनमाध्यम प्रतिनिधी
किरण नरवाडे


**महागाव :** लोकशाहीचा चौथा स्तंभ मानल्या जाणाऱ्या पत्रकारांवर यवतमाळ जिल्ह्यात पोलीस प्रशासनाकडून सूडबुद्धीने कारवाई होत असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. उमरखेडचे ठाणेदार शंकर पांचाळ यांनी पत्रकार अमित देशमुख यांच्यावर दाखल केलेल्या गुन्ह्याचा निषेध करत, महागाव तालुका पत्रकार संघाने तहसीलदार महागाव यांच्यामार्फत जिल्हा पोलीस अधीक्षकांना निवेदन देऊन ठाणेदारांवर निलंबन करून फौजदारी कारवाई करण्याची मागणी केली आहे.

उमरखेड येथील 'धाडस ००७ न्यूज' चॅनलचे पत्रकार अमित देशमुख यांनी उमरखेड तालुक्यातील अवैध धंद्यांचे पितळ पुराव्यासह उघडे पाडले होते. या बातम्यांमुळे संतप्त झालेल्या ठाणेदार शंकर पांचाळ यांनी आपल्या अधिकाराचा गैरवापर करत पत्रकार देशमुख यांच्यावर आयपीसी ३५३ (सरकारी कामात अडथळा) व बीएनएस अंतर्गत खोटा गुन्हा दाखल केल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. ही कारवाई निव्वळ सूडबुद्धीने आणि अवैध धंदेवाल्यांना पाठबळ देण्यासाठी केल्याचे पत्रकारांचे म्हणणे आहे.

'जर पत्रकाराने खरोखरच सरकारी कामात अडथळा आणला असेल, तर त्यावेळचे सीसीटीव्ही फुटेज पोलिसांनी तात्काळ सार्वजनिक करावे,' अशी मागणी पत्रकार संघाने करून सदर फुटेज समोर आल्यास ठाणेदारांचा खोटेपणा उघड होईल, असा विश्वासही व्यक्त करण्यात आला आहे. केवळ स्वतःचे अपयश झाकण्यासाठी एका पत्रकाराचा आवाज दाबण्याचा हा प्रयत्न असल्याचा संताप व्यक्त होत आहे. ठाणेदार शंकर पांचाळ यांना तातडीने निलंबित करून त्यांची सीआयडी चौकशी व्हावी, पत्रकार अमित देशमुख यांच्यावर दाखल केलेले खोटे गुन्हे तात्काळ मागे घ्यावेत.,अवैध धंद्यांना संरक्षण देणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली. या निवेदनाद्वारे प्रशासनाला स्पष्ट इशारा देण्यात आला आहे की, जर दोषी ठाणेदारावर ठोस कारवाई झाली नाही, तर महागाव तालुका पत्रकार संघाच्या वतीने जिल्ह्यातील सर्व पत्रकारांना सोबत घेऊन तीव्र आंदोलन छेडले जाईल. पत्रकारांच्या सन्मानाला धक्का लागल्यास निर्माण होणाऱ्या जनक्षोभाला पोलीस प्रशासनच जबाबदार असेल, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. सदर निवेदन नायब तहसीलदार गजानन पराते,पुरवठा निरीक्षक मोहन कोल्हे यांनी स्विकारले. या निवेदनावर महागाव तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष महेश कामारकर,उपाध्यक्ष किरण नरवाडे,सचिव रमेश देशमुख,मार्गदर्शक रितेशभाऊ पुरोहित,माजी अध्यक्ष संतोष जाधव, रवि कावळे,संजय पाटे,विजय सुर्यवंशी,निलेश नरवाडे,विशाल डहाळे,शेरखान पठाण,संजय नरवाडे,अशोक राऊत ,विलास गावंडे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## मातोश्री विद्यालय महागावच्या दोन संघांची राज्यस्तरावर झेप

■ जनमाध्यम प्रतिनिधी



**महागाव :** शालेय शिक्षण विभाग व क्रीडा विभाग महाराष्ट्र शासन द्वारा आयोजित विभागस्तरीय वयोगट १७१९ च्या थ्रोबॉल संघात मुली मुलांच्या संघाने आपली खेळ कौशल्य प्रदर्शित करून विभागीय सामन्यात आपले स्थान पक्के केले राज्यस्तरावर आपली छाप पाडली. या खेळामध्ये खेळाडू ओम गावंडे कर्णधार वयोगट सतरा वर्षे कृष्णा वळसे, साहिल खोसे, रुद्रवीर राऊत, शिवा नेवारे, श्रीकृष्ण गावंडे, गौरव आखाडकर, गौरव गावंडे, सोहम पतके, पवन राऊत, सोहम राऊत, रोहित वानखेडे, या संघाने कार्य कुशलता व चेंडूची झेल अतिशय चुरशीने प्रदर्शित करून राज्यस्तरावर आपली झेप कायम केली . १९ वर्षे वयोगट संघाची कर्णधार म्हणून पल्लवी पहुरकर, प्रगती पहुरकर, जान्हवी नरवाडे, साक्षी कदम ,रोहिणी कदम, सानिका राऊत, उन्नती घोडे, रोशनी घोडे, तेजस्विनी चव्हाण ,प्रशांती नरवाडे, समृद्धी कदम ,श्रुतिका येनकर यांचा समावेश होता या संघाची वाशिम अमरावती अकोला या संघाचा बॉल अचूक झेल करून आपल्या धुरंधर खेळाने यश संपादन केले व आपली राज्यस्तरासाठी निवड निश्चित केली. संघाचे सर्वत्र कौतुक होत असून खेळाडूंचे संस्थेच्या वतीने व कर्मचारी वृंदाच्या वतीने स्वागत करण्यात आले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत.

## शिवरामजी मोघे महाविद्यालयात राष्ट्रीय परिषदेचे थाटात उद्घाटन

■ जनमाध्यम प्रतिनिधी

**पांढरकवडा :** स्थानिक शिवरामजी मोघे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या वतीने "एकविसाव्या शतकातील शाश्वत विकास" या विषयावर आयोजित एक दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे थाटात उद्घाटन संपन्न झाले. विद्यापीठ गीत व महाराष्ट्र गीताने परिषदेची सुरुवात करण्यात आली.

या परिषदेच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्राचे माजी मंत्री मा. शिवाजीराव मोघे होते. अध्यक्षीय भाषणात त्यांनी विद्यार्थ्यांनी एमपीएससी, यूपीएससी सारख्या स्पर्धा परीक्षांमध्ये यश संपादन करून अधिकाराच्या व मानाच्या पदांवर पोहोचावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू मा. डॉ. मिलिंद अ. बारहाते यांच्या हस्ते परिषदेचे उद्घाटन करण्यात आले. उद्घाटकीय भाषणात त्यांनी राष्ट्रीय परिषदेच्या आयोजनाबद्दल समाधान व्यक्त करत आदिवासीबहुल ग्रामीण भागातील या परिषदेसाठी विविध क्षेत्रांतील संशोधकांनी १७४ शोध निबंध पाठविल्याबद्दल आनंद व्यक्त केला. भविष्यातही अशा परिषदांचे आयोजन होऊन विविध विषयांवर व्यापक चर्चा व्हावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. रिद्धपूर, अमरावती येथील मराठी भाषा विद्यापीठाचे कुलगुरू मा. डॉ. अविनाश आवलगावकर हे बीजभाषक म्हणून उपस्थित होते. तसेच मराठी भाषा ही ज्ञान संपादनासाठी सक्षम भाषा असल्याचेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे तथा संस्थेचे सचिव व संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे सिनेट सदस्य मा. विजय मोघे यांनी आपल्या मार्गदर्शनात परिसरात विज्ञान शाखेची सोय उपलब्ध करून दिल्यामुळे विद्यार्थ्यांना मोठा फायदा झाला असून, त्याचेच फलित म्हणजे ही राष्ट्रीय परिषद असल्याचे सांगितले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय सोळंके यांनी प्रास्ताविकातून परिषदेची भूमिका स्पष्ट करून महाविद्यालयात राबविण्यात येणाऱ्या विविध शैक्षणिक उपक्रमांची माहिती दिली. संशोधक विद्यार्थी व पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. परिषदेच्या यशस्वी आयोजनासाठी प्राचार्य डॉ. अजय सोळंके तसेच सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## दुचाकी लंपास

**यवतमाळ :** येथील तहसील चौक परिसरातून भरदिवसा दुचाकी (एमएच २९ क्यू ९४९०) लंपास झाली. ही घटना २६ मार्च रोजी भरदिवसा घडली. दारव्हा तालुक्यातील बोरीअरब येथील विनोद प्रल्हादराव नागपुरे (५१) हे काही कामानिमित्त यवतमाळच्या तहसील चौकात आले होते. त्यावेळी चोरट्याने त्यांची गाडी लांबविली. या प्रकरणी नागपुरे यांच्या तक्रारीवरुन अवधुतवाडी पोलिसांनी अज्ञात चोरट्यावर गुन्हा दाखल केला आहे.

## पाण्याची मोटार लंपास


**यवतमाळ :** शेतात सिंचनासाठी लावलेली ८ हजार रुपये किमतीची मोटार अज्ञात चोरट्याने लंपास केली. ही चोरी राळेगाव तालुक्यातील झाडगाव शिवारात २५ ते २६ मार्चदरम्यान घडली. या प्रकरणी शेतकरी हनुमान अजाबराव डोंगरे (४४) रा. झाडगाव यांनी राळेगाव पोलिसात तक्रार दाखल केली असून पोलिसांनी अज्ञात चोरट्यावर गुन्हा नोंदविला आहे.

## पालनपोषण न करणारे शिक्षकास दरमाह १५ हजार रूपयची खाऊटी

न्यायालयाचा आदेश

■ जनमाध्यम प्रतिनिधी

**पुसद:** तालुक्यातील मौजा कन्हेरवाडी ता.पुसद येथील लक्ष्मीबाई माघाडे हिचा मुलगा तुकाराम माघाडे अणि त्याची पत्नी पालनपोषण करत नसल्याने लक्ष्मीबाई हिने मुलगा अणि सुनेच्या विरोधात पुसद येथील न्यायल्यात फौ.कि.अर्ज. क्र ८२/२०२१ हे प्रकरण खाऊटी ची रकम ठरवून मिळण्या करीता दाखल केले होते, वरील प्रकरणात पुसद येथील वि. ४ थे न्याय दंडाधिकारी प्र. श्रे. (अमिता यु यादव न्यायधीश मॅडम) यांनी अंतिम आदेश पारित करून लक्ष्मीबाई यांचा मुलगा अणि सुन यांनी लक्ष्मीबाई हिला केस दाखल तारखे पासून दर माह १५ हजार रुपये खाऊटी ची रक्कम द्यावी असे अंतिम आदेश पारीत केले आहे.या आदेशाने लक्ष्मीबाईला न्याय मिळाला असून ज्या आई वडिलांचे पालणपोषण मुल किंवा सून करत नसेल त्यांच्या साठी हा निकाल मार्गदर्शक ठरेल असा चर्चेचा विषय झाला आहे, पीडित आई लक्ष्मीबाई यांच्या वतीने वकील ॲड.शाहेद शेख. पुसद यांनी सक्षमरीत्याने बाजू मांडली आहे.



## पांढरकवडा मुस्लिम कब्रस्तानमध्ये पथदिव्यांचा अभाव

■ जनमाध्यम प्रतिनिधी

**पांढरकवडा :** शहरातील मुस्लिम कब्रस्तानमध्ये पथदिव्यांचा अभाव असल्यामुळे रात्रीच्या वेळी अंत्यविधी करताना नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या गंभीर समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी 'मुस्लिम युवा वर्ग, पांढरकवडा' यांच्या वतीने नगर परिषद मुख्याधिकाऱ्यांना मागणीचे निवेदन सादर करण्यात आले आहे. सध्या कब्रस्तान परिसरात कायमस्वरूपी वीजपुरवठा किंवा पथदिव्यांची पुरेशी व्यवस्था नसल्याने सायंकाळनंतर संपूर्ण परिसर अंधारात बुडतो. अशा परिस्थितीत, एखादी दुःखद घटना घडल्यास रात्रीच्या वेळी दफनविधी करताना नागरिकांना मोबाईल टॉर्च किंवा बॅटरीच्या प्रकाशाचा आधार घ्यावा लागतो. यामुळे केवळ गैरसोयच होत नाही, तर सुरक्षेच्या दृष्टीनेही धोका निर्माण होतो आणि धार्मिक विधींमध्ये अडथळे येतात.

नागरिकांची तीव्र नाराजी




युवा वर्गाने दिलेल्या निवेदनात कब्रस्तानच्या मध्यभागापासून शेवटच्या टोकापर्यंत हायमास्ट दिवे किंवा एलईडी पथदिव्यांची तातडीने उभारणी करण्याची मागणी करण्यात आली आहे. या सुविधेमुळे रात्रीच्या वेळी नागरिकांची गैरसोय दूर होऊन दफनविधी अधिक सुलभ होईल, असे त्यांनी नमूद केले. नगरसेवक मोहम्मद युसुफ यांच्या मार्गदर्शनाखाली हे निवेदन देण्यात आले. यावेळी शाकीर शेख, अतिक शेख (वार्ताहर), माजिद खान, वाजीद कुरेशी (वार्ताहर), सलमान बेग, निसार पोसवाल, कामिल राणा, करीम गौरी, रमीम शेख, रजा सय्यद, मोईज अन्सारी, शाहरुख कुरेशी यांच्यासह मुस्लिम युवा वर्गाचे अनेक प्रतिनिधी उपस्थित होते. दरम्यान, प्रशासनाने या समस्येचे गांभीर्य लक्षात घेऊन तातडीने पथदिव्यांची व्यवस्था करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

पांदन रस्ते आणि अतिवृष्टीच्या मदतीपासून वंचित शेतकऱ्यांबाबत आढावा बैठक

## आ. तोडसाम यांची SIR मॅपिंग प्रक्रिया

■ जनमाध्यम प्रतिनिधी

**घाटंजी :** काल २ एप्रिल रोजी घाटंजी तहसील कार्यालय येथे आर्णी केळापूर विधानसभेचे आमदार प्रा. श्री राजूभाऊ तोडसाम यांनी निवडणूक आयोगाच्या डखठ मॅपिंग प्रक्रियेबाबत आढावा बैठक घेतली. यावेळी घाटंजी तहसीलचे तहसीलदार विजय साळवे, घाटंजी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी राजू घोडके, नायबतहसीलदार राठोड निवडणूक विभाग,विजयजी बैस तालुकाध्यक्ष भाजपा ,नरेंद्र नारलावार डखठ विधानसभा प्रमुख आदी उपस्थित होते. सदर बैठकीत निवडणूक आयोगाच्या डखठ मॅपिंग प्रक्रियेबद्दल सविस्तर चर्चा करण्यात आली सोबतच शासनाने जारी केलेल्या मुख्यमंत्री बळीराजा पांदन रस्ता आणि २०२६ मध्ये अतिवृष्टीने नुकसान झालेल्या परंतु नुकसान भरपाई पासून वंचित



असलेल्या शेतकऱ्यांविषयी चर्चा करून त्यांना तात्काळ मदत मिळावी यासाठी आमदार साहेबांनी संबंधित अधिकार्यांना निर्देश दिले.निवडणूक आयोगाच्या डखठ मॅपिंग प्रक्रिया समजून घेण्यासाठी तालुक्यातील प्रशासनाने नेमून दिलेले बी एल ओ आणि राजकीय पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते यावेळी आमदार साहेब यांनी प्रत्येक बी एल ओ यांना डखठ प्रक्रियेसंबंधि लवकर काम चालू करून मतदारांची माहिती गोळा करण्याचे आणि काही अडचण आल्यास वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचे आवाहन केले.

## महावीर जयंती निमित्त वणीत भव्य शोभायात्रा

शहरात भक्तिमय वातावरण



**वणी :** महावीर जयंतीच्या पावन निमित्ताने वणी शहरात भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते.या शोभायात्रेत जैन समाजासह विविध समाजातील नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून शहरात भक्तिमय वातावरण निर्माण केले.

शोभायात्रेची सुरुवात शहरातील जैन मंदिरातून करण्यात आली. भगवान महावीरांच्या प्रतिमेची आकर्षक सजावट करून ती रथावर विराजमान करण्यात आलीहोती.ढोल–ताशांच्यागजरातआणि 'महावीरस्वामीकीजय'च्याघोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. कार्यक्रमादरम्यान महावीर स्वामींच्या अहिंसा, सत्य आणि करुणेच्या संदेशाचा प्रसार करण्यात आला. तसेच समाजहितासाठी विविध उपक्रम राबविण्याचे आवाहनही करण्यात आले.या शोभायात्रेत स्थानिक आमदार संजय देरकर, शिवसेना जिल्हा संघटक विजय बाबू चोरडिया,महाविर कटारिया,खिवंसरा,बतराजी, विनोद ढुमने,मनिष बतरा, अभय झाबक इत्यादींनी हजेरी लावली होती. या शोभायात्रेच्या यशस्वी आयोजनासाठी जैन समाजातील पदाधिकारी,युवक मंडळे आणि स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले.

## हरवलेले १४ मोबाईल शोधून नागरिकांना केले परत

■ जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ शहर पोलिसांची उल्लेखनीय कामगिरी

**यवतमाळ :** पोलीस व नागरिक यांच्यातील समन्वय अधिक मजबूत करण्याच्या उद्देशाने यवतमाळ जिल्हा पोलीस दलाकडून "ऑपरेशन प्रस्थान" अंतर्गत राबविण्यात आलेल्या उपक्रमातून हरवलेले मोबाईल शोधून नागरिकांना परत देण्याची उल्लेखनीय कामगिरी करण्यात आली आहे.



पोलीस स्टेशन यवतमाळ शहर येथे नागरिकांनी आपले मोबाईल गहाळ झाल्याच्या तक्रारी नोंदवल्या होत्या. या तक्रारींचा गांभीर्याने विचार करून पोलिसांनी उएखठ पोर्टलच्या सहाय्याने शोधमोहीम राबवली. या कारवाईत एकूण १४ मोबाईल हँडसेट शोधण्यात यश आले असून, त्यांची एकूण किंमत अंदाजे १ लाख ७३ हजार रुपये आहे.सदर मोबाईल आज तक्रारदारांना पोलीस निरीक्षक रामकृष्ण जाधव यांच्या हस्ते परत करण्यात आले. यावेळी नागरिकांनी पोलिसांच्या या कार्याचे कौतुक करत समाधान व्यक्त केले. ही संपूर्ण कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी दिनेश बैसाणे यांच्या ार्गदर्शनाखाली पार पडली. यामध्ये पोलीस निरीक्षक रामकृष्ण जाधव यांच्यासह पोलीस कर्मचारी रविंद्र नेवारे आणि अंकुश फेंडर यांनी सक्रिय सहभाग घेतला.या उपक्रमामुळे नागरिकांचा पोलिसांवरील विश्वास अधिक दृढ होत असून, हरवलेली मालमत्ता शोधून देण्याच्या दृष्टीने पोलीस दलाचे प्रयत्न कौतुकास्पद ठरत आहेत.

## पवन थोटे यांना राज्यस्तरीय समाजभुषण पुरस्कार जाहीर

■ जनमाध्यम प्रतिनिधी



**यवतमाळ :** सामाजिक कार्यकर्ते धनगर समाजातील कर्तृत्ववानं व्यक्तिमत्व पुण्यश्लोक अहिल्यादेवीचे भक्त, मेंढपाळ रक्षक पवन थोटे यांना आदिवासी धनगर समाजाचा राज्यस्तरीय समाजभुषण पुरस्कार जाहीर झाला.हा पुरस्कार राज्यस्तरीय आदिवासी धनगर साहित्य संमेलनात दिनांक ११ व १२ एप्रिल रोजी चांदवड जिल्हा नाशिक येथे होणाऱ्या कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते देण्यात येणार आहे. पवन थोटे हे विदर्भातील एकमेव व्यक्ती आहे ज्यांना हा आदिवासी धनगर साहित्य समाजभूषण पुरस्कार जाहीर झाला. पवन थोटे हे नियमित व सातत्याने समाजकार्य करत असतात ते गेल्या तीन वर्षापासून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे साप्ताहिक पूजन करत असून त्यानिमित्ताने ते समाज संघटित करत असतात.या समजभूषण पुरस्कारबद्दल त्यांचे सर्व स्थरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# मेळघाटातील कंत्राटी शिक्षकांच्या कामबंद व धरणे आंदोलनाची यशस्वी सांगता

## जि.प.च्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे लेखी आश्वासन

**अमरावती/का.प्र.**

जि.प.अमरावती अंतर्गत पेसा मध्ये कार्यरत असलेल्या कंत्राटीशिक्षकांचे तीन दिवसापासून सुरू असलेले काम बंद व धरणे आंदोलन, मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प.अमरावती यांच्या सोबत झालेल्या सकारात्मक चर्चा आणि मिळालेल्या लेखी आश्वासनानुसार आंदोलनाची यशस्वी सांगता झाली आहे.

कंत्राटी शिक्षकांच्या मागण्यांसाठी दि. ३० मार्च २०२६ पासून सुरू असलेल्या तीन दिवशी आंदोलन आज दि. ०२ एप्रिल २०२६ रोजी यशस्वी चर्चेनंतर मागे घेण्यात आले. यानंतर सर्व शिक्षक आपआपल्या शाळेवर रुजू होतील, असे कंत्राटी शिक्षकांनी सांगितले आहे. सदर आंदोलनास महाराष्ट्र



राज्य प्राथमिक शिक्षक समिती, अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघ, महाराष्ट्र राज्य शिक्षण परिषद अमरावती, शिक्षक भारती अमरावती, सावित्रीबाई फुले जिल्हा परिषद शाळा व शिक्षण वाचवा अभियान, महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटना अमरावती या सर्व संघटनांनी पाठिंबा दर्शविला. त्याकरिता सर्व आंदोलनकर्त्यांनी सर्व संघटनांचे आभार मानले.

या आंदोलनाला अमरावती लोकसभा मतदारसंघाचे लोकप्रिय खासदार मा. बळवंतजी बसवंतजी वानखडे साहेब, तसेच अचलपूर मतदार संघाचे आमदार मा. प्रवीण भाऊ तायडे यांनी सदर आंदोलनास भेट देऊन अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा करून कंत्राटी शिक्षकांची बाजू मांडली तसेच धामणगाव मतदार संघाचे आमदार प्रताप अडसड व श्रीमती प्रितीताई बंड यांनी आंदोलना बाबत वरीष्ट अधिकारी यांच्या सोबत चर्चा केली त्याबद्दल आंदोलनकर्त्यांनी त्यांचे आभार मानले.तसेच अमरावती जिल्हा परिषदच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता महापात्र व प्राथमिक शिक्षणाधिकारी सतिश मुगल यांनी आंदोलनाची दखल घेत सकात्मक निर्णय दिला त्या बद्दल आंदोलनकर्ते कंत्राटी शिक्षकांनी त्यांचे आभार मानले आहे.

आंदोलन यशस्वी करण्याकरीता राहुल सोनार,विशाल हगवणे,किशोर वानखडे, अविनाश उदापुरे,स्वाती पोटे,मंगेश आठवले,सागर सूर्यवंशी,शितल खडसे,दिपक मेमनकर,प्राजक्ता दातीर,अक्षय गजभिये,सचिन भालकर,संदीप देशकर,राहुल ठाकरे,रितेश शिंदे,सुप्रिया गायकवाड, अश्विन मालवे,आशिष इंगळे,शिषीर साबळे,सिमाबानो शहा,वैशाली थोटे,सरिता राऊत,देविदास उईके,पार्वती पवार,शालिनी बुराडे,मनोज पारीसे,कल्पना गोवारे,पूजा मेहरे,तेजस चहाकर, प्रियंका चोपडे, पवार,उत्कर्षकुमार चिमोटे,पूजा सिडाम,संदीप राठोडे यांचे सहकार्य लाभले.

# कोणार्क कंपनीला दिलेला कंत्राट रद्द करा

## एमआयएम नगरसेवकांचा मनपात ठिय्या

**अमरावती/का.प्र.**



शहरातील पश्चिमी क्षेत्रा मध्ये स्वच्छतेचा बोजवारा झालेला आहे. यामुळे परिसरातील नागरिक हैराण झाले आहे. त्याच्या आरोग्यावर याचे परिणाम होत आहे. या संदर्भात परिसरातील नगरसेवकांनी अनेक वेळा प्रशासन व संबंधित कंत्राटदार यांच्याकडे तक्रार केली, पण त्यांनी याकडे दुर्लक्ष केले. यामुळे संतापलेल्या एमआयएम नगरसेवकांनी महानगरपालिका च्या मुख्य इमारतीच्या प्रवेश द्वारावर ठिया आंदोलन करून आक्रोश प्रगट केला.

रद्द करा.. रद्द करा... कोणार्कचा कंत्राट रद्द करा अशी जोरदार घोषणाबाजी करत नगरसेवकांनी निदर्शने केली. अचानक झालेल्या या आंदोलनामुळे महानगरपालिका मध्ये खळबळ उडाली होती. एम आयएम गटनेता अब्दुल हमीद यांनी सांगितले की मुस्लिम बहुल क्षेत्रामध्ये पसरलेल्या घाणी बद्दल अनेक वेळा प्रशासनाला आणि कंत्रदाराला सांगितले पण त्यांनी या कडे दुर्लक्ष केले. ईदच्या सणावर ही आंदोलनाची घोषणा करण्यात आली होती, पण त्यावेळी ३१ मार्च पर्यंत साफसफाई होणार असल्याचा आश्वासन देण्यात आला होता. परिसरामध्ये घाण पसरली असल्यामुळे संतापलेल्या नगरसेवकांनी बुधवारी महानगरपालिका मध्ये ठिया आंदोलन केला. मनपा मुख्यालयाच्या प्रवेश द्वारावर आंदोलन सुरू असताना महापौर श्रीचंद तेजवानी,गटनेता चेतन गावंडे ,स्वीकृत नगरसेवक प्रशांत वानखडे, प्रदीप हिवसे सह भाजपाच्या अनेक नगरसेवकांनी एमआयएम नगरसेवकांची भेट घेऊन वस्तुस्थितीची माहिती घेतली. ठिया आंदोलन करणाऱ्यांमध्ये गटनेता अब्दुल हमीद ,नगरसेवक अहमद शाह, वहीद खान, इस्माईल रारानी, हाफिज तायर ,राशीद अली, सै. आहद अली, मुनज्जर अली, सै शाकीर हुसेन, नफीज खान, दानिश खान, इकबाल साहिल आदींचा सहभाग होता.

# विदर्भातील शाळा ३० जूनलाच सुरू करा

## प्राथमिक शिक्षक समितीचे शिक्षण संचालकांना निवेदन

**अमरावती/का.प्र.**

विदर्भातील शाळा ३० जूनलाच सुरू करा, अशी मागणी प्राथमिक शिक्षक समितीचे शिक्षण संचालकांना निवेदनाद्धारे केली आहे.

उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने ८ जून २००७ रोजी आदेश निर्गत केल्यानंतर दरवर्षी विदर्भातील शाळा २६ जूनपासून सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. न्यायालयाचा निर्णय अजूनही कायम असून त्याबाबत घेतलेले शासन निर्णय अजूनही अधिक्रमित झालेले नाही.मात्र २८ मार्च रोजी शिक्षण संचालनालयाने विदर्भातील शाळासुद्धा १५ जूनपासून सुरू करण्याचे आदेश निर्गत केले आहे. जून महिन्यात सुद्धा विदर्भात उन्हाच्या तीव्र झळा असतात व असह्य उकाडा असतो.त्यामुळे न्यायालयाच्या आदेशास अनुसरून विदर्भातील शाळा सुरू करण्याचे बाबतीत पुनर्विचार व्हावा. विदर्भात उशिराने शाळा सुरू होत असल्याने उर्वरित महाराष्ट्रापेक्षा विदर्भात दिवाळीच्या सुद्ध्या कमी असतात. त्यामुळे शैक्षणिक कामकाजाच्या दिवसांवर कोणताही फरक पडत नाही. याबाबत महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने शिक्षण संचालनालयाकडे पत्र पाठविले आहे.त्यामुळे २०२६-२०२७सत्रातील विदर्भातील शाळा ३० जून रोजी सुरू करण्याचे पत्र निर्गत करावे, अशी मागणी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीकडून करण्यात आली आहे.

# शासकीय औद्योगीक प्रशिक्षण केंद्राला भेट



**अमरावती/का.प्र.**

विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी, अमरावती द्वारा संचालित इंदिराबाई मेघे महिला महाविद्यालय, अमरावती गृहअर्थशास्त्र विभाग व शासकीय औद्योगीक प्रशिक्षण केंद्र, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने फॅशन डिझाईनिंग केंद्राला भेट देण्यात आली.

सद्याच्या युगात फॅशनला खुप महत्व आहे. फॅशनच्या युगात विद्यार्थीनींना कपड्याची पारख, वेगवेगळे नमुने, मशिन्स् याचे अद्यावत ज्ञान, महत्व विद्यार्थीनींना आत्मसात व्हावे या हेतुने या भेटीचे आयोजन करण्यात आले या करीता सौ. जया कुकडे मॅडम यांनी विद्यार्थीनींना खुप छान प्रकारे पटवून दिले व आजच्या काळात आपण फॅशन डिझाईनींग वर स्वत:चा रोजगार कसा उभारु शकतो या विषयी मार्गदर्शन केले.या भेटीकरीता प्रा. डॉ. सीमा अढाऊ, प्रा. डॉ. पुनम चौधरी, प्रा. डॉ. रश्मी खेडकर व भरपूर विद्यार्थीनी हजर होत्या.

# अल्पवयीन मुलीची युवकाच्या त्रासाला कंटाळून आत्महत्या

बेलोरा/वार्ताहर

चांदूरबाजार पोलीस स्टेशन अंतर्गत पिंपरी पूर्णा येथील सोळा वर्षीय मुलीने २५ मार्च रोजी राहत्या घरी विषारी द्रव्य प्राशन केले होते. आई-वडिलांच्या लक्षात आल्यानंतर लगेच तिला चांदूरबाजार ग्रामीण रुग्णालयात भरती केले. प्रकृती गंभीर असल्यामुळे अमरावती रेफर करण्यात आले. त्यानंतर खाजगी रुग्णालयात रेफर करण्यात आले. ३० मार्चला ती मृत पावली.

पिपरी पूर्ण येथील गोपाल उर्फ स्वराज गजानन खापरे (१९ वर्ष) अल्पवयीन खुशी (वय १६ वर्ष) शाळेत जात असताना तिच्या मागे मागे जाऊन टिंगलटवाळी करायचा. ज्या दिवशी सुट्टी असली त्यादिवशी घरी मोटरसायकलने चकरा मारायचा. त्यामुळे ती अतिशय त्रस्त झाली होती.ही घटना तिने आपल्या आई वडील भावाला सांगितली. मात्र गोपालच्या घरी खुशीची आई वडील गेले असता गोपालच्या घराला दोन-तीन दिवस कुलूप लागला होते.गोपालच्या त्रासाने खुशीने रात्री दरम्यान घरी विष प्राशन केले अशी तक्रार खुशीचे वडील वासुदेव बारकाजी कुरवाडे राहणार पिपरी पूर्ण यांनी चांदूरबाजार पोलीस स्टेशनला दिली आहे. तिच्या फिर्यादीच्या तक्रारीवरून चांदूरबाजारचे ठाणेदार सागर भामरे यांनी गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास एपीआय उल्हास राठोड, रोशन चव्हाण, सुनील खेरडे, दिपाली पांडे करीत आहे.

# ७ एप्रिलला अमरावती-बडनेराचा पाणीपुरवठा बंद

**अमरावती/का.प्र.**



पाणीपुरवठा योजनेंतर्गत सिंभोरा हेडवर्क्स येथे अत्यावश्यक देखभाल व दुरुस्तीचे काम हाती घेण्यात येणार असल्याने मंगळवार, ७ एप्रिल रोजी अमरावती व बडनेरा शहरातील पाणीपुरवठा पूर्ण दिवस बंद राहणार आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणमार्फत सिंभोरा हेडवर्क्स येथे १४०० मिमी व्यासाच्या मुख्य पाईपलाईनवर अल्ट्रा सोनिक जलमापक बसविण्याचे काम करण्यात येणार आहे. या कामासाठी संपूर्ण दिवस पाणीपुरवठा बंद ठेवावा लागणार असल्याची माहिती कार्यकारी अभियंत्यांनी दिली.दरम्यान, पाणीपुरवठा बंद राहणार असल्याने नागरिकांनी आधीच पाण्याचा पुरेसा साठा करून ठेवावा, तसेच उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.ही अत्यावश्यक कामे पूर्ण झाल्यानंतर पुढील दिवशी पाणीपुरवठा पूर्ववत सुरू करण्यात येणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

### केंद्र सरकारच्या धोरणांविरोधात

# आशा वर्कर्सचे 'ब्लॅक डे' आंदोलन

**अमरावती/का.प्र.**



केंद्र सरकारच्या कामगार व आशा वर्कर्सविरोधी धोरणांच्या निषेधार्थ सिटू संलग्न अखिल भारतीय आशा व गटप्रवर्तक फेडरेशनच्या आवाहनावरून बुधवारी शहरात 'ब्लॅक डे' आंदोलन करीत महानगरपालिका क्षेत्रातील १३ आरोग्य केंद्रांतील आशा वर्कर्सनी काळ्या साड्या व ड्रेस परिधान करून काम करत केंद्र सरकारविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली.


दरम्यान, केंद्र सरकारच्या आरोग्यमंत्री यांच्या नावे आयुक्त, मनपा अमरावती यांच्यामार्फत निवेदन देण्यात आले.राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत असलेल्या आशा वर्कर्स या केवळ मानधनावर काम करीत असून त्यांच्या मागण्या वर्षानुवर्षे प्रलंबित असल्याचा आरोप संघटनेने केला. केंद्र सरकारकडून मानधनात वाढ न करणे, थकीत मोबदला न देणे व कोरोना काळातील प्रोत्साहन भत्ता अद्याप न मिळाल्याने संताप व्यक्त करण्यात आला.कामगारविरोधी चार श्रम संहिता रद्द कराव्यात, गेल्या सहा-सात वर्षांपासून स्थिर असलेले मानधन त्वरित वाढवावे, घोषित १५०० रुपयांची वाढ तत्काळ लागू करावी, सहा महिन्यांपासून थकीत मोबदला त्वरित अदा करावा, कोरोना काळातील २४ महिन्यांचा २४,००० रुपयांचा प्रोत्साहन भत्ता द्यावा, तसेच वाढत्या ऑनलाईन कामाच्या ताणातून दिलासा द्यावा, आणि आशा वर्कर्सना सरकारी कर्मचारी दर्जा द्यावा, या मंगण्यांचा समावेश आहे.

या सर्व प्रश्नांकडे केंद्र सरकारचे लक्ष वेधण्यासाठी देशभर 'केंद्र सरकार निषेधदिन' पाळण्यात आल्याचे संघटनेने स्पष्ट केले. अमरावती शहर व ग्रामीण भागातील आशा वर्कर्सनी दिवसभर काळ्या वेशात सेवा देत आंदोलनाला पाठिंबा दर्शविला. आंदोलनाच्या यशस्वीतेसाठी संघटनेचे अध्यक्ष सुभाष पांडे, जिल्हा सचिव वंदना बुरांडे यांच्यासह वैशाली नेवारे, ज्योती नालट, ममता काळे, अनिता जगताप, अर्चना जनबंधू, सुधा खडसे, फरहीन खान, पुष्पा बोरकर, रंजना उपरीकर, चेडे ताई व चवरे ताई यांनी पुढाकार घेतला.

# प्रभाग क्रमांक १७ घाणीच्या विळख्यात

**अमरावती/का.प्र.**

प्रभाग क्रमांक १७ मध्ये कोणार्क कंपनीमार्फत चालवली जाणारी स्वच्छता व्यवस्था पूर्णपणे विस्कळीत असल्याचा आरोप समोर आला आहे. परिसरातील वाढत्या घाणीमुळे सर्वत्र अस्वच्छ परिस्थिती निर्माण होत असून, नागरिक त्याबद्दल सातत्याने तक्रारी करत आहेत. बुधवार, १ एप्रिल २०२७ रोजी, कोनार्क कंपनीच्या सर्व स्वच्छता कर्मचाऱ्यांनी काम बंद आंदोलन सुरू केले, ज्यामुळे परिस्थिती अधिक गंभीर झाली आहे. नागरिकांचे म्हणणे आहे की, संबंधित अधिकाऱ्यांकडे वारंवार तक्रारी करूनही कोणतीही ठोस कारवाई केली जात नाही.





काही दिवसांपूर्वी नाईक यांनी विभागाला भेट दिली होती, पण दुसऱ्याच दिवशी स्वच्छता कर्मचाऱ्यांनी पुन्हा काम थांबवले. याचा थेट परिणाम विभागातील नागरिकांच्या आरोग्यावर होत आहे.या मुद्द्यावर युवा स्वाभिमान पक्षाच्या नगरसेविका प्रियांका पाटणे, योगेश रघुनाथ विजयकर, अर्चना अशोक पांडे आणि भूषण पाटणे यांनी नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले की, जर कंपनी काम करण्यास असमर्थ असेल, तर तिला काढून टाकून जुनी पद्धत लागू करावी.रवी नगर, छांगणी नगर, अंबा विहार, वल्लभ नगर, पार्वती नगर, गांधी आश्रम, हनुमान नगर, आनंद नगर, महाजनपुरा आदी भागात अस्वच्छतेची स्थिती बिकट झाली आहे.लवकरच सुधारणा झाली नाही, तर महानगरपालिकेत आंदोलन केले जाईल आणि आयुक्त महोदयांच्या कार्यालयात कचरा सादर केला जाईल.

# भर उन्हाळ्यात पावसाचा धुमाकूळ

**अंजनगाव बारी/वार्ताहर**

ग्रामीण अंजनगाव बारी परिसरात भर उन्हाळ्यात झालेल्या वादळी वाऱ्यासह विजेच्या गडगडाटासह अवकाळी पावसाने १ एप्रिल रोजी रात्री हजेरी लावली.



पावसाचा जोर आणि वाऱ्याने घराबाहेरील साहित्य, झाडांच्या फांद्या आणि धुळीचे ढग उडून नागरिकांची तारांबळ उडाली. काही भागांत क्षणिक वीजपुरवठादेखील खंडित झाल्याने नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागला. दिवसभर तापमानात वाढ आणि उकाड्याचा त्रास जाणवत असतानाच पावसानंतर वातावरणात उकीरडा वाढल्याने नागरिक अधिकच त्रस्त झाले. दमट हवामानामुळे व उष्णतेची लाट कायम असल्याने नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.ग्रामीण पट्ट्यात संध्याकाळच्या वेळेस जोरदार सरी आणि वाढता वारा यांची शक्यता असल्याने नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन स्थानिक प्रशासनाने केले आहे. पावसाच्या या अनपेक्षित फटक्यामुळे गावात एकच गोंधळाचे वातावरण तयार झाले असून उन्हाळ्यातील उष्णतेसोबतच अवकाळी बदललेल्या हवामानाचा दुहेरी फटका नागरिकांना बसत आहे. पुढील काही तास हवामानात आणखी बदल होण्याची चिन्हे दिसत असून सर्वांनी सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात येत आहे.


अंजनगाव बारी व परिसरात झालेल्या अवकाळी पावसामुळे संत्रा उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. भाजीपाला आणि इतर पिकांसमवेत संत्रा बागांची फळधारणा सर्वाधिक कोसळल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत.

## मतदार मॅपिंग मध्ये उत्कृष्टांचा गौरव



**अंजनगाव बारी**-एस.आय.आर. अंतर्गत मतदार मॅपिंग उपक्रमात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सत्कार अप्पर जिल्हाधिकारी गोविंद दाणेज व उपजिल्हाधिकारी (महसूल) विवेक जाधव यांच्या हस्ते करण्यात आला. ९० टक्क्यांपेक्षा अधिक मतदार मॅपिंग पूर्ण करणाऱ्या सुपरवायझर व मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांचा विशेष गौरव करण्यात आला. सुपरवायझर म्हणून वसीम फरहत, अविनाश देशमुख व जयश्री गजभिये (पर्यवेक्षीय अधिकारी) यांना पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.मतदान केंद्रस्तरीय अधिकारी म्हणून वृषाली मोहोड, सारिका काळे , प्रज्ञा मोकळे, अभय मुळे, शिवलाल बोरकर, वैशाली मोरे आणि हर्षल गिरकुंजे यांचा गौरव करण्यात आला.मान्यवरांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या परिश्रमाचे कौतुक करत त्यांच्या पुढील कार्याला शुभेच्छा दिल्या.

## आदर्श कलाशिक्षक पुरस्काराने एम.पी.जाधव सन्मानीत



**रिद्धपूर**- महाराष्ट्र राज्य कलाध्यापक संघ महामंडळ, पुणे यांच्यातर्फे आयोजित ४४व्या राज्यस्तरीय कलाशिक्षण परिषद राजधानी सातारा येथील स्व. यशवंतराव चव्हाण सभागृहात पार पडली. या कलाशिक्षण परिषदेत आदर्श कलाशिक्षक पुरस्काराचे वितरण करण्यात आले. चंफा.चॅरिटेबल ट्रस्ट द्वारा संचालीत ई.एस. हायस्कुल रिद्धपूर तालुका मोर्शी जिल्हा अमरावती येथील कलाशिक्षक एम.पी. जाधव यांना हा प्रतिष्ठेचा आदर्श कलाशिक्षक पुरस्कार देवुन त्यांचा गौरव करण्यात आला.पुरस्कार वितरण सोहळ्याला महाराष्ट्र राज्य कलाध्यापक संघ महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र बारई उपस्थित होते. त्यांच्या हस्ते कलाशिक्षक एम.पी.जाधव यांचा सपत्नीक सन्मानचिन्ह, मानपत्र व स्मृतिचिन्ह देऊन पुरस्कार प्रदान करून सत्कार करण्यात आला.

# एप्रिल महिना ठरणार खगोलप्रेमींसाठी पर्वणी

## खगोलीय घटनांची राहणार रेलचेल

**अमरावती/का.प्र.**

एप्रिल महिना हा खगोलप्रेमींसाठी एक पर्वणी ठरणार आहे. आकाशात अनेक प्रकारच्या खगोलिय तसेच दुर्मिळ घटनांची रेलचेल बघायला मिळणार आहे. महिन्याच्या सुरुवातीला म्हणजे १ एप्रिल रोजी पिंक मुन बघायला मिळाला. याचे नाव जरी पिंक असले तरी चंद्र हा प्रत्यक्षात गुलाबी दिसत नाही. हे नाव वसंत ऋतूमध्ये फुलणाऱ्या गुलाबी फुलावरून पडले आहे. चंद्र सायंकाळी पूर्व दिशेला मोठा आणि तेजस्वी दिसतो. खगोलप्रेमींना ही घटना खुल्या जागेवरून अनुभवायला मिळाली.

३ एप्रिल रोजी बुध ग्रह सूर्योदयाच्या आधी स्पष्टपणे पाहता येणार आहे. बुध ग्रह सामान्यतः दिसणे कठीण असते, पण या दिवशी तो क्षितिजा जवळ चमकणाऱ्या छोट्या ताऱ्यासारखा दिसतो. पहाटे लवकर उठून पूर्व दिशेकडे लक्ष दिल्यास ही सुंदर संधी अनुभवता येईल. याशिवाय



४ ते ८ एप्रिलदरम्यान एक धूमकेतू दिसण्याची शक्यता आहे. धूमकेतू म्हणजे बर्फ, धूळ आणि वायूंचा बनलेला आकाशातील प्रवासी आहे. तो आकाशात हलकी शेपटी असलेल्या प्रकाशासारखा दिसतो. संध्याकाळी किंवा पहाटे अंधाऱ्या ठिकाणी तो पाहणे अधिक सोपे होणार आहे. तसेच १८ आणि १९ एप्रिल रोजी चंद्र, शुक्र ग्रह आणि प्लेयडीज ताऱ्यांचा समूह एकत्र दिसणार आहे. शुक्र हा खूप तेजस्वी असल्यामुळे तो लगेच लक्षात येतो, तर प्लेयडीज हे लहान चमकदार ताऱ्यांचे समूह असतात. हे दृश्ये अत्यंत आकर्षक आणि मनमोहक असते. तसेब २२ ते २३ एप्रिलदरम्यान लागीड उल्कावर्षाव होणार आहे. यावेळ आकाशात उल्का वेगाने झेपावतान दिसतात. ताशी १५ ते २० उल्का दिसू शकतात. अंधाऱ्या ठिका पाहिल्यास हा अनुभव अधिक चांगला मिळतो. या सर्व घटना आपल्या विश्वाच्या अद्भुत रचनेची आणि सौंदर्याची जाणीव करून देतात. अशी माहिती स्टारगेझर क्लबचे संचालन प्रविण गुल्हाने, हौशी खगोल अभ्यासक विजय गिरूळकर यांनी दिली.

### १६ ते २३ एप्रिलदरम्यान ग्रहांची रांग

१६ ते २३ एप्रिलदरम्यान ग्रहांची रांग दिसणार आहे. यावेळी बुध, मंगळ, शनि यांसारखे ग्रह एका रेषेत दिसतात. ही घटना दुर्मिळ असल्याने खगोलप्रेमींसाठी विशेष आकर्षण ठरते. पहाटे पूर्व दिशेकडे पाहिल्यास हे दृश्य अनुभवता येते.

# समाज नासवणारी बुवाबाजीची मुळं!

कॅप्टन खरात हा काही पहिला भोंदू बुवा नाही. हजारो सर्वधर्मीय बुवा, महाराज, गुरु, मुल्ला, मुजावर, पाद्री, यांचे जाळे या देशात सर्वत्र पसरले आहे. १९८९ पासून अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य मी करीत आहे. आज अखेर पर्यंत मी स्वतः अडीचशे पेक्षा जास्त बुवांच्या दरबारात जाऊन बसलेलो आहे व त्यांचा भांडाफोड केला आहे. या ठिकाणी एक गोष्ट नमूद करावीशी वाटते. जेव्हा मी दरबारात जाऊन बसतो तेव्हा तो मुसलमान आहे की नाही हे बघत नाही. फक्त हिंदूंच्या दरबारात जाऊन बसतो असेही मी केलेले नाही. आज अखेर मी अंनिसच्या आधारे पकडलेल्या बुवांपैकी २५३ बुवा हे मुस्लिम धर्मीय आहेत. त्यांच्या दरबारात जाऊन मी स्वतः त्यांना आव्हान दिलेले आहे. माझ्याबरोबर असलेल्या सर्व अंनिसच्या कार्यकर्त्यांची मुस्लिम बुवांच्या दरबारात गेल्यावर आणि त्याला पोलीस स्टेशनला नेल्यावर 'फाटलेली' नाही. प्रचार असा केला जातो की 'मुसलमान बुवांच्या विरोधात बोलून दाखवा, बघा कशी फाटते'. पण वास्तवात आज अखेर कोणत्याही अंनिस कार्यकर्त्यांची किंवा माझी फाटलेली नाही. आमचे फाटते असा खोटा प्रचार भोंदू प्रचारक करत असतात.

**कॅप्टन खरातची मालमत्ता जेवढी सापडली आहे त्याच्या कैक पटीने जास्त मालमत्ता भारतातल्या अनेक महाराज बुवांची आहे. ही मालमत्ता लोकांच्या श्रद्धेचा वापर करून मिळवलेली आहे. हा श्रद्धेचा व्यापार अव्याहतपणे हजारो वर्षे चालू आहे. सर्व बुवा - महाराजांच्या मालमत्तांची तपासणी केली तर अब्जावधी रुपयांची उलाढाल हाती लागेल. म्हणूनच खरात सारखे बुवा हे हिमनगाचे टोक आहेत. लोकांच्या श्रद्धा या मूल्यवादी न बनवता त्यांना फसवून लुटणे हाच उद्योग बुवा करत असतील तर त्याला विरोध करणे म्हणजे धर्मद्रोह नव्हे.**



पकडलेल्या बुवांपैकी ज्या ज्या मुस्लिम बुवांना आम्ही पकडलेले आहे त्यांच्या समर्थनार्थ किंवा त्यांना वाचवायला हिंदूंमधील मूलतत्त्ववाद्यांप्रमाणेच, कट्टर वाद्यांप्रमाणेच, मुस्लिमांमधील मूलतत्त्ववादी किंवा कट्टर मुस्लिम पुढे सरसावलेले आम्हाला अनुभवास आलेले आहेत. इथे दोन्ही धर्माचे कट्टरतावादी समान लायकी वर येतात! आम्ही त्या लोकांशी सामना केलेला आहे. त्यांनी आम्हाला दिलेल्या धमक्या आम्ही स्वीकारलेल्या आहेत आणि जसे हिंदुत्ववादी कार्यकर्ते आम्ला धमकी देत आहेत तसेच कट्टर मुस्लिम भक्त देखील धमकी देत असतात. नुकत्याच एका मुस्लीम बुवाला पकडलेल्या प्रकरणांमध्ये बुवाच्या भक्त असलेल्या मुस्लिम युवकाने भर पोलीस स्टेशनमध्ये, 'तुला बघून घेतो आणि ठेवणार नाही' अशी धमकी मला दिलेली होती. आणि ती मी त्याला साभार परतावून म्हटले होते की, मी त्यासाठी तयार आहे!

अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्यकर्ते जात किंवा धर्म बघून बुवा पकडत नाहीत. किंवा अंधश्रद्धेचे निर्मूलन करत नाहीत. सातत्याने खोटा प्रचार करणारे भोंदू प्रचारक हे अंधश्रद्धा निर्मूलनवाले फक्त हिंदू धर्मातील अंधश्रद्धांचे निर्मूलन करतात असा फेक प्रचार करत आहेत. मुस्लिम दर्गे व प्रार्थनास्थळे या ठिकाणी जाऊन तेथे अंगात येणाऱ्या व भूत काढणाऱ्या मुल्ला-मुजावर यांना आम्ही बेड्या ठोकल्या आहेत. एकही भोंदू प्रचारक कधीही तिकडे फिरकलेला नाही. जर त्यांच्यात दम असेल तर त्यांनी अंधश्रद्धा निर्मूलन समिती बरोबर एकत्रित येऊन काम करावे. पण अट एकच असेल. मुस्लिम बुवा पकडल्या नंतर हिंदू बुवा पकडायच्या वेळी गायब व्हायचे नाही. पण ती हिम्मत ते दाखवणार नाहीत. कारण हिंदू-मुस्लिम असे करत त्यांना राजकारण करायचे असते आणि सत्तेची पोळी भाजायची असते. सध्या सोशल मिडियावर जे जे विरोध करत आहेत ते ते सर्व राजकीय व सांस्कृतिक वर्चस्वासाठीचे अंधभक्त आहेत. त्यांच्या गोटातून याच पद्धतीने प्रचार करून राजकारण यशस्वी करण्याचा फंडा चालू ठेवायचा आहे.

अंधश्रद्धा निर्मूलन समिती ही सर्व धर्मांच्या अंधश्रद्धांचा समाचार घेते. एक विशेष गोष्ट मला इथे नमूद करावीशी वाटते. जेव्हा जेव्हा मुस्लिम महाराज-मुल्ला-मुजावर यांच्या विरोधात तक्रार आमच्याकडे आली आहे तेव्हा ती तक्रार घेऊन येणारे लोक हे मुस्लिम आहेत. खुद्द मुस्लिमांनाच अशा बुवांच्या विरोधात कारवाई करायची इच्छा असते. पण हे भोंदू प्रचारकांना माहिती नसते. त्यामुळे त्यांना असे वाटते की अंधश्रद्धा निर्मूलन समिती ही मुस्लिमांना घाबरते किंवा भिते. असे काहीही आजवर घडलेले नाही. महाराष्ट्रातील दोन मोठ्या दर्ग्यांमध्ये अंधश्रद्धा निर्मूलन समितीने प्रत्यक्ष जाऊन तेथील भूते येणाऱ्या व अंगात येणाऱ्या व्यक्तींवर उपचार केले आहेत व अघोरी प्रकारांविरोधात तक्रारी दाखल केल्या आहेत.

कॅप्टन खरात प्रकरणांमध्ये सर्व पक्षांच्या राजकीय व्यक्ती अडकलेल्या दिसत आहेत. माझे म्हणणे आहे की, बुवाबाजीला कोणताही राजकीय पक्ष नसतो. सर्व राजकीय पक्षातील अनेक लोक बुवाबाजी मध्ये तुडुंब बुडलेले आहेत. काँग्रेसच्या राजवटीमध्ये अंधश्रद्धा निर्मूलन समितीला हा अनुभव आलेला आहे की त्या वेळचे सत्ताधारी बुवांचे संरक्षक होते. आज तर आजचे सत्ताधारी बुवांचे केवळ संरक्षक बनलेले नसुन त्यांचे पाठीराखे बनलेले आहेत. कॅप्टन खरातचे चाळे सत्ताधाऱ्यांना माहिती नव्हते असे असू शकत नाही. त्याच्या अघोरी उपचार पद्धती खुद्द सत्ताधारी पक्षातील अनेकांनी करून घेतलेल्या आहेत. आणि त्याचा गौरव देखील केला आहे! गंभीर बाब म्हणजे स्त्रियांचा बळी जाईपर्यंत सत्ताधारी गप्प बसलेले आहेत. यात भाजपा, राष्ट्रवादी, शिवसेना आणि अन्य सर्व पक्ष सामील आहेत.

प्रश्न फक्त कॅप्टन खरातचा नाही. तर आसाराम बापू, नित्यानंद, धीरेंद्र शास्त्री, रामपाल, गुरमीत राम रहिम सिंग, झाकीर नाईक, रोग बरे करणारे ख्रिश्चन पाद्री, असे असंख्य बुवा महाराज आजही सत्ताधारी पक्षाचे लोक पदरी बाळगून आहेत. लोकल देवऋषी आणि मांत्रिक यांची तर गणतीच नाही. त्यांना संरक्षण देत आहेत सर्वपक्षीय नेते. सत्ताधारी यांचे मेरूमणी आहेत. बुवांच्या बुवाबाजीकडे कानाडोळा करणे हे गंभीर गुन्हेगारी कृत्य आहे आणि हे सर्वपक्षीय लोक करतात. जोवर त्याचे बिंग फुटत नाही तोवर ते त्यांच्या त्यांच्या धर्माचे मुकुटमणी असतात. करोडो लोक त्यांना डोक्यावर घेऊन नाचतात. कारण मंत्रीच त्यांच्या पायाशी बसून असतात.

८० टक्के हिंदू असलेल्या समाजामध्ये दर दहा बुवांमध्ये आठ बुवा हे हिंदू असतात. उरलेले दोन मुस्लिम किंवा ख्रिश्चन व अन्य धर्मीय असतात. जेव्हा अंधश्रद्धा निर्मूलन समिती बुवांना पकडते तेव्हा अर्थातच हे आठ बुवा पकडले जातातच. याचा अर्थ असा नव्हे की फक्त हिंदू बुवाच पकडले जातात. याचा अर्थ असा आहे की बुवाबाजीच्या क्षेत्रात हिंदू बहुसंख्येने आहेत. खेडोपाडी मंत्र-तंत्र करणारे देवऋषी, मुजावर आणि महाराज यांचे प्रचंड मोठे जाळे पसरलेले आहे. २०१४ पासून हे जाळे आणखीनच वाढलेले आहे. आणि त्यांना हिंदुत्व या विचारसरणीचे पाठबळ मिळाल्यामुळे ते शिरजोर बनले आहेत. जाणीवपूर्वक या जाळ्याकडे सत्ताधारी दुर्लक्ष करत आहेत. आणि त्यांचे प्रचारक सोशल मीडिया मधून पोष्टि झाडत आहेत. मुस्लिम बुवांवर अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या असलेल्या कोर्ट केसेस आजही चालू आहेत.

अनेक बुवांच्या प्रकरणांमध्ये कायद्याअभावी त्यांना सोडून देण्यात आलेले आहे. कारण महाराष्ट्र नरबळी व जादुटोणा विरोधी कायदा आजही अपुरा आहे. तो अपुरा रहाण्यामागे हिंदुत्ववादी संघटनांचा विरोध हे एक ठळक कारण होते. त्याचाच फायदा खरातच काय, सर्व महाराज, गुरु, बुवा, मुजावर, घेतात. अशावेळी लव जिहादचा कायदा करण्यात पुढाकार घेणाऱ्या सत्ताधाऱ्यांनी बुवाबाजीचे जाळे उखडून लावण्याचे सुद्धा कायदे तीव्र करायला स्वतःची सनातनी शक्ती का वापरलेली नाही? त्याचे कारण उघड आहे. बुवा, महाराज, गुरु, हे धर्माच्या राजकारणात सहजतेने वापरता येतात व फेकून देता येतात. धार्मिक असलेल्या समाजाला एखादा नारा देऊन धोक्यात असल्याची खोटी आवई उठवून भीतीग्रस्त करून मते लाटता येतात. आणि अशा मतांसाठी बुवांचे दरबार हे सहज सोप्या पद्धतीने उपलब्ध असतात. मग ते रामदेव बाबा असो नाहीतर श्री श्री रविशंकर असो नाहीतर ते झाकीर नाईक असो नाहीतर एखादा जैन मुनि किंवा बुद्ध भंते असो. सत्ता आणि राजसत्ता जेव्हा एकत्र येते तेव्हा गुलाम आणि भक्त जनतेचा बुद्धिभ्रंश करणे सोपं होतं. आज तेच चालू आहे. सोशल मिडिया मधून विशेष करून सत्ताधारी आयटी सेल कडून व त्यांच्या भक्तगणांगांकडून मोठ्या प्रमाणावर हिंदू विरोधी जे जे त्यांना हाणा असा प्रचार कडवटपणे आणि खुनशीपणे केला जात आहे. याचा अर्थ उघड आहे की, 'आमच्या धर्मातल्या अंधश्रद्धेचे आम्ही बघू'. म्हणजेच याचा अर्थ असा की आम्ही लोकांना अंधश्रद्ध ठेवू आणि सत्तेवर बसून राहू!

हिंदू बुवा हा हिंदू जनतेलाच लुटत असतो. मुस्लिम बुवा मुस्लिम जनतेलाच लुटत असतो. आज खरातच्या लैंगिक अत्याचाराच्या बळी असलेल्या स्त्रिया या हिंदूच आहेत. मग जर हिंदूच हिंदूंना मारत असेल तर 'आमच्या धर्माचे आम्ही बघून घेऊ' असे म्हणणारे बिनडोकपणा करत आहेत किंवा राजकीय पोळी भाजण्यासाठी खोटा आव आणत आहेत हे निश्चित.

आज उघडपणे अंधश्रद्ध प्रथा व परंपरा यांना पाठिंबा दिला जातो आहे. अशावेळी हा 'आमच्या धर्माचा अंतर्गत मामला आहे' असे म्हटले जाते. मग याच प्रथा संविधानास धाब्यावर बसवून जाहीरपणे गौरविल्या जातात तेव्हा तो अंतर्गत मामला न बनता सार्वजनिक बनतो. याचा अर्थ संविधाना ऐवजी धर्मग्रंथ, धर्मप्रथा व धर्म रूढी श्रेष्ठ ठरतात. नेमका याचाच फायदा बुवा उचलतात आणि ते समाजाचे शोषण करत राहतात. लोकांवर वचक बसवितात. आणि लैंगिक अत्याचार करतात.

धर्माचे उन्नयन करायचेच असेल तर ते नीती आणि विवेक या आधारे होणे गरजेचे असते. पण सध्या धर्म म्हणजे एक बाजार बनलेला आहे. येथे बुवा आणि महाराज अध्यात्माच्या नावाखाली, सत्संगाच्या नावाखाली आणि धर्मप्रभावना व प्रसाराच्या नावाखाली दुकाने खोलून बसले आहेत. कॅप्टन खरातची मालमत्ता जेवढी सापडली आहे त्याच्या कैक पटीने जास्त मालमत्ता भारतातल्या अनेक महाराज बुवांची आहे. ही मालमत्ता लोकांच्या श्रद्धेचा वापर करून मिळवलेली आहे. हा श्रद्धेचा व्यापार अव्याहतपणे हजारो वर्षे चालू आहे. सर्व बुवा-महाराजांच्या मालमत्तांची तपासणी केली तर अब्जावधी रुपयांची उलाढाल हाती लागेल. म्हणूनच खरात सारखे बुवा हे हिमनगाचे टोक आहेत. लोकांच्या श्रद्धा या मूल्यवादी न बनवता त्यांना फसवून लुटणे हाच उद्योग बुवा करत असतील तर त्याला विरोध करणे म्हणजे धर्मद्रोह नव्हे. पण हे लक्षात घेतो कोण?

**डॉ. प्रदीप पाटील**
अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्यकर्ते व अंधश्रद्धा निर्मूलन

# महा-साधना सप्ताह

भारत सरकार, क्षमता विकास आयोग आणि कर्मयोगी भारत यांच्या संयुक्त विद्यमाने २ ते ८ एप्रिल २०२६ या कालावधीत 'साधना सप्ताह' आयोजित करण्यात आला आहे. देशातील शासकीय विभागात काम करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना अधिक कार्यक्षम बनविणे, भविष्यातील आव्हानांसाठी तयार करणे आणि तंत्रज्ञानाची सवय आपल्या कामकाजात करून त्यांना सक्षम करणे हा या सप्ताहाचा मुख्य उद्देश आहे.

शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या कौशल्य वृद्धीसाठी आणि त्यांना तंत्रज्ञानदृष्ट्या सक्षम करण्यासाठी केंद्र शासनाने 'साधना सप्ताह' हा उपक्रम राबविण्याच्या सूचना सर्व राज्यांना दिल्या आहेत. त्यामुळे आता आपल्या राज्यातही 'महा-साधना सप्ताह' २ ते ८ एप्रिल या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे. टेक लर्निंग वीक अंतर्गत ८ लाख ८० हजारांहून अधिकारी आणि कर्मचारी ७ दिवसांत किमान ४ तासांचे अभ्यासक्रम ग्उध्ऊ कर्मयोगी भारत पोर्टलवर लॉग इन करुन पूर्ण करणार आहेत. यामुळे जवळपास ३५ लाखांहून अधिक वेळ अधिकारी आणि कर्मचारी iGOT कर्मयोगी भारत पोर्टलवर वेगवेगळे अभ्यासक्रम शिकतील. यामध्ये राज्यातील ३६ जिल्हे, ३२ विभाग, आणि ६ विभागीय कार्यालये यामध्ये विविध शासकीय कार्यालयात काम करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी महा-साधना सप्ताहात सहभाग नोंदविणे गरजेचे असणार आहे.

अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या कौशल्य वृध्दीसाठी आणि तंत्रज्ञानदृष्टया सक्षम करण्यासाठी साधना सप्ताह हा ग्उध्ऊ कर्मयोगी भारत अंतर्गत राबविला जाणारा एक विशेष प्रशिक्षण कार्यक्रम आहे. हा उपक्रम मिशन कर्मयोगी (Mission Karmayogi) चा एक भाग असून शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या कौशल्यवृध्दीसाठी आणि तंत्रज्ञानदृष्टया सक्षम करण्यासाठी आयोजित केला जातो. एक आठवडाभर आयोजित केला जाणारा हा उपक्रम पूर्णपणे ऑनलाईन प्रशिक्षण कार्यक्रम आहे. यामध्ये शासनाच्या विविध विभागांतील काम करणारे अधिकारी आणि कर्मचारी आपल्या स्वतःच्या कामाशी संबंधित नवीन कौशल्ये, तंत्रज्ञान आणि कार्यालयीन कामकाज सुकर होण्याच्या पध्दती शिकतात. शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता वाढविणे, डिजिटल गव्हर्नन्स आणि नवतंत्रज्ञानाचा वापर वाढविणे, सतत शिक्षण घेत राहणे, वेळ व्यवस्थापन ही सप्ताह आयोजित करण्यामागची मुख्य उद्दिष्टे असल्याने या सप्ताहात प्रत्येकाने स्वयंस्फूर्तीने सहभागी व्हावे असे आवाहन सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव व्ही. राधा यांनी राज्यातील सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना केले आहे.




महा-साधना सप्ताह चे वैशिष्ट्य म्हणजे iGOT Karmayogi App द्वारे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना आपल्या वेळेनुसार प्रशिक्षण घेता येईल. अधिकारी आणि कर्मचारी आपले काम सांभाळून हे अभ्यासक्रम पूर्ण करणार असल्याने कामकाजावर परिणाम न होता अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची कौशल्यवृद्धी होण्यास मदत होईल. या अभ्यासक्रमांमुळे प्रत्येकाला स्वतःची क्षमता ओळखून त्यानुसार कौशल्ये विकसित करण्याची संधी मिळते.

महा-साधना सप्ताह मुळे प्रशासनात डिजिटल सक्षमता वाढविण्यास मदत होणार आहे. बदलत्या काळाशी सुसंगत राहण्यासाठी शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी नवीन कौशल्ये आत्मसात करणे गरजेचे आहे. आजच्या शासकीय कामकाजात सुद्धा विविध डिजिटल प्रणाली, ॲप्सचा वापर होत आहे. महा-साधना सप्ताहामुळे प्रशासनात डिजिटल सक्षमता वाढविण्यास मदत होणार आहे. नवीन तंत्रज्ञानाचा शासकीय कामकाजात वापर, नागरिक केंद्रित सेवा आणि पारदर्शकता वाढविण्यास या सप्ताहाची मदत होणार आहे.

या सप्ताहाच्या अनुषंगाने राज्यातील विविध शासकीय कार्यालये, जिल्हा कार्यालये यामध्ये कार्यरत अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी iGOT कर्मयोगी भारत पोर्टलवर लॉग इन करून त्यांना नेमून दिलेले अभ्यासक्रम या काळात पूर्ण करणे गरजेचे राहील. पूर्ण केलेल्या अभ्यासक्रमाचा एकूण कालावधी किमान ४ तास असणे अनिवार्य आहे. सर्व अभ्यासक्रम २ ते ८ एप्रिल दरम्यान पूर्ण करणे गरजेचे असून कर्मयोगी भारत पोर्टलवर सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांनी नोंदणी आणि अभ्यासक्रम पूर्ण करणे गरजेचे आहे. मंत्रालयीन प्रशासकीय विभागाचे सचिव/प्रधान सचिव/अपर मुख्य सचिव (या विभागाच्या अधिनस्त सर्व क्षेत्रीय कार्यालये) तसेच विभागीय आयुक्त (विभागीय आयुक्त कार्यालये, जिल्हाधिकारी कार्यालये आणि विभागांतर्गत येणाऱ्या जिल्हापरिषदा) या सर्वांनी साधना सप्ताहात एकूण ४ तासांचे अभ्यासक्रम पूर्ण करणे गरजेचे राहील. विशेष म्हणजे साधना सप्ताह कार्यक्रमात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या (iGOT) पोर्टलवरील आकडेवारीच्या आधारे विभागांना महाराष्ट्रात मे महिन्यात होणाऱ्या 'TECH-keejer 2.0' मध्ये प्रशस्तीपत्रक देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

**विभागीय माहिती कार्यालय, अमरावती**

# मुलांच्या सोशल मिडिया वापरावर बंदी घाला

आज प्रत्येकाच्या हातात स्मार्ट फोन आहे आणि या स्मार्ट फोन मध्ये व्हॉट्सअप, फेसबुक, ट्विटर, इंस्टाग्राम, शेअर चाट, स्नॅप चाट, यु ट्यूब अशा अनेक सोशल मिडियावर साईट आहेत. या सोशल मिडिया साईटवर सतत सक्रिय राहून आपण किती सोशल आहोत हे दाखवण्यासाठी जो तो धडपडत असतो. विशेषतः किशोरवीन आणि तरुण मुलांमध्ये या सोशल मिडिया साईटची भलतीच भुरळ आहे. आजची युवा पिढी आपला सर्वाधिक वेळ सोशल मिडियावरच व्यतीत करते. एका सर्वेक्षणानुसार आपल्या देशातील मुले दररोज सरासरी पाच तास सोशल मिडियावर व्यतीत करतात. याचाच अर्थ आपली मुले सोशल मिडियाच्या आहारी गेली आहेत. ही मुले दिवसभर उपाशी राहू शकतील पण सोशल मिडिया पासून दूर राहू शकणार नाहीत. विशेष म्हणजे केवळ तरुण मुलेच नाही तर शाळकरी मुले देखील सोशल मिडियाच्या आहारी गेली आहेत. तंत्रज्ञानाचे जितके फायदे आहेत तितकेच तोटेही आहेत. भारत सरकारने अजून तरी शाळकरी मुलांच्या सोशल मीडिया वापरावर बंदी आली नसली तरी कर्नाटक सरकारने मात्र या संदर्भात सकारात्मक पाऊल टाकत १६ वर्षांखालील मुलांच्या सोशल मिडिया वापरावर बंदीचा प्रस्ताव मांडला आहे. लहान मुले सोशल मीडियाच्या आहारी जाऊ नयेत, तसेच लहान मुलांची ऑनलाईन सुरक्षा आणि वाढत्या स्क्रीन टाईम पासून मुलांना वाचवण्यासाठी कर्नाटक सरकारने हा निर्णय घेतला आहे. अशाप्रकारे बंदीचा प्रस्ताव आणणारं कर्नाटक हे देशातील पहिले राज्य बनले आहे. ऑस्ट्रेलियातही १६ वर्षांखालील मुलांना सोशल मिडीयाचा वापर करण्यास बंदी घातली आहे. आता भारतातही त्या संदर्भात पावले उचलली जात आहे ही सकारात्मक बाब आहे मात्र प्रत्येक राज्यसरकारने आपल्या राज्यपुरता असा निर्णय घेण्याऐवजी जर केंद्रसंसदेत तसा कायदा केला तर तो संपूर्ण देशात एकाच वेळी ही बंदी लागू होईल.

**श्याम ठाणेदार**



# कृत्रिम बुद्धिमत्ता : शाप की वरदान?

मित्रांनो संगणक आणि यंत्रमानव या विषयांवर संशोधनाने फार मोठ्या प्रमाणात उत्क्रांती होत आहे. रोज याबद्दल नवनवीन वार्ता कानावर येत आहेत. सध्याच्या काळात कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) हा संगणक क्षेत्रातील परवलीचा शब्द आहे. त्यासोबतच मशीन लर्निंग (एमएल), डीप लर्निंग (डीएल), नॅचरल लँग्वेज प्रोसेसिंग (एनएलपी), नॉलेज, बेस सिस्टीम्स(केबीएस) न्यूरल नेटवर्क्स हे एआयचे उपसंच म्हणविले जातात.

ओळख आणि वर्गीकरण एआय स्पॅम कॉल्स किंवा प्रतिमा ओळखण्यात पटकन आणि अचूकपणे मदत करते. फोन कंपन्या आणि बँकांसारख्या संस्था एआयचा वापर करून अनावश्यक किंवा घातक संभाषण/फोन कॉल्स वर्गीकृत करतात. पूर्वानुमान आणि विश्लेषण एआय भविष्यातील घटनांचा अंदाज लावू शकते, जसे की विमान उड्डाणांचा विलंब किंवा रोगांची शक्यता. आरोग्य क्षेत्रात ते लक्षणांपूर्वी आजार ओळखते आणि वैद्यकीय प्रतिमा विश्लेषित करते. स्वयंचलन आणि कार्यक्षमता एआय कंटाळवाणी कामे ऑटोमेट करते, जसे ग्राहक सेवा, डेटा एंट्री किंवा इन्व्हेंटरी व्यवस्थापन. कारखाने, ऑफिसेस आणि सेवा क्षेत्रात ते कार्यक्षमता वाढवते. सर्जनशीलता आणि उत्पादनक्षमता एआय इमेज, टेक्स्ट, ऑडिओ किंवा व्हिडीओ तयार करू शकते, जसे चॅटजीपीटी किंवा इमेज जनरेटर्स. 'स्मार्टफोन वापरताना किंवा गुगल असिस्टंटसारखे सहायक वापरून दैनंदिन जीवन सुलभ झाले आहे.

इतर अनुप्रयोग सुरक्षा : सायबर हल्ले रोखणे किंवा आपत्ती व्यवस्थापन. शिक्षण आणि व्यवसाय : वैयक्तिक शिक्षण किंवा नवीन उत्पादने सुचवणे. पर्यावरण : वाहन उत्सर्जन कमी करणे किंवा नैसर्गिक आपत्तींचा अंदाज लावणे. अचूकता आणि अथकपणे कार्यरत असण्याची क्षमता एआयद्वारे केलेली कामे ही अत्यंत अचूक असतील. तसेच एआय हे तंत्रज्ञान मशीनद्वारे वापरले जाणार आहे. त्यामुळे मशीन थकण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. त्यामुळे अति श्रमामुळे होणाऱ्या त्रुटी किंवा चुकांची शक्यता अत्यंत नगण्य असेल. इथे सांगितलेले उपयोग हे एआयचे अगदी जुजबी उपयोग आहेत. एआय हे असे तंत्रज्ञान आहे ज्याची व्याप्ती फार मोठी आहे, असे म्हणू या की येणाऱ्या काळात एआय वापरावर कोणत्याही मर्यादा असू शकणार नाहीत. वरील सर्व मुद्दे हे एआयची भलावण करणारे आहेत. पण एआयच्या वापराने काय नुकसान असू शकते किंवा त्याचे दुष्परिणाम काय असू शकतात यावर देखील ऊहापोह व्हायला पाहिजे.

संगणक क्षेत्रात झालेली प्रचंड उत्क्रांती पाहता एकदिवस हे संगणक मानवाचा रोजगार हिरावून घेतील अशी एक भीती लोकांमध्ये निर्माण झाली होती आणि सध्या देखील आहे. काही अंशी यांचे परिणाम हे सकृतदर्शनी त्याच दिशेने जाताना दिसून येत आहेत. हा विषयावर मंथन देखील नित्य सुरू असते. त्यात काल्पनिक बाबीवर जास्त भर असल्याचे दिसून येते. भरीस भर म्हणून रोबोट्स,(Robotics), कृत्रिम बुद्धिमत्ता (Artifisial Intiligence), ज्ञानावर आधारित प्रणाली (Knoledge Based Systems, KBS) मशीन शिक्षण(ML) आउ लर्निंग (DL) अशा नवनवीन शोधामुळे तर अजूनच आव्हानात्मक परिस्थिती निर्माण झाली आहे. मानवी बुद्धिमत्तेच्या मदतीने करावयाची अनेक कामे या अत्याधुनिक प्रणालींच्या माध्यमातून आपण करून घेत आहोत. यात मुख्यत्वे करून (एआय) प्रणाली अत्यंत प्रभावीपणे वापरण्यात येत आहे.

अनेक संगणकीय प्रणालीमध्ये असणाऱ्या कपन्यातून सद्यस्थितीत कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना एआय स्किल्स आत्मसात करण्याबद्दल सूचना(तंबी) देण्यात येत आहे. अन्यथा त्यांच्या नोकरीवर गदा येऊ शकते. म्हणजे या सर्व मनुष्यबळास नवीन कौशल्ये शिकणे क्रमप्राप्त ठरेल. त्याकरिता लागणारा वेळ आणि पैसा हा एक वेगळाच विषय आहे. तसेच वयाने प्रौढत्वाकडे वाटचाल होत असणाऱ्या सर्वांनाच हे कौशल्य आत्मसात करणे कितपत शक्य होईल हा मुद्दा देखील कळीचाठरू शकेल. महत्वाचा एक मुद्दा असा की एआय प्रणालीचा होऊ शकणारा गैरवापर. याकरिता अनेक विचारवंत निरंतर उपाययोजना करण्याबद्दल क्रियाशील आहेत.

कृत्रिम बुद्धिमत्ता प्रत्येक उद्योगात बँकिंगपासून ते ग्राहक सेवेपर्यंत आणि अगदी कलाक्षेत्रात देखील पसरत असताना, गेट्सने खुलासा केला की तीन रोजगार खरोखरच मानवी राहतील, असा त्यांचा विश्वास आहे. ती कामे एआय करू शकत नाहीत म्हणून नाही - परंतु आम्हाला ते नको आहे म्हणून.

**१. अध्यापन.** गेट्सचा असा विश्वास आहे, की महान शिक्षक अपरिवर्तनीय आहेत. एआय निश्चितपणे धडे देऊ शकते. परंतु मानवी कनेक्शन - शिक्षकाला ज्या प्रकारे एखाद्या मुलाची बुद्धिमत्ता समजते, शिक्षक हा विद्यार्थ्यांमध्ये कुतूहल निर्माण करू शकतो किंवा अपयशानंतर त्यांना सांत्वन देतो - असे या प्रणालीकरिता कोणतेही अल्गोरिदम प्रतिकृती बनवू शकत नाही. भावनिक मार्गदर्शन आणि मानवी मार्गदर्शन हे शिक्षणाचा आत्मा राहतील.

**२. आरोग्य सेवा.** एआय निदान आणि शल्यक्रिया सुस्पष्टतेमध्ये क्रांती घडवून आणेल; परंतु गेट्सचा आग्रह आहे की, लोकांना अजूनही मानवी डॉक्टर आणि परिचारिका हव्या असतील. सहानुभूती, विश्वास आणि बेडसाइड काळजी डाउनलोड केली जाऊ शकत नाही. सर्वात शक्तिशाली औषध म्हणजे, करुणा - आणि कोणत्याही मशीनने कधीही त्यात प्रभुत्व मिळवले नाही.

**३. बांधकाम आणि दुरुस्ती.** टेक ब्रेक्थ्रू असूनही, गेट्सचा असा विश्वास आहे की प्लंबिंग, इलेक्ट्रिकल काम आणि इमारत यासारखे व्यापार वाढतील. घरे, रस्ते आणि शहरे अजूनही हातांनी आवश्यक आहेत. अशी अनेक क्षेत्रे असू शकतील. ते काहीका असेना, तरुणांनी ही सर्व आव्हाने स्वीकारून सर्व नवनवीन कौशल्ये आत्मसात करून या क्षेत्रात देखील भरारी घेऊन आपली यशस्विता सिद्ध करून राष्ट्राच्या प्रगतीस हातभार लावणे आवश्यक वाटते.

**प्रा. प्रवीण पांडे**

# पातूर पं. स. मध्ये खळबळ : गटविकास अधिका-यांची तडकाफडकी बदली

## पेव्हर ब्लॉक घोटाळा, सचिवांना अभय देण्याच्या चर्चेला उधाण




■ प्रतिनिधी | खेट्री ■

*पातूर पंचायत समितीत सुरू असलेल्या पेव्हर ब्लॉक कामातील कथित गोडबंगाल अखेर गटविकास अधिकाऱ्यांच्या बदलीपर्यंत पोहोचला असून तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे. गटविकास अधिकारी सतीश नायसे यांची तातडीने बदली करण्यात आली असून या कारवाईमागे गंभीर अनियमितता, सचिवांना दिलेले कथित अभय आणि वाढता दबाव ही कारणे असल्याची जोरदार चर्चा सुरू आहे.*

पातूर तालुक्यातील ग्रामीण भागात पेव्हर ब्लॉक कामांमध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार होत असल्याचे आरोप वारंवार समोर येत होते. मात्र या प्रकरणातील तक्रारी धुळखात पडत असल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. विशेष म्हणजे दोन सचिवांविरोधातील तक्रारींकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून त्यांना 'अभय' दिले जात असल्याचा आरोपही जोर धरत होता.

दरम्यान, बाळापूरचे आमदार नितीन देशमुख यांनी दिग्रस बु. येथे घेतलेल्या आमसभेत गटविकास अधिकारी अनुपस्थित राहिल्यानेही नाराजी व्यक्त झाली होती. या सर्व घटनांची दखल घेत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी अखेर २ एप्रिल रोजी सतीश नायसे यांची बदली करण्याचे आदेश काढले.

त्यांच्या जागी मूर्तिजापूर पंचायत समितीचे सहाय्यक गटविकास अधिकारी सुभाष काळे यांना प्रभारी जबाबदारी देण्यात आली आहे.

दरम्यान, दैनिक 'जनमाध्यम'ने २ एप्रिलच्या अंकात पेव्हर ब्लॉक घोटाळ्याचा पर्दाफाश करणारे वृत्त प्रसिद्ध करताच प्रशासनाने तातडीने कारवाई केल्याची चर्चा रंगली आहे. त्यामुळे ही बदली म्हणजे केवळ प्रशासकीय बदल नसून 'जनमाध्यम इम्पॅक्ट' असल्याचे बोलले जात आहे.

तालुक्यातील काही भागात पेव्हर ब्लॉक कामांवरून थेट हाणामारीपर्यंत परिस्थिती पोहोचली होती. ठेकेदार, अधिकारी आणि स्थानिकांमध्ये तणाव वाढत असल्याने प्रशासनाच्या कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. शासनाच्या निधीचा खुलेआम अपव्यय होत असताना संबंधित अधिकाऱ्यांनी डोळेझाक केल्याचा संताप नागरिकांमध्ये आहे.

### चौकशीचे आदेश, पण कारवाई कधी?

३० मार्च रोजी पातूर पंचायत समिती कार्यालयातच पेव्हर ब्लॉकच्या निकृष्ट कामावरून हाणामारी झाली होती. या प्रकारानंतर मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी संबंधित कामांची सखोल चौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. मात्र चौकशी अहवालानंतर प्रत्यक्षात दोषींवर कठोर कारवाई होणार का, की प्रकरण पुन्हा दडपले जाणार, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## जिल्हाधिकारी यांची सूर्योदय बालगृहाला सदिच्छा भेट

■ प्रतिनिधी | अकोला ■

जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी बुधवारी सूर्योदय बालगृहाला सदिच्छा भेट देऊन प्रवेशित बालकांसोबत संवाद साधला. जिल्हाधिका-यांनी बालगृहाची पाहणी करून संस्थेच्या कार्याची माहिती जाणून घेतली, संस्था करीत असलेल्या बालकांची विशेष काळजी व संरक्षणाच्या कार्याचे त्यांनी कौतुक केले. श्री.भय्युजी महाराज यांच्या या संस्थेमार्फत सुरु असलेल्या इतर कार्याची माहिती त्यांनी जाणून घेतली.

**Change In Name**

I Have Change
My Name From
**NIKHAT FAREEN**
-- TO --
**NIKHAT FARHEEN**
**SHAIKH BAHAR**
My Residential Address
is -- Bay Pass Near
Husaini Madarsha Akola
Maharashtra 444001

**Change In Name**

My Old passport
name was
**ASGHER SHAH**
**MAJHER SHAH**
Now my new name is
**Azgar Shah**
**Mazher Shah**
Old passport no:
K 972676
Address. Khidki
PuraJuna Shahar Akola
dist Akola 444002 (MS)

**Change In Name**

I have change
my name From
**SEIKH TASLIM**
**SEIKH NAJIR**
(As per Old Passport
Name/Wrong Name)
- To -
**SHAIKH TASLIM**
**SHAIKH NAZIR**
(New Name as per on
Two Photo ID)
Passport No. m9540547
Address - (If as per old
passport or if change
then as per Adhar).
INDIA BICHHAYAT
QADRIPURA AKOT
FILE AKOLA 444003,
MAHARASHTRA, INDIA

## चौकशीची जाहिर नोटीस

### सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला

अर्ज क्रमांक :- १७/२०२६ - कलम २२ नेता तारिख- ०४/०५/२०२६

**सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक :-** मदरसा जामे उल उलूम बाळापूर, ता.बाळापूर जि. अकोला

**नोदणी क्रमांक. एफ - २७०२**

**अर्जदार :-** मो. उमर मो. असलम खान

सर्व संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकोला हे वर नमुद केलेल्या अर्ज यासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२/१९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

१) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**अ) जंगम मिळकत (वर्णन) :-** काहि नाहि

**आ) स्थावर मिळकत (वर्णन) :-** मौजे बाभुळखेड ता. बाळापूर जि. अकोला

सर्वे नंबर- ३४/२, हे. आर २.०१, आकार ११.८२, हिस्सा ०.८०, भो-वर्ग १

सालीम काळी जिराईत जमीन त्यात येणाया झाडाझुडपासह चतुःसीमा पुर्वेस :- अ.सत्तार दखनी यांचे शेत पश्चिमेस :- मो.सालार मो.बीसमील्ला यांचे शेत उत्तरेस : - मो.सालार मो.बीसमील्ला यांचे शेत दक्षिणेस :- मदरसा

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटिस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला-२ यांचे शिक्कयानीशी आज दिनांक- ०२/०४/२०२६ रोजी दिली.

**प्र. अधिक्षक**
(शिक्का) सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अकोला विभाग अकोला

## जाहीर नोटीस

सर्व आम जनतेस सूचित करण्यात येते कि आमचे पक्षकार श्री. पांडुरंग श्यामरावजी लहाने, रा. लोखंडे ले-आऊट, मोठी उमरी, अकोला, ता. व जि. अकोला यांच्या मालकीचे व ताब्यातील मालमत्ता जिचे वर्णन ग्रा. पं. व मौजे उमरी, प्रगणे बाळापुर, ता. व जि. अकोला येथील सर्वे क्र. ३/पार्ट, प्लॉट क्र. ११(अ) चे जागेपैकी पूर्व पश्चिम वाटणीने दक्षिणेकडील भागाची जागा जिचे क्षेत्रफळ ७४.८० चौ.मी. म्हणजेच ८०५ चौ.फुट व त्यावरील बांधकाम असे असून सदर मालमत्तेच्या चतु:सिमा पूर्वेस - ४.५० मी. चा रस्ता पश्चिमेस – प्लॉट क्र. १०बी; उत्तरेस - विठ्ठल देशमुख यांची जागा; दक्षिणेस - प्लॉट क्र. १० सी याप्रकारे आहेत. सदर प्लॉट हा वि. उपविभागीय अधिकारी साहेब, अकोला यांचेकडील रे.के.नं. एनएपी - ३४ / उमरी प्र. बा./३५/१९८८-८९ या प्रकरणातील दि. १४/०८/१९८९ च्या आदेशानुसार निवासी प्रयोजनार्थ बिनाशेतीकडे परावर्तीत करण्यात आलेला आहे.

वर नमूद मालमत्ता श्री. पांडुरंग श्यामरावजी लहाने यांनी श्री. प्रकाश नाथा चौथे यांचेकडून नोंदणीकृत खरेदीखत क्र. १५९०/२००१ दि. ०१/०३/२००१ नुसार विकत घेतली आहे. सदर मालमत्ता विकत घेतांना श्री. पांडुरंग श्यामरावजी लहाने यांनी सदर मालमत्तेचे यापूर्वीचे मालक श्रीमती कलावती वासुदेव थाळे यांनी श्री. प्रकाश नाथ चौथे यांना करून दिलेले नोंदणीकृत खरेदीखत क्र. ३६९२ / २००० दि. ०३/०५/२००० ताब्यात घेतले होते. सदर मुळ नोंदणीकृत खरेदीखत क्र. ३६९२/२००० दि. ०३/०५/२००० हे श्री. पांडुरंग श्यामरावजी लहाने यांचे ताब्यातुन आजरोजी गहाळ झालेले आहे. अनेक ठिकाणी शोध घेऊनही सदर दस्तऐवज सापडले नाहीत.

वर नमुद मालमत्ता तसेच गहाळ झालेले वर नमुद मुळ दस्तऐवज कोणत्याही बँकेकडे, वित्तीय कंपनी अथवा संस्थेकडे गहाण असल्यास अथवा इतर कोणत्याही स्वरूपाचा बोजा असल्यास तसेच कोणाचाही हक्क वा अधिकार असल्यास किंवा इतर कोणतीही भानगड असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३ दिवसाचे आत खालील नमुद पत्त्यावर लेखी हरकत संबंधित कागदपत्रांसह द्यावी. वरील मुदतीत हरकत प्राप्त न झाल्यास सदर मालमत्ता हि बिनबोजा, बिनभानगडीचे असल्याचे समजून आमचे पक्षकार पुढील व्यवहार पूर्ण करतील व मग कुणाची काहीही हरकत आमचे पक्षकारावर लागु व बंधनकारक राहणार नाही. तसेच सदर गहाळ झालेले मुळ दस्तऐवज कुणासही सापडले असता त्यांनी खालील नमुद पत्त्यावर संपर्क साधावा. करीता ही जाहीर नोटीस.

अकोला, दि. ०२/०४/२०२६.

**ॲड. एस. डी. तायडे**
जगदंबा नगर, खामगांव रोड, शेगांव.
मो. ९७३०८२९९२८

## जाहीर नोटीस

### विद्यमान दिवाणी न्यायालय (क. स्तर), तेल्हारा यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. ११८/२०२६ प्रोसेस नं.३३९/२०२६

चौ.ता. ०२/०५/२०२६ दिनांक : ३०/०३/२०२६

**अर्जदार :** १. शोभा अशोक मराठा -वय ७० वर्षे, धंदा- घरकाम २. मंगला अशोक मराठा - वय ३५ वर्षे, धंदा - घरकाम ३. दिपक अशोक डालकर मराठा -वय ३० वर्षे, धंदा - मजुरी ४. राणी विनोद तिडके - वय २७ वर्षे, धंदा - घरकाम अर्जदार क. १ व २ रा. मालेगांव बाजार, ता. तेल्हारा, जि. अकोला अर्जदार क. ३, ४ रा. गल्ली नं. ०६, अंबिकानगर, मुकुंदवाडी, जि. औरंगाबाद, ता. जि. औरंगाबाद अर्जदार क. ४ रा. संतोषी माता नगर, मुकुंदवाडी, औरंगाबाद, ता. जि. औरंगाबाद

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** कोणीही नाही.

ज्याअर्थी वरील अर्जदार क. १ ते ४ नुसार मुंबई रेग्युलेशन ॲक्ट अंतर्गत वि. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर तेल्हारा यांचे न्यायालय वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज केला आहे. अर्जदार क. १ चे पती व अर्जदार क. २ ते ४ चे वडील मयत नामे अशोक शंकरराव मराठा हे दि. १७/०२/२०२४ रोजी मौजे मालेगांव बाजार, ता. तेल्हारा, जि. अकोला येथे मयत झालेले आहेत त्यामुळे अर्जदार हेच कायदेशीर वारस असून इतर कोणतेही वारस नाहीत.

त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जा विरुध्द इतर कोणतीही कोणत्याही प्रकारची हरकत अथवा आक्षेप असल्यास त्यांनी या न्यायालयात स्वत: अथवा वकीलामार्फत दिनांक ०२/०५/२०२६ रोजी किंवा त्याअगोदर या न्यायालयात हजर राहावे अन्यथा प्रकरण एकतर्फी निकाली काढण्यात येईल. करीता आज दिनांक ३०/०३/२०२६ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी प्रकाशित करण्यात येत आहे.

**आदेशानुसार**
(शिक्का) अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक ११९**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## जाहीर नोटीस

तमाम लोकांचे माहिती करिता सदरचे जाहीर नोटीसीने प्रसिद्ध करणेत येते की, मिळकतीचे वर्णन. जिल्हा अकोला, ता. अकोला, मौजे.- भोड येथील भू-मापन गट क्र - ८२ याचे एकूण क्षेत्र १० हे. ६७ आर, यापैकी लिहून देणार **१) दीपक श्रीराम अटकर** यांचे मालकीचे क्षेत्र ही या नोटीसीची विषयांकित मिळकत असून यापुढे त्यास सोईकरिता व संक्षिपाचे कारणास्तव सदर मिळकत असे संबोधलेले आहे. सदर मिळकतीपैकी काही मिळकतीबाबत त्यांचे मालकांनी पूर्णपणे निर्वेध, निष्कर्जी व सोक्त असल्याची हमी व निर्वाळा देवून आमचे अशिलांचेकडून सदर व्यवहारापोटी इसार म्हणून काही रक्कम स्विकारलेली असून सदर मिळकत भाडेपट्टा / योग्य त्या कराराने देणेचे मान्य व कबूल केलेले आहे. सबब, सदर मिळकतीबाबत, त्यांचे मालकी हक्काबाबत, वहिवाटीबाबत कोणाही बँका, पतसंस्था, खाजगी व्यक्ती, सावकार, शासकीय, निमशासकीय कार्यालये, इतर वित्तीय संस्था इत्यादी अगर अन्य कोणाचेही कसल्याही प्रकारचे कर्ज, बोजा, पीक कर्ज, लिज, तारण गहाण, मुदत खरेदी, बक्षीस, मृत्यूपत्र, वारसाहक्क, इजमेंट, शेजाऱ्याशी वाद, भाडेपट्टा, वहिवाट, पोटगी, कुळ, ॲक्विजीशन, रिक्विजिशन, न्यायालयीन वाद, कोर्ट डिक्री इ. संबंधीचे कसल्याही प्रकारचे हक्कसंबंध वा अधिकार असलेस किंवा हरकत असलेस, तक्रार असलेस त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ सात दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्यावर सर्व कागदोपत्री पुराव्यानिशी येवून हरकती नोंदवाव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध, निष्कर्जी व सोक्त आहेत असे समजून आमचे अशील जागा मालकांशी पुढील व्यवहार पूर्ण करतील. तदनंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत वा तक्रार आलेस ती सदर मिळकतींवर, आमचे अशीलांचेवर व त्यांचे कायदेशीर हक्कांवर कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. म्हणून दिली जाहीर नोटीस.

अकोला
दिनांक. ०३/०४/२०२६

**उपरोक्त अशिलातर्फे**
**ॲडव्होकेट के. डी. शिराळे**
पत्ता. ऑफिस नं. डी-३, दुसरा मजला,
शुभम अपार्टमेंट, नागाळा पार्क, २५२ /
१क/ २. शाहु ब्लड बँकेजवळ, कोल्हापूर
संपर्क क. ०२३१-२६६८८४७

## जाहीर नोटीस

तमाम लोकांचे माहिती करिता सदरचे जाहीर नोटीसीने प्रसिद्ध करणेत येते की, मिळकतीचे वर्णन जिल्हा अकोला, ता. अकोला, मौजे. - उगवा येथील भू-मापन गट क्र - ६८४ याचे एकूण क्षेत्र ०१ हे. ७४ आर, यापैकी लिहून देणार **१) भाउराव पूर्णाजी शिरसाठ व इतर** यांचे सामाईक मालकीचे क्षेत्र ही या नोटीसीची विषयांकित मिळकत असून यापुढे त्यास सोईकरिता व संक्षिपाचे कारणास्तव सदर मिळकत असे संबोधलेले आहे. सदर मिळकतीपैकी काही मिळकतीबाबत त्यांचे मालकांनी पूर्णपणे निर्वेध, निष्कर्जी व सोक्त असल्याची हमी व निर्वाळा देवून आमचे अशिलांचेकडून सदर व्यवहारापोटी इसार म्हणून काही रक्कम स्विकारलेली असून सदर मिळकत भाडेपट्टा / योग्य त्या कराराने देणेचे मान्य व कबूल केलेले आहे. सबब, सदर मिळकतीबाबत, त्यांचे मालकी हक्काबाबत, वहिवाटीबाबत कोणाही बँका, पतसंस्था, खाजगी व्यक्ती, सावकार, शासकीय, निमशासकीय कार्यालये, इतर वित्तीय संस्था इत्यादी अगर अन्य कोणाचेही कसल्याही प्रकारचे कर्ज, बोजा, पीक कर्ज, लिज, तारण गहाण, मुदत खरेदी, बक्षीस, मृत्यूपत्र, वारसाहक्क, इजमेंट, शेजाऱ्याशी वाद, भाडेपट्टा, वहिवाट, पोटगी, कुळ, ॲक्विजीशन, रिक्विजिशन, न्यायालयीन वाद, कोर्ट डिक्री इ. संबंधीचे कसल्याही प्रकारचे हक्कसंबंध वा अधिकार असलेस किंवा हरकत असलेस, तक्रार असलेस त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ सात दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्यावर सर्व कागदोपत्री पुराव्यानिशी येवून हरकती नोंदवाव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध, निष्कर्जी व सोक्त आहेत असे समजून आमचे अशील जागा मालकांशी पुढील व्यवहार पूर्ण करतील. तदनंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत वा तक्रार आलेस ती सदर मिळकतींवर, आमचे अशीलांचेवर व त्यांचे कायदेशीर हक्कांवर कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. म्हणून दिली जाहीर नोटीस.

अकोला
दिनांक. ०३/०४/२०२६

**उपरोक्त अशिलातर्फे**
**ॲडव्होकेट के. डी. शिराळे**
पत्ता. ऑफिस नं. डी-३, दुसरा मजला,
शुभम अपार्टमेंट, नागाळा पार्क, २५२ /
१क/ २. शाहु ब्लड बँकेजवळ, कोल्हापूर
संपर्क क. ०२३१-२६६८८४७

## जाहीर सूचना

सर्व लोकांना या नोटीस व्दारे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार नामे सपना दत्तात्रय गिरी, रा. मारोती मंदिराजवळ, केशव नगर, रिंग रोड, अकोला ता. जि. अकोला यांनी दिलेल्या माहीती व अधिकारावरुन श्री. वैभय विजय गुल्हाने रा. पिंजर, ता. बार्शिटाकळी, जि. अकोला यांचेकडून खालील नमुद मालमत्ता :- जि.प.पं.स.र.स.डी.र.डी. अकोला, पुर्वीची ग्रा. पं. खडकी बु. व सद्यास्थितीत म.न.पा. हद्दीतील गाव मौजे खडकी बु. ता. जि. अकोला येथील शेत सर्व्हे नं. ११/३ मधील ० हे ८१ आर जमीनीचे वि. एस. डी. ओ. साहेब अकोला यांचे फाईलावरील रे.के.नं.एन.ए. पी. ३४ / खडकी बु. /४७/२००१-०२ नि. ता. ०५/०७/२००२ प्रमाणे जय मातादी नगर या नावाने मंजुर झालेल्या लेआऊट नकाशातील प्लॉट क्र. ११ (अकरा) चा खुला प्लॉट तुम्हास आजरोजी कायमस्वरुपी विकण्याचा सौदा पक्का केला, त्याचे मोजमाप खालील प्रमाणे :- मोजमाप :- पुर्व बाजु : ११.०० मिटर, पश्चिम बाजु १४.५० मिटर, उत्तर बाजु : २०.०० मिटर, दक्षिण बाजु : मापास जी भरेल ती, प्लॉटचे एकूण क्षेत्रफळ २५५.०० चौ. मिटर ( २७४४ चौ. फुट), त्यास चतुः सिमा :- पुर्वेस : ९ मिटर रुंदीचा लेआऊट रोड, पश्चिम : वेगळे लेआऊट, उत्तरेस : लेआऊट प्लॉट नं. १०, दक्षिणेस : वेगळे लेआऊट, वरील वर्णनांकीत शेतजमीन आमचे पक्षकाराने रजिस्टर खरेदी खतान्वये विकत घेण्याचा सौदा पक्का केला आहे. तरी कोणत्याही व्यक्ती व त्याच्या वारसांचा, पतसंस्था, बँक इत्यादींचा वरील नमुद मालमत्तेवर कोणताही व्यवहार अथवा ईसार, खरेदी, हक्क, बोजा, दान, गहाण, बक्षीस व इतर याबाबत कुठलीही तक्रार असल्यास वरील स्थावर मालमत्तेबाबत कोणालाही काही व्यवहार करावयाचा असल्यास व हरकत घ्यावयाची असल्यास ही नोटीस प्रसीध्द झाल्यापासून १५ दिवसाचे आत लेखी दस्ताऐवजासह खालील दिलेल्या पत्यावर संपर्क करावा, अन्यथा आमचे पक्षकार होणाऱ्या व्यवहाराबद्दल कुठल्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही, तसेच त्यानंतर कोणाचाही कोणताही उजर चालणार नाही याची नोंद घ्यावी.

अकोला,
दिनांक ०२/०४/२०२६

**संपर्क**
**(ॲड. रविकुमार जी. अमानकर**
२१- ए- बी, गणेश नगर, टेलीकॉम
कॉलनी जवळ, रिंग रोड, अकोला ता.
जि. अकोला. मो. ९९२१९७९२१८

## जाहीर नोटीस

### वि. ०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. ४४३/२०२६ प्रोसेस नं.३५३३/२०२६

चौ.ता. २४/०४/२०२६ दिनांक : १२/०३/२०२६

**अर्जदार :** १. बशीरा बी मोहम्मद कौसर २. मोहम्मद सरफराझ मोहम्मद कौसर ३. मोहम्मद अहफाझ मोहम्मद कौसर ४. सुमैय्या परवीन मोहम्मद झुबैर रा. हाळोपूरा, अबुबकार मस्जिद जवळ, बार्शिटाकळी, , ता. बार्शिटाकळी, जि. अमरावती. ५. मोहम्मद शहेबाज मोहम्मद कौसर ६. मोहम्मद नौशाद मोहम्मद कौसर नं. १ ते ३, ५ व ६ रा. मक्काह मस्जिद जवळ, लक्ष्मी नगर, खैर मोहम्मद प्लॉट, अकोला. ता. जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.

**मयताचा पत्ता :-** मयत : मोहम्मद कौसर शेख हबिब

**पत्ता :-** रा. मक्का मस्जिद, लक्ष्मी नगर, खैर मोहम्मद प्लॉट, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत मोहम्मद कौसर शेख हबिब यांचे दि. १५/०५/२०१८ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २४/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १२/०३/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**आदेशानुसार**
(शिक्का) अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

तमाम लोकांचे माहिती करिता सदरचे जाहीर नोटीसीने प्रसिद्ध करणेत येते की, मिळकतीचे वर्णन. जिल्हा अकोला, ता. अकोला, मौजे.- उगवा येथील भू-मापन गट क्र - ५९८ याचे एकूण क्षेत्र ०० हे. ८१ आर, यापैकी लिहून देणार **१) कोकिळा गजानन पवार** यांचे मालकीचे क्षेत्र ही या नोटीसीची विषयांकित मिळकत असून यापुढे त्यास सोईकरिता व संक्षिपाचे कारणास्तव सदर मिळकत असे संबोधलेले आहे. सदर मिळकतीपैकी काही मिळकतीबाबत त्यांचे मालकांनी पूर्णपणे निर्वेध, निष्कर्जी व सोक्त असल्याची हमी व निर्वाळा देवून आमचे अशिलांचेकडून सदर व्यवहारापोटी इसार म्हणून काही रक्कम स्विकारलेली असून सदर मिळकत भाडेपट्टा / योग्य त्या कराराने देणेचे मान्य व कबूल केलेले आहे. सबब, सदर मिळकतीबाबत, त्यांचे मालकी हक्काबाबत, वहिवाटीबाबत कोणाही बँका, पतसंस्था, खाजगी व्यक्ती, सावकार, शासकीय, निमशासकीय कार्यालये, इतर वित्तीय संस्था इत्यादी अगर अन्य कोणाचेही कसल्याही प्रकारचे कर्ज, बोजा, पीक कर्ज, लिज, तारण गहाण, मुदत खरेदी, बक्षीस, मृत्यूपत्र, वारसाहक्क, इजमेंट, शेजा-याशी वाद, भाडेपट्टा, वहिवाट, पोटगी, कुळ, ॲक्विजीशन, रिक्विजिशन, न्यायालयीन वाद, कोर्ट डिक्री इ. संबंधीचे कसल्याही प्रकारचे हक्कसंबंध वा अधिकार असलेस किंवा हरकत असलेस, तक्रार असलेस त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ सात दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्यावर सर्व कागदोपत्री पुराव्यानिशी येवून हरकती नोंदवाव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध, निष्कर्जी व सोक्त आहेत असे समजून आमचे अशील जागा मालकांशी पुढील व्यवहार पूर्ण करतील. तदनंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत वा तक्रार आलेस ती सदर मिळकतींवर, आमचे अशीलांचेवर व त्यांचे कायदेशीर हक्कांवर कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. म्हणून दिली जाहीर नोटीस.

अकोला
दिनांक. ०३/०४/२०२६

**उपरोक्त अशिलातर्फे**
**ॲडव्होकेट के. डी. शिराळे**
पत्ता. ऑफिस नं. डी-३, दुसरा मजला,
शुभम अपार्टमेंट, नागाळा पार्क, २५२ /
१क/ २. शाहु ब्लड बँकेजवळ, कोल्हापूर
संपर्क क. ०२३१-२६६८८४७

## जाहीर नोटीस

तमाम लोकांचे माहिती करिता सदरचे जाहीर नोटीसीने प्रसिद्ध करणेत येते की, मिळकतीचे वर्णन. जिल्हा अकोला, ता. अकोला, मौजे.- उगवा येथील भू-मापन गट क्र - ६०५ याचे एकूण क्षेत्र ०१ हे. २१ आर, यापैकी लिहून देणार **१) दीपक श्रीराम अटकर** यांचे मालकीचे क्षेत्र ही या नोटीसीची विषयांकित मिळकत असून यापुढे त्यास सोईकरिता व संक्षिपाचे कारणास्तव सदर मिळकत असे संबोधलेले आहे. सदर मिळकतीपैकी काही मिळकतीबाबत त्यांचे मालकांनी पूर्णपणे निर्वेध, निष्कर्जी व सोक्त असल्याची हमी व निर्वाळा देवून आमचे अशिलांचेकडून सदर व्यवहारापोटी इसार म्हणून काही रक्कम स्विकारलेली असून सदर मिळकत भाडेपट्टा / योग्य त्या कराराने देणेचे मान्य व कबूल केलेले आहे. सबब, सदर मिळकतीबाबत, त्यांचे मालकी हक्काबाबत, वहिवाटीबाबत कोणाही बँका, पतसंस्था, खाजगी व्यक्ती, सावकार, शासकीय, निमशासकीय कार्यालये, इतर वित्तीय संस्था इत्यादी अगर अन्य कोणाचेही कसल्याही प्रकारचे कर्ज, बोजा, पीक कर्ज, लिज, तारण गहाण, मुदत खरेदी, बक्षीस, मृत्यूपत्र, वारसाहक्क, इजमेंट, शेजा-याशी वाद, भाडेपट्टा, वहिवाट, पोटगी, कुळ, ॲक्विजीशन, रिक्विजिशन, न्यायालयीन वाद, कोर्ट डिक्री इ. संबंधीचे कसल्याही प्रकारचे हक्कसंबंध वा अधिकार असलेस किंवा हरकत असलेस, तक्रार असलेस त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ सात दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्यावर सर्व कागदोपत्री पुराव्यानिशी येवून हरकती नोंदवाव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध, निष्कर्जी व सोक्त आहेत असे समजून आमचे अशील जागा मालकांशी पुढील व्यवहार पूर्ण करतील. तदनंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत वा तक्रार आलेस ती सदर मिळकतींवर, आमचे अशीलांचेवर व त्यांचे कायदेशीर हक्कांवर कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. म्हणून दिली जाहीर नोटीस.

अकोला
दिनांक. ०३/०४/२०२६

**उपरोक्त अशिलातर्फे**
**ॲडव्होकेट के. डी. शिराळे**
पत्ता. ऑफिस नं. डी-३, दुसरा मजला,
शुभम अपार्टमेंट, नागाळा पार्क, २५२ /
१क/ २. शाहु ब्लड बँकेजवळ, कोल्हापूर
संपर्क क. ०२३१-२६६८८४७

## जाहीर नोटीस

तमाम लोकांचे माहिती करिता सदरचे जाहीर नोटीसीने प्रसिद्ध करणेत येते की, मिळकतीचे वर्णन. जिल्हा अकोला, ता. अकोला, मौजे.- उगवा येथील भू-मापन गट क्र - ५७८ याचे एकूण क्षेत्र ०१ हे. ३८ आर, यापैकी लिहून देणार **१) गणेश रामकृष्ण केणे व इतर** यांचे सामाईक मालकीचे क्षेत्र ही या नोटीसीची विषयांकित मिळकत असून यापुढे त्यास सोईकरिता व संक्षिपाचे कारणास्तव सदर मिळकत असे संबोधलेले आहे. सदर मिळकतीपैकी काही मिळकतीबाबत त्यांचे मालकांनी पूर्णपणे निर्वेध, निष्कर्जी व सोक्त असल्याची हमी व निर्वाळा देवून आमचे अशिलांचेकडून सदर व्यवहारापोटी इसार म्हणून काही रक्कम स्विकारलेली असून सदर मिळकत भाडेपट्टा / योग्य त्या कराराने देणेचे मान्य व कबूल केलेले आहे. सबब, सदर मिळकतीबाबत, त्यांचे मालकी हक्काबाबत, वहिवाटीबाबत कोणाही बँका, पतसंस्था, खाजगी व्यक्ती, सावकार, शासकीय, निमशासकीय कार्यालये, इतर वित्तीय संस्था इत्यादी अगर अन्य कोणाचेही कसल्याही प्रकारचे कर्ज, बोजा, पीक कर्ज, लिज, तारण गहाण, मुदत खरेदी, बक्षीस, मृत्यूपत्र, वारसाहक्क, इजमेंट, शेजाऱ्याशी वाद, भाडेपट्टा, वहिवाट, पोटगी, कुळ, ॲक्विजीशन, रिक्विजिशन, न्यायालयीन वाद, कोर्ट डिक्री इ. संबंधीचे कसल्याही प्रकारचे हक्कसंबंध वा अधिकार असलेस किंवा हरकत असलेस, तक्रार असलेस त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ सात दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्यावर सर्व कागदोपत्री पुराव्यानिशी येवून हरकती नोंदवाव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध, निष्कर्जी व सोक्त आहेत असे समजून आमचे अशील जागा मालकांशी पुढील व्यवहार पूर्ण करतील. तदनंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत वा तक्रार आलेस ती सदर मिळकतींवर, आमचे अशीलांचेवर व त्यांचे कायदेशीर हक्कांवर कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. म्हणून दिली जाहीर नोटीस.

अकोला
दिनांक. ०३/०४/२०२६

**उपरोक्त अशिलातर्फे**
**ॲडव्होकेट के. डी. शिराळे**
पत्ता. ऑफिस नं. डी-३, दुसरा मजला,
शुभम अपार्टमेंट, नागाळा पार्क, २५२ /
१क/ २. शाहु ब्लड बँकेजवळ, कोल्हापूर
संपर्क क. ०२३१-२६६८८४७

## जाहीर नोटीस

तमाम लोकांचे माहिती करिता सदरचे जाहीर नोटीसीने प्रसिद्ध करणेत येते की, मिळकतीचे वर्णन. जिल्हा अकोला, ता. अकोला, मौजे.- उगवा येथील भू-मापन गट क्र - ६०० याचे एकूण क्षेत्र ०१ हे. ५१ आर, यापैकी लिहून देणार **१) प्रकाश मनोहर इंगळे** यांचे मालकीचे क्षेत्र ही या नोटीसीची विषयांकित मिळकत असून यापुढे त्यास सोईकरिता व संक्षिपाचे कारणास्तव सदर मिळकत असे संबोधलेले आहे. सदर मिळकतीपैकी काही मिळकतीबाबत त्यांचे मालकांनी पूर्णपणे निर्वेध, निष्कर्जी व सोक्त असल्याची हमी व निर्वाळा देवून आमचे अशिलांचेकडून सदर व्यवहारापोटी इसार म्हणून काही रक्कम स्विकारलेली असून सदर मिळकत भाडेपट्टा / योग्य त्या कराराने देणेचे मान्य व कबूल केलेले आहे. सबब, सदर मिळकतीबाबत, त्यांचे मालकी हक्काबाबत, वहिवाटीबाबत कोणाही बँका, पतसंस्था, खाजगी व्यक्ती, सावकार, शासकीय, निमशासकीय कार्यालये, इतर वित्तीय संस्था इत्यादी अगर अन्य कोणाचेही कसल्याही प्रकारचे कर्ज, बोजा, पीक कर्ज, लिज, तारण गहाण, मुदत खरेदी, बक्षीस, मृत्यूपत्र, वारसाहक्क, इजमेंट, शेजा-याशी वाद, भाडेपट्टा, वहिवाट, पोटगी, कुळ, ॲक्विजीशन, रिक्विजिशन, न्यायालयीन वाद, कोर्ट डिक्री इ. संबंधीचे कसल्याही प्रकारचे हक्कसंबंध वा अधिकार असलेस किंवा हरकत असलेस, तक्रार असलेस त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ सात दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्यावर सर्व कागदोपत्री पुराव्यानिशी येवून हरकती नोंदवाव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध, निष्कर्जी व सोक्त आहेत असे समजून आमचे अशील जागा मालकांशी पुढील व्यवहार पूर्ण करतील. तदनंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत वा तक्रार आलेस ती सदर मिळकतींवर, आमचे अशीलांचेवर व त्यांचे कायदेशीर हक्कांवर कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. म्हणून दिली जाहीर नोटीस.

अकोला
दिनांक.

**उपरोक्त अशिलातर्फे**
**ॲडव्होकेट के. डी. शिराळे**
पत्ता. ऑफिस नं. डी-३, दुसरा मजला,
शुभम अपार्टमेंट, नागाळा पार्क, २५२ /
१क/ २. शाहु ब्लड बँकेजवळ, कोल्हापूर
संपर्क क. ०२३१-२६६८८४७

## जाहीर नोटीस

तमाम लोकांचे माहिती करिता सदरचे जाहीर नोटीसीने प्रसिद्ध करणेत येते की, मिळकतीचे वर्णन. जिल्हा अकोला, ता. अकोला, मौजे.- उगवा येथील भू-मापन गट क्र - ५९२ याचे एकूण क्षेत्र ०० हे. ७९ आर, यापैकी लिहून देणार **१) शिला गजानन गिरी व इतर** यांचे सामाईक मालकीचे क्षेत्र ही या नोटीसीची विषयांकित मिळकत असून यापुढे त्यास सोईकरिता व संक्षिपाचे कारणास्तव सदर मिळकत असे संबोधलेले आहे. सदर मिळकतीपैकी काही मिळकतीबाबत त्यांचे मालकांनी पूर्णपणे निर्वेध, निष्कर्जी व सोक्त असल्याची हमी व निर्वाळा देवून आमचे अशिलांचेकडून सदर व्यवहारापोटी इसार म्हणून काही रक्कम स्विकारलेली असून सदर मिळकत भाडेपट्टा / योग्य त्या कराराने देणेचे मान्य व कबूल केलेले आहे. सबब, सदर मिळकतीबाबत, त्यांचे मालकी हक्काबाबत, वहिवाटीबाबत कोणाही बँका, पतसंस्था, खाजगी व्यक्ती, सावकार, शासकीय, निमशासकीय कार्यालये, इतर वित्तीय संस्था इत्यादी अगर अन्य कोणाचेही कसल्याही प्रकारचे कर्ज, बोजा, पीक कर्ज, लिज, तारण गहाण, मुदत खरेदी, बक्षीस, मृत्यूपत्र, वारसाहक्क, इजमेंट, शेजा-याशी वाद, भाडेपट्टा, वहिवाट, पोटगी, कुळ, ॲक्विजीशन, रिक्विजिशन, न्यायालयीन वाद, कोर्ट डिक्री इ. संबंधीचे कसल्याही प्रकारचे हक्कसंबंध वा अधिकार असलेस किंवा हरकत असलेस, तक्रार असलेस त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ सात दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्यावर सर्व कागदोपत्री पुराव्यानिशी येवून हरकती नोंदवाव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध, निष्कर्जी व सोक्त आहेत असे समजून आमचे अशील जागा मालकांशी पुढील व्यवहार पूर्ण करतील. तदनंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत वा तक्रार आलेस ती सदर मिळकतींवर, आमचे अशीलांचेवर व त्यांचे कायदेशीर हक्कांवर कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. म्हणून दिली जाहीर नोटीस.

अकोला
दिनांक. ०३/०४/२०२६

**उपरोक्त अशिलातर्फे**
**ॲडव्होकेट के. डी. शिराळे**
पत्ता. ऑफिस नं. डी-३, दुसरा मजला,
शुभम अपार्टमेंट, नागाळा पार्क, २५२ /
१क/ २. शाहु ब्लड बँकेजवळ, कोल्हापूर
संपर्क क. ०२३१-२६६८८४७

## जाहीर नोटीस

तमाम लोकांचे माहिती करिता सदरचे जाहीर नोटीसीने प्रसिद्ध करणेत येते की, मिळकतीचे वर्णन. जिल्हा अकोला, ता. अकोला, मौजे. - उगवा येथील भू-मापन गट क्र - ५९५ याचे एकूण क्षेत्र ०१ हे. ३४ आर, यापैकी लिहून देणार **१) रामकृष्ण उकरडा महरे** यांचे मालकीचे क्षेत्र ही या नोटीसीची विषयांकित मिळकत असून यापुढे त्यास सोईकरिता व संक्षिपाचे कारणास्तव सदर मिळकत असे संबोधलेले आहे. सदर मिळकतीपैकी काही मिळकतीबाबत त्यांचे मालकांनी पूर्णपणे निर्वेध, निष्कर्जी व सोक्त असल्याची हमी व निर्वाळा देवून आमचे अशिलांचेकडून सदर व्यवहारापोटी इसार म्हणून काही रक्कम स्विकारलेली असून सदर मिळकत भाडेपट्टा / योग्य त्या कराराने देणेचे मान्य व कबूल केलेले आहे. सबब, सदर मिळकतीबाबत, त्यांचे मालकी हक्काबाबत, वहिवाटीबाबत कोणाही बँका, पतसंस्था, खाजगी व्यक्ती, सावकार, शासकीय, निमशासकीय कार्यालये, इतर वित्तीय संस्था इत्यादी अगर अन्य कोणाचेही कसल्याही प्रकारचे कर्ज, बोजा, पीक कर्ज, लिज, तारण गहाण, मुदत खरेदी, बक्षीस, मृत्यूपत्र, वारसाहक्क, इजमेंट, शेजा-याशी वाद, भाडेपट्टा, वहिवाट, पोटगी, कुळ, ॲक्विजीशन, रिक्विजिशन, न्यायालयीन वाद, कोर्ट डिक्री इ. संबंधीचे कसल्याही प्रकारचे हक्कसंबंध वा अधिकार असलेस किंवा हरकत असलेस, तक्रार असलेस त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ सात दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्यावर सर्व कागदोपत्री पुराव्यानिशी येवून हरकती नोंदवाव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध, निष्कर्जी व सोक्त आहेत असे समजून आमचे अशील जागा मालकांशी पुढील व्यवहार पूर्ण करतील. तदनंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत वा तक्रार आलेस ती सदर मिळकतींवर, आमचे अशीलांचेवर व त्यांचे कायदेशीर हक्कांवर कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. म्हणून दिली जाहीर नोटीस.

अकोला
दिनांक. ०३/०४/२०२६

**उपरोक्त अशिलातर्फे**
**ॲडव्होकेट के. डी. शिराळे**
पत्ता. ऑफिस नं. डी-३, दुसरा मजला,
शुभम अपार्टमेंट, नागाळा पार्क, २५२ /
१क/ २. शाहु ब्लड बँकेजवळ, कोल्हापूर
संपर्क क. ०२३१-२६६८८४७

## जाहीर नोटीस

तमाम लोकांचे माहिती करिता सदरचे जाहीर नोटीसीने प्रसिद्ध करणेत येते की, मिळकतीचे वर्णन. जिल्हा अकोला, ता. अकोला, मौजे. - उगवा येथील भू-मापन गट क्र - ६४८ याचे एकूण क्षेत्र ०१ हे. ४२ आर, यापैकी लिहून देणार **१) ओमकार राजाराम तायडे** यांचे मालकीचे क्षेत्र ही या नोटीसीची विषयांकित मिळकत असून यापुढे त्यास सोईकरिता व संक्षिपाचे कारणास्तव सदर मिळकत असे संबोधलेले आहे. सदर मिळकतीपैकी काही मिळकतीबाबत त्यांचे मालकांनी पूर्णपणे निर्वेध, निष्कर्जी व सोक्त असल्याची हमी व निर्वाळा देवून आमचे अशिलांचेकडून सदर व्यवहारापोटी इसार म्हणून काही रक्कम स्विकारलेली असून सदर मिळकत भाडेपट्टा / योग्य त्या कराराने देणेचे मान्य व कबूल केलेले आहे. सबब, सदर मिळकतीबाबत, त्यांचे मालकी हक्काबाबत, वहिवाटीबाबत कोणाही बँका, पतसंस्था, खाजगी व्यक्ती, सावकार, शासकीय, निमशासकीय कार्यालये, इतर वित्तीय संस्था इत्यादी अगर अन्य कोणाचेही कसल्याही प्रकारचे कर्ज, बोजा, पीक कर्ज, लिज, तारण गहाण, मुदत खरेदी, बक्षीस, मृत्यूपत्र, वारसाहक्क, इजमेंट, शेजा-याशी वाद, भाडेपट्टा, वहिवाट, पोटगी, कुळ, ॲक्विजीशन, रिक्विजिशन, न्यायालयीन वाद, कोर्ट डिक्री इ. संबंधीचे कसल्याही प्रकारचे हक्कसंबंध वा अधिकार असलेस किंवा हरकत असलेस, तक्रार असलेस त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ सात दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्यावर सर्व कागदोपत्री पुराव्यानिशी येवून हरकती नोंदवाव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध, निष्कर्जी व सोक्त आहेत असे समजून आमचे अशील जागा मालकांशी पुढील व्यवहार पूर्ण करतील. तदनंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत वा तक्रार आलेस ती सदर मिळकतींवर, आमचे अशीलांचेवर व त्यांचे कायदेशीर हक्कांवर कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. म्हणून दिली जाहीर नोटीस.

अकोला
दिनांक. ०३/०४/२०२६

**उपरोक्त अशिलातर्फे**
**ॲडव्होकेट के. डी. शिराळे**
पत्ता. ऑफिस नं. डी-३, दुसरा मजला,
शुभम अपार्टमेंट, नागाळा पार्क, २५२ /
१क/ २. शाहु ब्लड बँकेजवळ, कोल्हापूर
संपर्क क. ०२३१-२६६८८४७

## जाहीर नोटीस

तमाम लोकांचे माहिती करिता सदरचे जाहीर नोटीसीने प्रसिद्ध करणेत येते की, मिळकतीचे वर्णन. जिल्हा अकोला, ता. अकोला, मौजे. - उगवा येथील भू-मापन गट क्र - ६२१ याचे एकूण क्षेत्र ०१ हे. ६२ आर, यापैकी लिहून देणार **१) राहुल भाउराव डोंगरे** यांचे मालकीचे क्षेत्र ही या नोटीसीची विषयांकित मिळकत असून यापुढे त्यास सोईकरिता व संक्षिपाचे कारणास्तव सदर मिळकत असे संबोधलेले आहे. सदर मिळकतीपैकी काही मिळकतीबाबत त्यांचे मालकांनी पूर्णपणे निर्वेध, निष्कर्जी व सोक्त असल्याची हमी व निर्वाळा देवून आमचे अशिलांचेकडून सदर व्यवहारापोटी इसार म्हणून काही रक्कम स्विकारलेली असून सदर मिळकत भाडेपट्टा / योग्य त्या कराराने देणेचे मान्य व कबूल केलेले आहे. सबब, सदर मिळकतीबाबत, त्यांचे मालकी हक्काबाबत, वहिवाटीबाबत कोणाही बँका, पतसंस्था, खाजगी व्यक्ती, सावकार, शासकीय, निमशासकीय कार्यालये, इतर वित्तीय संस्था इत्यादी अगर अन्य कोणाचेही कसल्याही प्रकारचे कर्ज, बोजा, पीक कर्ज, लिज, तारण गहाण, मुदत खरेदी, बक्षीस, मृत्यूपत्र, वारसाहक्क, इजमेंट, शेजाऱ्याशी वाद, भाडेपट्टा, वहिवाट, पोटगी, कुळ, ॲक्विजीशन, रिक्विजिशन, न्यायालयीन वाद, कोर्ट डिक्री इ. संबंधीचे कसल्याही प्रकारचे हक्कसंबंध वा अधिकार असलेस किंवा हरकत असलेस, तक्रार असलेस त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ सात दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्यावर सर्व कागदोपत्री पुराव्यानिशी येवून हरकती नोंदवाव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध, निष्कर्जी व सोक्त आहेत असे समजून आमचे अशील जागा मालकांशी पुढील व्यवहार पूर्ण करतील. तदनंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत वा तक्रार आलेस ती सदर मिळकतींवर, आमचे अशीलांचेवर व त्यांचे कायदेशीर हक्कांवर कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. म्हणून दिली जाहीर नोटीस.

अकोला
दिनांक. ३/०४/२०२६

**उपरोक्त अशिलातर्फे**
**ॲडव्होकेट के. डी. शिराळे**
पत्ता. ऑफिस नं. डी-३, दुसरा मजला,
शुभम अपार्टमेंट, नागाळा पार्क, २५२ /
१क/ २. शाहु ब्लड बँकेजवळ, कोल्हापूर
संपर्क क. ०२३१-२६६८८४७

# पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांच्याहस्ते ८ उमेदवारांना नियुक्ती आदेश

## अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये नियुक्ती द्या शासन नोकरीसाठी ३० उमेदवार पात्र, काही नियुक्त्या इतर जिल्ह्यात

**वर्धा/जनमाध्यम**

अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये खुन प्रकरणाच्या पिडीत कुटुंबातील सदस्यांना शासकीय नोकरी देण्याचे धोरण आहे. त्यानुसार रिक्त जागांची उपलब्धता आणि लाभार्थी उमेदवारांच्या पात्रतेनुसार जिल्ह्यातील अनुसूचित जाती कुटुंबातील ८ उमेदवारांना पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांच्याहस्ते शासकीय नोकरीचे नियुक्ती आदेश देण्यात आले. जिल्ह्यात पात्र ३० उमेदवारांपैकी काही नियुक्त्या इतर जिल्ह्यात देण्यात आल्या आहे.




जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात नियुक्ती आदेश वितरणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी जिल्हाधिकारी वान्मथी सी, अतिरिक्त जिल्हाधिकारी संजय तेली, समाजकल्याणचे सहाय्यक आयुक्त अंकेश केदार, आदिवासी विकास विभागाच्या प्रकल्प अधिकारी गितांजली निकम, जिल्हा माहिती अधिकारी मंगेश वरकड, सालोडचे उपसरपंच आशिष कुचेवार आदी उपस्थित होते.नियुक्त्या देण्यात आलेल्या ८ उमेदवारांमध्ये पुजा आनंदराव रनधिर, राहुल ज्ञानेश्वर वाहने, निलेश वसंतराव हातमोडे, स्वप्नील सुरेश ओंकार, प्रगती गजानन देवतळे, विकास दौलतराव शंभरकर, शुभम रमेश घोरपडे, मन्टी अशोकराव तायवाडे या उमेदवारांचा समावेश आहे. समाजकल्याणच्या निवासी शाळा, वसतीगृहांमध्ये वेगवेगळ्या पदांवर हे उमेदवार कार्यरत राहणार आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहाय्यक आयुक्त अंकेश केदार यांनी केले. संचलन समाजकल्याण निरिक्षक शरद निबुदे यांनी केले. कार्यक्रमास उमेदवारांसह त्यांचे कुटुंबिय उपस्थित होते.

**आधार हरवलेल्या कुटुंबाला धीर देण्याचा प्रयत्न-भोयर**

अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये पिडीत व्यक्तीस १ ते ८ लाख रुपयांपर्यंत प्रकरणपरत्वे मदत दिली जाते. अनुसूचित जाती जमाती या घटकातील ज्या कुटुंबात खुनासारखा गंभीर प्रकार घडलेला असतो, अशा कुटुंबातील पात्र व्यक्तीस शासकीय नोकरी देण्यात येते. घरातील कर्ता पुरुष गेल्यानंतर कुटुंब वाऱ्यावर न सोडता त्या कुटुंबाला दिलासा देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हा महत्वपुर्ण निर्णय घेतला असल्याचे पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यावेळी म्हणाले. जिल्ह्यात ३० कुटुंबातील उमेदवार नोकरी मिळविण्यास पात्र आहे. यापैकी ८ उमेदवारांना वर्धा जिल्ह्यात तर चंद्रपूर २, गडचिरोली ७, भंडारा १, नागपूर १ याप्रमाणे नियुक्ती देण्यात आल्या आहे. ११ कुटुंब अनुसूचित जमातीतील असल्याने या उमेदवारांना आदिवासी विकास विभागाच्यावतीने नियुक्त्या देण्यात येणार असल्याचे पालकमंत्र्यांनी सांगितले.

# स्फोटक उद्योगातील कामगारांसाठी दर्जा, वेतनवाढीची मागणी

## लॉकडाऊन प्रकरणाच्या चौकशीसाठी खासदारांची मंत्रींकडे धाव

**तळेगाव(शा प)/जनमाध्यम**

येथील सिडेट एक्सप्लोझीव इंडस्ट्रीज प्रा. लि. या स्फोटक उद्योगातील कामगारांच्या विविध मागण्यांकडे लक्ष वेधत अमर शरदराव काळे यांनी कामगार मंत्री आकाश फुंडकर यांची भेट घेतली. कामगारांना विशेष दर्जा देऊन वेतनवाढ करावी तसेच कंपनीने जाहीर केलेल्या लॉकडाऊन प्रकरणाची चौकशी करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली



सदर उद्योगात काम करणाऱ्या कामगारांनी अलीकडेच खासदार काळे यांची भेट घेऊन त्यांच्या अडचणी मांडल्या होत्या. स्फोटक उद्योग हा फॅक्टरी ॲक्ट १९४८ अंतर्गत धोकादायक स्वरूपाचा असल्याने येथे कार्यरत कामगारांना त्यांच्या कामाच्या जोखमीप्रमाणे वेतन व भत्ते मिळणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.तसेच, १४ मार्च २०२६ पासून कंपनीने कोणतीही पूर्वसूचना न देता लॉकडाऊन जाहीर करून कामगारांना कामापासून वंचित ठेवल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनेची सखोल चौकशी करून कामगारांना न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी करण्यात आली.

कामगारांच्या सेवा अटी, सुरक्षा, आरोग्य, कामाचे तास, बोनस तसेच कंत्राटी कामगारांच्या हक्कांबाबत ठोस धोरण आखण्याची गरज असल्याचे खासदार काळे यांनी मंत्री फुंडकर यांना सांगितले. याबाबत शासन स्तरावर योग्य तो निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन मंत्री आकाश फुंडकर यांनी दिले.कामगारांच्या मागण्यांची दखल घेतल्याबद्दल खासदार अमर शरदराव काळे यांनी समाधान व्यक्त केले.

## संक्षिप्त

### किरायदाराकडून घरमालकास मारहाण

**हिंगणघाट**-किरकोळ कारणावरून किरायदाराने घरमालकावर सळाखीने हल्ला केल्याची घटना शास्त्री वॉर्डात घडली. विनोद पारधी (वय ३०) यांच्या घरात राहणाऱ्या विनोद कुशानकार याने इलेक्ट्रीक बोर्डातील पिन काढल्यामुळे वाद निर्माण झाला. घरमालकाने त्याला याबाबत विचारणा केली असता दोघांमध्ये वाद वाढला. यानंतर आरोपीने पारधी यांना त्यांच्या खोलीत नेऊन सळाखीने मारहाण केल्याचे तक्रारीत नमूद आहे. या हल्ल्यात पारधी जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

### संशयित युवक पोलिसांच्या ताब्यात

**हिंगणघाट**-निखाडे कॉम्प्लेक्स परिसरात संशयास्पदरीत्या वावरणाऱ्या एका युवकाला पोलिसांनी ताब्यात घेतले. रोहित भगत (वय २०, रा. प्रज्ञानगर) हा अंधाराचा फायदा घेत लपून बसलेला आढळला. त्याच्या हालचाली संशयास्पद वाटल्याने पोलिसांनी त्याला चौकशीसाठी ताब्यात घेतले. प्राथमिक चौकशीत तो कुठल्यातरी गुन्ह्याच्या तयारीत असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. पोलिसांनी त्याच्याकडून अधिक माहिती घेण्यास सुरुवात केली असून परिसरात गस्त वाढविण्यात आली आहे. नागरिकांनीही सतर्क राहण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# रोजगार सेवकांचा आक्रोश टोकाला; 'जीआर लागू करा, अन्यथा काम बंद

## राज्यव्यापी आंदोलनाची हाक

**आर्वी/जनमाध्यम**

ग्राम रोजगार सेवकांच्या प्रलंबित मागण्यांवरून आर्वी तालुक्यात आंदोलनाचा सूर तीव्र झाला असून, १ एप्रिल २०२६ रोजी तालुक्यातील विविध विभागांना निवेदन देत काम बंदची घोषणा करण्यात आली. तहसीलदार हरीश काळे, गटविकास अधिकारी प्रदीप चव्हाण, तसेच तालुका कृषी व सामाजिक वनीकरण अधिकाऱ्यांना याबाबत निवेदन देण्यात आले.



३ ऑक्टोबर २०२४ रोजी राज्य शासनाने ग्राम रोजगार सहाय्यकांना दरमहा ८ हजार रुपये मानधन, २ हजार रुपये प्रवास भत्ता आणि मोबाईल रिचार्ज देण्याचा शासन निर्णय जाहीर केला होता. मात्र, तब्बल १८ महिने उलटूनही या निर्णयाची अंमलबजावणी झालेली नाही, अशी खंत रोजगार सेवकांनी व्यक्त केली. त्यामुळे शासनाच्या निष्क्रियतेविरोधात राज्यव्यापी काम बंद आंदोलन पुकारण्यात आले आहे.या आंदोलनामुळे रोजगार हमी योजनेअंतर्गत सुरू असलेली सिंचन विहीर, फळबाग लागवड, घरकुल, शौचालय, पांदण रस्ते यांसारखी कामे ठप्प होण्याची शक्यता असून, कुशल-अकुशल मजुरांचे पैसेही शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणार नाहीत. परिणामी, शेतकरी व लाभार्थ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागणार आहे.

रोजगार सेवक हे रोजगार हमी योजनेचे महत्त्वाचे दुवे मानले जात असले तरी त्यांना अत्यल्प मानधनावर काम करावे लागत आहे. त्यातच ऑनलाइन उपस्थितीची कठोर अट, अनेक कामांचा ताण आणि गावागावातील विविध प्रकल्पांवर उपस्थिती नोंदविण्याची जबाबदारी यामुळे त्यांच्यावर प्रचंड ताण वाढला आहे.एका गावात अनेक कामे सुरू असताना प्रत्येक ठिकाणी जाऊन उपस्थिती नोंदविणे शक्य आहे का असा प्रश्न रोजगार सेवकांनी उपस्थित केला आहे. या पार्श्वभूमीवर, शासनाने तातडीने निर्णय घेऊन जीआरची अंमलबजावणी करावी, अन्यथा आंदोलन आणखी तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला आहे.रोजगार सेवक संघटनेच्या वतीने प्रशासनाला दिलेल्या या 'अल्टिमेटम'मुळे आता शासन काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# जीवनावश्यक वस्तू महागल्या सामान्यांचे आर्थिक बजेट कोलमडले

## युद्धाच्या धगेसोबत वाढले दर; गॅस, इंधन, खाद्यतेलाने घरगुती अर्थकारण उद्ध्वस्त

**साहूर/जनमाध्यम**

जागतिक संघर्षाच्या ज्वाळा आता थेट सामान्यांच्या स्वयंपाकघरात धडकू लागल्या आहेत. आधीच महागाईने होरपळलेल्या सर्वसामान्यांच्या जखमेवर आता युद्धाने मीठ चोळले असून जीवनावश्यक वस्तूंच्या दरवाढीने घरगुती बजेट अक्षरशः कोलमडले आहे.

गेल्या महिनाभरापासून आखाती देशांमध्ये सुरू असलेल्या संघर्षामुळे कच्च्या तेलाचा पुरवठा विस्कळीत झाला. त्याचा थेट फटका गॅस, पेट्रोल, डिझेल आणि खाद्यतेलाच्या दरांना बसला आहे. घरगुती गॅस सिलेंडरमध्ये तब्बल ६० रुपयांची वाढ होऊन तो आता १०१० रुपयांवर पोहोचला आहे. त्याचबरोबर पेट्रोल-डिझेल आणि खाद्यतेलातही प्रति लिटर १५ ते २० रुपयांची वाढ झाल्याने सर्वसामान्यांचे आर्थिक गणितच बिघडले आहे. ग्रामीण भागातील परिस्थिती तर अधिकच बिकट झाली आहे.

उज्ज्वला योजनेअंतर्गत गॅस कनेक्शन मिळालेल्या हजारो महिलांना आता सिलेंडरच्या वाढत्या किमती आणि तुटवड्यामुळे पुन्हा चुलीकडे वळावे लागत आहे. अनेकांकडे एकच सिलेंडर असल्याने ४५ दिवसांची प्रतीक्षा ही डोकेदुखी ठरत आहे.

केरोसीन आधीच बंद झाल्याने आणि गॅस महागल्याने महिलांनी पुन्हा जंगलाकडे धाव घेतली आहे. जीव मुठीत धरून लाकडे गोळा करताना त्यांना वाघ आणि इतर हिंस्त्र प्राण्यांचा धोका पत्करावा लागत आहे. एकीकडे महागाई, दुसरीकडे रोजगाराचा अभाव या दुहेरी संकटात सामान्य गृहिणी अक्षरशः भरडली जात आहे.

उन्हाळ्यामुळे शेतीची कामे ठप्प असून मजुरीचीही टंचाई निर्माण झाली आहे. अशा परिस्थितीत घर चालवायचं कसं हा ज्वलंत प्रश्न साहूर परिसरातील महिलांच्या डोळ्यात दिसत आहे.

शासनाकडून मिळणारी मदत अपुरी ठरत असून तीही नियमित नसल्याने आर्थिक ओढाताण अधिकच वाढली आहे.महागाईचा हा भडका फक्त आकड्यांत नाही, तर प्रत्येक घराच्या चुलीत, प्रत्येक ताटात आणि प्रत्येक कुटुंबाच्या जगण्यात जळत आहे, आणि सामान्य माणूस या आगीसमोर हतबल उभा आहे.

### वृद्धास दगडाने मारहाण; एक जखमी

**पुलगाव**-बरांडा येथील रमेश जाठे (वय ६५) यांना दगडाने मारहाण करून जखमी केल्याची घटना समोर आली आहे. रात्रीच्या सुमारास ते पायी घराकडे जात असताना आरोपी सुनील ओंकार याने त्यांच्याशी वाद घातला. वादाचे रूपांतर मारहाणीमध्ये झाले असून आरोपीने दगडाने हल्ला केल्याचे तक्रारीत नमूद आहे. जखमी रमेश जाठे यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती मिळाली. या घटनेमुळे परिसरात काही काळ तणाव निर्माण झाला होता. पुलगाव पोलिसांनी प्रकरणाची नोंद घेतली असून आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. पुढील तपास करण्यात येत आहे.

### रेती चोरीप्रकरणी टिप्पर जप्त

**देवळी**-वर्धा नदीतून अवैधरीत्या रेती उत्खनन करून वाहतूक करणाऱ्या टिप्परवर पोलिसांनी कारवाई केली. वायगाव-देवळी मार्गावरील उड्डाण पुलाजवळ संशयावरून टिप्पर अडवून तपासणी करण्यात आली. त्यावेळी वाहनात मोठ्या प्रमाणात रेती आढळून आली. सदर रेतीची कोणतीही वैध परवानगी नसल्याचे निष्पन्न झाल्यानंतर पोलिसांनी टिप्परसह सुमारे २० लाख १५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी मुन्नालाल आंबेडारे व पप्पू पठाण (रा. सालोड हिरापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अवैध रेती वाहतुकीविरुद्ध पोलिसांची कारवाई सुरूच राहणार असल्याचे सांगण्यात आले.

# अण्णाभाऊ साठे चौकाच्या सौंदर्यीकरणासाठी निधीची मागणी

## आमदारांकडून सकारात्मक भूमिका



**समुद्रपूर/जनमाध्यम**

तालुक्यातील गिरड येथील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौकाच्या सौंदर्यीकरणासाठी निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात आली आहे. समुद्रपूर येथील तहसील कार्यालयात आयोजित समस्या निराकरण बैठकीत माजी जिल्हा परिषद सदस्य फकीर खडसे यांनी निवेदनाद्वारे ही मागणी मांडली.

गिरड खुर्सापार व टेकडी मार्गावर वसलेला हा चौक महत्त्वाचा ठिकाण असून त्याचे सौंदर्यीकरण झाल्यास परिसराचे आकर्षण वाढण्यास मदत होईल, असे ग्रामस्थांचे मत आहे. तसेच, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याला यामुळे अधिक उजाळा मिळेल, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली.यावेळी आमदार समीर कुणावार यांनी या मागणीची सकारात्मक दखल घेत संबंधित अधिकाऱ्यांना विषय तातडीने मार्गी लावण्याच्या सूचना दिल्या. त्यामुळे या चौकाच्या सौंदर्यीकरणाचा मार्ग मोकळा होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

परंपरेचा दांडगा वारसा

# लाठी-काठीतून घडते शिस्त आणि सामर्थ्य-इमरान राही

## विदर्भ स्तरीय लाठी चॅम्पियनशिप-२०२६ चे उत्साहात उद्घाटन



**वायगाव (निपानी)/ जनमाध्यम**

महाराष्ट्राच्या समृद्ध परंपरेचा ठसा उमटवणारा लाठी-काठी हा खेळ आजही तितक्याच जोमाने जिवंत असल्याचे चित्र वायगाव येथे पाहायला मिळाले. लक्ष्मीबाई सभागृहात आयोजित विदर्भ स्तरीय लाठी चॅम्पियनशिप-२०२६ चे उत्साहात उद्घाटन करण्यात आले.

या वेळी युनिव्हर्सल मार्शल आर्ट अकादमीचे राष्ट्रीय सल्लागार इमरान राही यांनी लाठी-काठी हा केवळ खेळ नसून शिस्त, आत्मविश्वास आणि शारीरिक तंदुरुस्ती घडवणारे प्रभावी माध्यम असल्याचे प्रतिपादन केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळापासून हा खेळ युद्धकौशल्य शिकवणारा ठरला असून आज तो स्पर्धात्मक रूपात अधिक बळकट होत असल्याचे त्यांनी सांगितले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लाठी इंटरनॅशनल कौन्सिलचे सदस्य महागुरू सुभाष मोहिते होते. त्यांनी स्पर्धेतून खेळाडूंमध्ये साहस, कौशल्य आणि शिस्त विकसित होईल, असा विश्वास व्यक्त केला. प्रमुख अतिथी म्हणून मोहम्मद रफीक, कोषी उल्हास वाघ, किरण यादव यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.स्पर्धेत विदर्भातील विविध जिल्ह्यांमधून सुमारे २०० विद्यार्थी सहभागी झाले असून त्यांच्या जोशपूर्ण सहभागाने वातावरण दणाणून गेले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मार्शल गवळी यांनी केले, तर संचालन अमोल मानकर यांनी केले. आभार अभिजीत पारगांवकर यांनी मानले.या यशस्वी आयोजनासाठी साहिल वाघ, मिलिंद मानकर, हर्षाली चौधरी, प्रांजली नागदेवे आदींसह अनेक कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम घेतले. पारंपरिक क्रीडेला आधुनिक स्पर्धात्मक व्यासपीठ मिळाल्याने लाठी-काठीच्या वारशाला नवे बळ मिळत असल्याचे चित्र यावेळी पाहायला मिळाले.

# डिजिटल गाव, स्वच्छ गाव, विकसित गाव : मनसावळीचा आदर्श उभा

## मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानातून गावाचा कायापालट; सरपंच प्रांजली भोयर यांचा जनसंवाद ठरला यशाचा मंत्र

**मोझरी शेकापूर/जनमाध्यम**

गाव बदलायचं असेल तर लोकांना सोबत घ्यावं लागतं, हे वाक्य मनसावळी ग्रामपंचायतीने अक्षरशः कृतीत उतरवले आहे. मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाच्या माध्यमातून मनसावळी गावाने विकासाचा नवा आदर्श निर्माण केला असून स्वच्छता, डिजिटलायझेशन आणि पर्यावरणपूरक उपक्रमांचा संगम येथे पाहायला मिळतो.

हिंगणघाट पंचायत समिती अंतर्गत असलेले २६५ घरांचे आणि १००८ लोकसंख्येचे हे छोटेसे गाव आज मोठा बदल अनुभवत आहे. सरपंच प्रांजली भोयर यांनी गावकऱ्यांशी थेट संवाद साधत विकासाचा संकल्प रुजवला आणि त्यातूनच गावाच्या कायापालटाला सुरुवात झाली.गावात शुद्ध पिण्याच्या पाण्यासाठी आरओ प्रकल्प, युवकांसाठी ओपन जिम, तसेच कौशल्य विकास प्रशिक्षण यांसारखे उपक्रम राबविण्यात आले. श्रमदानातून पांदण रस्त्यांची उभारणी करण्यात आली असून ग्रामस्थांचा सक्रिय सहभाग ही या यशाची खरी ताकद ठरली आहे.मनसावळीत पीठ गिरणी, गांडूळ खत निर्मिती, प्लास्टिक निर्मूलन, शोषखड्डे, सार्वजनिक




उद्यान यांसारख्या उपक्रमांनी गावाला पर्यावरणपूरक दिशा दिली आहे. विशेष म्हणजे ग्रामपंचायत कार्यालय, प्राथमिक शाळा आणि अंगणवाडी येथे डिजिटल सुविधा सुरू करून शिक्षण व प्रशासनात आधुनिकतेची जोड देण्यात आली आहे.गावाच्या स्वच्छतेमुळे आणि सुशोभीकरणामुळे मनसावळीला सन २०२३-२४ मध्ये संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता जिल्हास्तरीय पुरस्कार मिळाला. याशिवाय 'स्मार्ट ग्राम सुंदर गाव' अंतर्गतही तालुका व जिल्हा स्तरावर सन्मान मिळाला आहे.अलिकडेच स्मशानभूमीच्या सौंदर्यीकरणाच्या कामालाही सुरुवात झाली असून गावाच्या सर्वांगीण विकासाचा वेग कायम आहे. मंगळवारी ग्रामपंचायत कार्यालयात कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम पार पडला. युवक-युवती आणि महिलांनी मोठ्या उत्साहात सहभाग घेतला.

यावेळी सरपंच प्रांजली भोयर, ग्रामविकास अधिकारी किशोर जाधव, उपसरपंच बुद्धराज खैरे, सदस्य केशव मून, अरुणा भोंगाडे आदी उपस्थित होते.आज मनसावळी हे केवळ एक गाव नसून स्वच्छता, सहभाग आणि स्मार्ट विकास यांचा जिवंत नमुना बनले आहे. सरपंच भोयर यांच्या नेतृत्वाखाली गावाने उभारलेला हा विकासाचा झेंडा इतर गावांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक १२६
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय- अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# हनुमंताच्या जयघोषाने दुमदुमली अंबानगरी

## -वीर हनुमान सेवा समितीच्या शोभायात्रेने वेधले लक्ष

### उज्जैनच्या गजराजसह विविध देखावे ठरले आकर्षण

**अमरावती/ प्रतिनिधीः-** वीर हनुमान सेवाभावी समितीच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही हनुमान जयंती निमित्य आज बुधवार १ एप्रिल रोजी सायंकाळी बुधवारा येथील आझाद हिंद मंडळ परिसरातून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. यामध्ये उज्जैनच्या गजरासह विविध देखावे आकर्षणाचे केंद्र ठरले. शोभायात्रेच्या माध्यमातून धार्मिक आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा अदभूत संगम पाहायला मिळाला. बुधवारा मधून निघालेली शोभायात्रा सिताराम बिल्डिंग, अंबागेट, गांधी चौक, राजकमल चौक, सरोज चौक, जवाहर गेट, सक्कर साथ, सराफा, जैन मंदिर , भाजी बाजार, बजरंग चौक मार्गे आजाद हिंद चौक मध्ये विसर्जित झाली. शोभायात्रेमध्ये उज्जैनचा गजराज, हरियाणाचे महाकाली पथक आकर्षणाचे केंद्र ठरले. पथक द्वारा काली मातेची जिवंत प्रतिकृती, शिवपार्वती विवाह सोहळा, महाकालचे अघोरी नृत्य आणि विविध धार्मिक प्रात्यक्षिक सादर करण्यात आले.प्रभू श्रीरामची भव्य मूर्ती, पांडुरंगाची मूर्ती, संकटमोचन हनुमानजी साक्षात जिवंत वाटणारी प्रतिकृती, महाकालची मूर्ती यात्रेचे मुख्य श्रद्धास्थान ठरले. नृसिंह अवतार, राम राज्य प्रतिष्ठान, माझा देश माझी संस्कृती, बाबुळगावचे ढोल, विघ्नहर्ता लावली साऊंड व एम्पायर ऑडिओ बॅन्जो व धमाल, आदिवासी नृत्य, वारकरी दिंडी, आणि सामाजिक संदेश देणारे देखावे यांनी लक्ष वेधले.हनुमंत



रायाच्या जयघोषाने अंबा नगरी दुमदुमली. शोभयात्रेमध्ये खासदार बळवंत वानखडे, माजी मंत्री यशोमती ठाकूर, माजी महापौर विलास इंगोले, भैय्या पवार, नगरसेवक संजय शिरभाते, अनिल अग्रवाल सुनीता भेले, मिलिंद चिमोटे, अभिनंदन पेंढारी, प्रमोद इंगोले किरण चांदवटकर, पूजा इंगोले, नगरसेविका राजश्री चढाणे, सतीश इंगोले, सुजल पंत, आकाश हिवसेसह समितीचे पदाधिकारी कार्यकर्ता व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. शोभायात्रा राजकमल चौकात पोहोचल्यावर भाविकांच्या उपस्थितीत हनुमान चालीसाचे सामूहिक पठण व मान्यवरांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. संकट मोचन रथावर फुलांची उधळण आणि आतिशबाजी झाली.

### जेष्ठ नागरिक सन्मित्र मंडळाचे आयोजन

# धनश्री देशपांडे यांचा सुमधूर संगीत कार्यक्रम ६ एप्रिलला

## - विलास मराठेंच्या हस्ते स्मरणिकेचे विमोचन होणार

**अमरावती/ अमरावती :-** जेष्ठ नागरिक सन्मित्र मंडळ अमरावतीच्या, रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त श्री अंबादेवी संस्थानच्या संयुक्त विद्यमाने अमरावतीच्या सूनबाई आणि मुंबईच्या प्रख्यात गायिका धनश्री शशांक देशपांडे, संगीतकार रामेश्वर काळे आणि संच यांचा सुमधूर हिंदी व मराठी गीतांचा कार्यक्रम सोमवार दि .६ एप्रिलला सायंकाळी ६ ते ९ या वेळेत अंबागेटच्या



जवळील भव्य व सुसज्ज श्री अंबादेवी कीर्तन हॉल येथे आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमाचे औचित्य साधून जेष्ठ नागरिक सन्मित्र मंडळाच्या 'सन्मित्र ' रौप्य महोत्सवी विशेषांक २०२६ चे विमोचन दै . हिंदुस्थानचे संपादक विलास अरुण मराठे यांचे शुभ हस्ते संपन्न होणार आहे. सर्व रसिक श्रोत्यांनी बहुसंख्येने उपस्थित राहून सदर कार्यक्रमाचा रसास्वाद घ्यावा, असे आवाहन जेष्ठ नागरिक सन्मित्र मंडळ तथा श्री अंबादेवी संस्थानतर्फे करण्यात येत आहे.

# कवी घनशाम सावरकर यांच्या 'बाप वाट पाही' काव्यसंग्रहाचे प्रकाशन!

## -चैत्रपालवी कविसंमेलनात वऱ्हाडी कवितेची उधळण -कोकर्डा गावच्या शिरपेचात मानाचा तुरा

**अंजनगाव सुर्जी/ प्रतिनिधीः-** अंजनगाव तालुक्यातील कोकर्डा येथील मूळ रहिवासी आणि साहित्यात 'शब्दशाम' या नावाने परिचित असलेले कवी घनशाम सुधाकर सावरकर यांच्या 'बाप वाट पाही' या पहिल्यावहिल्या कवितासंग्रहाचा प्रकाशन सोहळा नुकताच भुसावळ येथे मोठ्या थाटात पार पडला. त्यांचे आधी एक लळा कवितेचा हा कवितासंग्रह महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे यांनी प्रकाशित केला आहे. सोबतच त्यांची गुजरातच्या अभ्यासक्रमात कविता समाविष्ट झाली आहे. तसेच अनेक राज्यस्तरीय साहित्यिक आणि शैक्षणिक पुरस्कार त्यांना मिळालेले आहेत. कोकर्डा गावच्या या सुपुत्राने



जळगाव जिल्ह्यातही साहित्याची मोहोर उमटवल्याने संपूर्ण अमरावती जिल्ह्यात आणि तालुक्यात त्यांचे विशेष कौतुक होत आहे.

भुसावळ येथील 'प्रतिष्ठा महिला मंडळ' आयोजित 'चैत्रपालवी' या भव्य बहुभाषिक कविसंमेलनात राज्याचे वस्त्रोद्योग मंत्री नामदार संजय सावकारे यांच्या शुभहस्ते आणि साहित्य क्षेत्रातील अनेक दिग्गजांच्या साक्षीने या पुस्तकाचे विमोचन करण्यात आले. या शानदार सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी अंबरनाथचे ज्येष्ठ साहित्यिक प्रा. किसन वराडे हे होते, तर प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सुषमा खानापूरकर आणि स्वागताध्यक्षा म्हणून मंडळाच्या अध्यक्षा सौ. रजनीताई सावकारे उपस्थित होत्या.

कवी घनशाम सावरकर हे मूळचे कोकर्डा (जि. अमरावती) येथील शेतकरी कुटुंबातील असून सध्या ते जळगाव जिल्ह्यातील टहाकळी (ता. भुसावळ) येथे जि.प. शाळेत प्राथमिक शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या या संग्रहात शेतकरी बापाची पावसासाठीची तडफड आणि ग्रामीण कष्टकरी जीवन अतिशय प्रभावीपणे मांडण्यात आले आहे. विशेष म्हणजे या पुस्तकाला अमरावतीचेच ज्येष्ठ समीक्षक डॉ. सतीश तराळ यांची अभ्यासपूर्ण प्रस्तावना लाभली आहे.या प्रकाशन सोहळ्यानंतर झालेल्या कविसंमेलनात कवी घनशाम सावरकर यांनी आपल्या 'बाप वाट पाही' या शीर्षक कवितेने शेतकरी बापाची वेदना मांडून श्रोत्यांना अंतर्मुख केले. तर लगेचच 'रोडगेयची पंगत' ही अस्सल वऱ्हाडी विनोदी कविता मंचावर सादर करून संपूर्ण सभागृहात हास्याचे फवारे उडवले. त्यांच्या या अस्सल वऱ्हाडी बाजाला आणि सादरीकरणाला खान्देशच्या रसिकांनी प्रचंड दाद दिली.

या सोहळ्याला भुसावळच्या उपनगराध्यक्षा शैलजा नारखेडे, प्रा. डॉ. रश्मीजी शर्मा, प्रा. संध्या महाजन आणि जयश्री काळवीट यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सुंदर सूत्रसंचालन कवयित्री संध्या भोळे आणि राजश्री देशमुख यांनी केले.


MAHAVITARAN

## E-TENDER NOTICE

E-Tenders are invited from the eligible/Registered and Reputed firm/contractors/agencies for the works detailed as under by E-Tendering method.

**Hiring of Vehicle (Maruti Dezire or Equivalent) for The Chief Engineer, MSEDCL, O&M Zone, Amravati.**

**Hiring of Vehicle (Car or Equivalent) for The Superintending Engineer (Infra Plan), MSEDCL, O&M Zone, Amravati.**

| Tender No. | Description of the Work | Tender Amount (Rs. In Lakhs) | Tender Fee (In Rs.) | E M D (In Rs.) |
|---|---|---|---|---|
| CE/AMTZ/HOV/ MVP2020/AMTZone// 2026-27/T-01 | Work contract for Hiring of Vehicle (Maruti Dezire or Equivalent) for The Chief Engineer, MSEDCL, O&M Zone, Amravati. | 04.92 | 590/- (Including GST) | 4920/- |
| CE/AMTZ/HOV/ MVP2020/Infra/ 2026-27/T-02 | Work contract for Hiring of Vehicle (Car or Equivalent) for The Superintending Engineer (Infra Plan), MSEDCL, O&M Zone, Amravati. | 04.62 | 590/- (Including GST) | 4620/ |

**Date of start of bid sale : 03.04.2026 (From 11:00 Hrs)**
**Last Date of Bid sale : 22.04.2026 (up to 16.00 Hrs)**
**Last date for submission bid : 22.04.2026 (up to 17.00 Hrs.)**
**For further details of Tenders, please visit our website**
**https://etender.mahadiscom.in/eatApp**

Contact Person:
Executive Engineer (Adm), Amravati Zone Mob No. 7875761688
Address: Office of The Chief Engineer, Amravati Zone
Administrative Building, "Vidyut Bhavan", 2nd Floor, Camp Road, Amravati – 444603 (Maharashtra) Email: ceamtz@gmail.com

**Chief Engineer**
**MSEDCL, Amravati Zone, Amravati.**

**PRO No. 85**



## पाहिजे

ऑटोमोबाईल स्पेअर पार्टच्या गोडाऊनमध्ये काम करण्याकरीता दोन मुले पाहिजेत.
तसेच अकौन्टींग करीता एक मुलगी पाहिजे.
**--पत्ता--**
सी-१२, सातुर्णा, एम.आय.डी.सी.-बडनेरा रोड, अमरावती
मो.नं.७०२०८७९१६८/ ८००७३४२३३५



सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

## चौकशीची जाहीर नोटीस

(नमुना क्र.०२)

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 17/2026
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **श्री.जय भोलेनाथ संगमेश्वर देवस्थान जामठी, ता. जि.अमरावती**
बाबत अर्जदार - **रमेश जानराव चोपकार**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--
(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
**(अ) जंगम मिळकत (वर्णन)**
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन) -** मौजे जामठी, ता.जि.अमरावती स.नं.६३/२, २-अ व २-ब ०.०९ आर याची चतुःसिमा- पुर्वेस- रमेश चोमकार यांचे उर्वरित शेत, पश्चिमेस- नांदगांव पेठ शीव, उत्तरेस - नांदगांव पेठ ते जळका रस्ता, दक्षिणेस - नदी
स्थावर मालमत्ता अंदाजे किंमत रु.१०,००,०००/- दहा लाख रुपये.

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक ०१.०४.२०२६ रोजी दिली.

शिक्का
**अधीक्षक (न्याय शाखा)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती



## जाहीर नोटीस

जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, अमरावती
क्र.न.भू-१/अपील अर्ज नं.२९९०/२०२५ अमरावती दि. २४.०३.२०२६

**प्रति,**
१.इंडियन कनेडियन प्रेस ायटेरियन मिशन तर्फे मॉडरेटर राजेश हिरालाल भारती, रा.आकाश शिक्षण संस्था, खंडेलवाल पॅथॉलॉजी समोर, लक्ष्मी नगर, शासकीय दुध डेअरी समोर, मुर्तिजापूर रोड, अकोला **अपिलार्थी**
**-विरुध्द-**
१. उपअधीक्षक, भूमि अभिलेख, अमरावती
२. संजय सिंह, युनायटेड चर्च ऑफ नॉदर्न इंडिया ट्रस्ट असोसिएशन सुंदरलाल चौक, चपराशी पुरा, अमरावती **उत्तराथी**
३. युनायटेड चर्च ऑफ नॉदर्न इस्ट तर्फे जी.बी.गुप्ता, रा.मसानगंज, अमरावती

ज्याअर्थी अपिलार्थी यांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अंतर्गत मौजे शहर अमरावती, ता.जि.अमरावती येथील शिट नं.१८-बी, प्लॉट नं.३ चे बाबत उत्तरार्थी यांचे विरुध्द अपिल सादर केलेले आहे. परंतु उत्तरवादी नं.२ ते ३ हे सुनावणी वेळी उपस्थित राहत नसल्यामुळे उत्तरार्थी यांना याद्वारे कळविण्यात येते की, दिनांक ०४.०५.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता या न्यायासनासमोर आपण स्वतः किंवा आपले अधिवक्ता मार्फत सदर अपिलास उत्तर देण्यासाठी हजर रहावे. आपण वरील तारखेस सदर अपिलकामी न्यायासनासमोर गैरहजर राहिल्यास एकतर्फी निकाल देण्यात येईल.

आज दिनांक २४.०३.२०२६ रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिले आहे.

शिक्का
**(महेशकुमार शिंदे)**
**जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, अमरावती**



## सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, कार्यालय सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, चांदूर बाजार, जि.अमरावती

## जाहीर नोटीस

चांदूर बाजार तालुक्यातील ज्योतिबा गृहनिर्माण सहकारी संस्था मर्या., र.नं.६०२, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती ही संस्था सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, चांदूर बाजार यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०२ अन्वये अंतिमरित्या अवसायनात घेऊन संस्थेवर अवसायकाची नियुक्ती केली आहे. सदर संस्थेचा अवसायन कालावधी १० वर्षापेक्षा अधिक असल्या कारणाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०९ अन्वये अवसायनाची कार्यवाही पूर्ण करुन संस्थेची नोंदणी रद्द करणे अनिवार्य झाले आहे.

तरी सदर संस्थेशी कोणतेही येणी-देणी अगर हितसंबंध/दावा/बोजा असल्यास ही नोटीस प्रसिध्द केल्यापासून दिनांक १६.०४.२०२६ पर्यंत सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, चांदूर बाजार यांचे कार्यालयास लेखी स्वरुपात पुराव्यासह सादर करावेत. वरील मुदतीत कोणताही दावा प्राप्त न झाल्यास सदर संस्थेशी कोणाचेही कोणतेही येणी/देणी अगर हितसंबंध/दावा/बोजा नाही अथवा असल्यास त्यांनी तो जाणीवपुर्वक सोडून दिला आहे असे गृहित धरुन अवसायनाची पुढील कार्यवाही पूर्ण केल्या जाईल. सदर संस्थेची अंतिम सर्वसाधारण सभा दिनांक १६.०४.२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, चांदूर बााजर, नवीन प्रशासकीय ईमारत, तहसील कार्यालय परिसर, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती या कार्यालयात घेण्यात येईल. तरी सदर संस्थेच्या सभासदांनी नोंद घेऊन उपस्थित रहावे.

(एस.पी.गवई)
अवसायक,
ज्योतिबा गृहनिर्माण सहकारी संस्था मर्यादित र.नं.६०२, ता.चांदूर बाजार तथा सहकार अधिकारी श्रेणी-२ अंतर्गत सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, चांदूर बाजार



**JIJAU COMMERCIAL CO-OP BANK LTD. AMRAVATI.**
"Jijau" Plot No.33, 34, Walcut Compound, Amravati
Phone No.2560067, 2570056,
Email Id : itm@jijaubank.bank.in | Web site : www.jijaubank.bank.in

**Passbook Printer & Laser Printer Purchasing**

Jijau Commercial Co-Op Bank Ltd. Inviting proposal for purchasing Passbook Printer (PLQ 20/50) & Network Laser Printer (Make Canon, Epson, Brother, HP) for its branches (11 +1). Interested vendor can submit their quotation with unit price on or before 06/04/2026 up to 5 P.M. at Jijau bank head office or email at itm@jijaubank.bank.in.

Chief Executive Officer



## जाहीर नोटीस

**अमरावती येथील ६ वे सह दिवाणी न्यायाधीश, (व.स्तर) श्री.एच.जे.शेंडे यांच्या न्यायालयात**
आर.एम.जे.सी. क्रमांक ६८५/२०२५ ने.ता.२३.०४.२०२६

**अर्जदार** - 1. Kirtika Nitin Mudliyar, Age 32 Yrs. Occu.: Business
2. Mihan Nitin Mudliyar, Age 28 Yrs. Occu.: Business
Both R/o Dr.N.V.Mudliyar Compound Camp, Amravati
-- वि --
**गैरअर्जदार - निरंक**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Shardabai Wd/o Vyankatesh Mudliyar ह्या दिनांक ०६.०२.१९९७ रोजी अमरावती येथे मयत झाल्या आहेत. अर्जदार Smt.Kirtika Nitin Mudliyar and Others यांनी वरीलप्रमाणे ह्या कोर्टात सदरहू मयत Shardabai Wd/o Vyankatesh Mudliyar यांचे वारसा हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 276 OF INDIAN SUCCESSION ACT, 1925 FOR GRANT OF PROBATE OF WILL OF DECEASED Shardabai Wd/o Vyankatesh Mudliyar प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्याचप्रमाणे मयत यांच्या नांवे असलेली सर्व मालमत्ता मृत्यूपत्राप्रमाणे अर्जदार यांचे नांवे करण्याकरीता मयत Shardabai Wd/o Vyankatesh Mudliyar यांनी दिनांक १६.०४.१९९० रोजी मृत्यूपत्र करुन ठेवले आहे, मृत्यूपत्रात नमुद केल्याप्रमाणे

Description of Said Property

Property No.1, mentioned in the Will the portion admeasuring 15,213.91 Sq.Ft. from out of Nazul Plot No.9/1, Sheet No.41, which is mutated in the name of etitioners vide mutation entry No.4345 dated 22.04.2020

त्यापेक्षा अर्जाबाबत कोणास आक्षेप नोंदवायचा असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू मयत Shardabai Wd/o Vyankatesh Mudliyar यांचे वारसा हक्काचे (Probate) प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **३०.०३.२०२६** रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे.

शिक्का
आदेशान्वये,
सहायक अधीक्षक, (न्यायीक विभाग)
जिल्हा व सत्र न्यायालय, अमरावती



**उपविभागीय अधिकारी, अमरावती यांचे कार्यालय**
**क्र. रा.मा.क्र./आर.टी.एस-५९/मासोद-२५/२०२४-२०२५**

## जाहीरनामा

**अपिलार्थी - सौ.वंदना भाऊसाहेब काळे**
**-- विरुध्द --**
**गैरअपिलार्थी - मनिषा सोनी व ईतर**

प्रति,
**गैरअपिलार्थी क्र.**
१. मंडळ अधिकारी, मौजे मासोद, ता.जि.अमरावती
२. तलाठी, मौजे, मासोद, ता.जि.अमरावती
३. मनिषा राजेश सोनी, द्वारा रविंद्र किशोरभाई सोनी, प्रताप चौक, सराफा बाजार, अमरावती, ता.जि.अमरावती
४. आयुषी राजेश सोनी, द्वारा रविंद्र किशोरभाई सोनी, प्रताप चौक, सराफा बाजार, अमरावती, ता.जि.अमरावता
५. प्रियंका राजेश सोनी, द्वारा रविंद्र किशोरभाई सोनी, प्रताप चौक, सराफा बाजार, अमरावती, ता.जि.अमरावती
६. कृष्णा राजेश सोनी, द्वारा रविंद्र किशोरभाई सोनी, प्रताप चौक, सराफा बाजार, अमरावती, ता.जि.अमरावती
७. रविंद्र किशोरभाई सोनी, प्रताप चौक, सराफा बाजार, अमरावती, ता.जि.अमरावती

अपिलार्थी सौ.वंदना भाऊसाहेब काळे, रा.सहकार नगर, अमरावती यांचे वतीने ॲड.व्ही.व्ही.रायबाकर यांनी दाखल केलेल्या अपिल अर्जानुसार मौजा मासोद येथील स.नं.११४ मधील प्लॉट नं.२६, क्षेत्र १९८ चौ.मि. (२१५६.२२ चौ.फुट) बाबत घेतलेला फेरफार नं.४१२८, दिनांक २३.०१.२०१८ ला व्यथील होऊन आपले विरुध्द महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अंतर्गत अपिल अर्ज व कलम २५१ अंतर्गत अपिल दाखल करण्यास झालेला विलंब माफीचा अर्ज दाखल केला आहे.

सदर प्रकरण दिनांक २१.०४.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता उपविभागीय अधिकारी, अमरावती यांचे न्यायालयात सुनावणीकरीता ठेवण्यात आले आहे. तरी या प्रकरणी आपण जबाबासह हजर रहावे.

दिनांक ३०.०३.२०२६

शिक्का
**आदेशान्वये,**
**प्रस्तुतकार-१,**
**उपविभागीय अधिकारी, अमरावती यांचे कार्यालय**



## जाहीर नोटीस

**विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती**
आर.एम.जे.सी.क्र.१५१/२०२६ ने.ता. ०५.०५.२०२६

**अर्जदार :** १. साधना अविनाशराव देशमुख, वय ७४ धंदा - घरकाम
२. संपदा अविनाशराव देशमुख, वय ३० धंदा - शिक्षण
३. शुभम अविनाशराव देशमुख, वय ३२ धंदा - खाजगी नोकरी
सर्व रा.सुरळी, ता.चांदूरबाजार, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मृतक अविनाश पंजाबराव देशमुख** यांचा मृत्यू दिनांक **२६.११.२०२५** रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे झाला असून ते कायमचे रा.सुरळी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथील रहिवाशी होते. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.१५१/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**२७.०३.२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय , चांदूर बाजार



**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.६११/२०२६
**मैनाबाई अधिक तीन -विरुध्द- निरंक**
पुढील ता.०५.०५.२०२६

## जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :** 1. Smt.Mainabai Namdev Ramteke, Age 85Yrs. Occu.: Farming work R/o VTC, Kapustalani, Po.Kapustalani, Tq.Dist.Amravati-444901
2. Yadav Namdev Ramteke, Age 76 Yrs. Occu.: Labour work R/o Sanjay Gandhi Nagar No.2, Stq.Distt.Amravati-444606
3. Smt.Annapurna Dashrat Meshram, Age 72 Yrs. Occu.: Labour work R/o Near Pathre Kirana, Rahatgaon, Tq. Dist. Amravati
4. Pramod Namdevrao Ramteke, Age 56 Yrs. Occu.: Labour work R/o VTC, Rajana, Po.Chandur Rly. Tq. Chandur Rly. Dist. Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Namdev Saduji Ramteke हे दिनांक 21.12.2000 रोजी **रा.कापुसतळणी, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Smt.Mainabai Namdev Ramteke+3 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Smt.Mainabai Namdev Ramteke+3 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०२.०४.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर अमरावती



**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्रीमती एन.सी.सोरटे, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.५४२/२०२६
**श्री.मिलीद अधिक दोन -विरुध्द- निरंक**
पुढील ता.२०.०४.२०२६

## जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :** 1. Milind S/o Shamrao Kothekar, Age 54 Yrs. Occu.: Service R/o Prabha Colony, Bypass Road, Rukhmini Nagar, Amravati-444606
2. Sanjay S/o Shamrao Kothekar, Age 62 Yrs. Occu.: Service R/o 23-B, MIDC, Old Bypass Road, Behind Hotel Kailash, Ganpati Nagar, Rukhmini Nagar, Amravati
3. Vijay S/o Shamrao Kothekar, Age 58 Yrs. Occu.: Service R/o Flat No.19, Gat No.32/6, Atharv B Apartment, Gokuldham Reci, Uttara Nagri Brijwadi, Aurangabad, Dist.Aurangabad

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **शामराव सदाशिवराव कोठेकर** हे दिनांक 01.05.2022 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. व मयत **सुधा शामराव कोठेकर** ही दिनांक **०७.१२.२०२५** रोजी संभाजीनगर येथे मयत झाली. अर्जदार **मिलिंद** +2 विरुध्द निरंक यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **मिलिंद** +2 विरुध्द निरंक वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२३.०३.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर अमरावती



**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.६१४/२०२६
**मिना व ईतर -विरुध्द- निरंक**
पुढील ता.०५.०५.२०२६

## जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :** 1. Meena Jagdish Bajaj, Age 63 Yrs. Occu.: Household
2. Rohan Jagdish Bajaj, Age 21 Yrs. Occu.: Education
Both R/o Zulelal Line, Krishna Nagar, Amravati
3. Sakshi Rajesh Hasrani, Age 34 Yrs. Occu.: Household R/o House No.1867, Jamner Road, Near Bank of India, Anand Nagar Branch, Bamb Colony, Bhusawal, Jalgaon

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **लेखुमल वाधुमल बजाज** हे दिनांक 27.11.1990 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **मिना व ईतर** विरुध्द निरंक यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **मिना व ईतर** विरुध्द निरंक वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **३०.०३.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर अमरावती



**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**विद्यमान श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**
किरकोळ अर्ज क्र.४९७/२०२५
**सरस्वती -विरुध्द- निरंक**
पुढील ता.२४.०४.२०२६

## जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :** १. सरस्वती बाळकृष्ण वानखडे, वय ८३ वर्षे, व्यवसाय - निरंक
२. रोशन अशोक वानखडे, वय २८ वर्षे, व्यवसाय - मजुरी
दोघेही रा.वार्ड नं.२, जावरा, नया अकोला, ता.जि.अमरावती
३. सारिका राहुल पंचाळे, वय ३१ वर्षे, व्यवसाय - घरकाम रा.गधेघाट मागे, खानापूर, ता.मोर्शी, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत अशोक बाळकृष्ण वानखडे** यांचे दिनांक **२७.०१.२०२६** रोजी **अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार सरस्वती व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **सरस्वती व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**१३.०३.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर अमरावती



जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक- प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २०५**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त

### उषा गडपायलेची वर्धा पोलिसांत निवड

**चांदूर रेल्वे** -जिद्द, मेहनत आणि स्वप्नांवरचा अढळ विश्वास असेल तर यश नक्की मिळते, याचा जिवंत पुरावा चांदूर रेल्वे



तालुक्यातील अमदोरी येथील उषा उद्धवराव गडपायले हिने दिला आहे. उषाची वर्धा पोलीस दलात निवड होताच संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून तिची यशोगाथा अनेक विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरली आहे.चांदूर रेल्वे नगरपरिषदेच्या हुतात्मा स्मारक येथील अभ्यासिकेत बसून उषाने दिवस-रात्र एक करत अभ्यास केला. त्याचबरोबर क्रीडा संकुलाच्या मैदानावर नियमित सराव करून तिने स्वतःला शारीरिक व मानसिकदृष्ट्या सक्षम बनवले.उषा आपल्या यशाचे संपूर्ण श्रेय आई-वडील, शिक्षक प्रफुल इंगळे आणि अभ्यासिकेतील सहकाऱ्यांना देते.अमदोरी गावातील पहिली महिला पोलीस बनण्याचा मान उषाला मिळाला असून, ती चांदूर रेल्वे येथील मुलींच्या शासकीय वसतिगृहात राहत होती. अमदोरीसह संपूर्ण चांदूर रेल्वे तालुक्यात तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, तिची ही यशोगाथा अनेक तरुण-तरुणींना मोठी स्वप्ने पाहण्याची प्रेरणा देत आहे.

### राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर आज शहरात

**अमरावती-** राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांचा शुक्रवार दि. ३ एप्रिल रोजी जिल्ह्याच्या दौरा आहे.दौऱ्यानुसार भोयर शुक्रवार, ०३ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता वर्धा येथून वाहनाने अमरावतीकडे प्रयाण. दुपारी १२ वाजता काँग्रेस नगर येथे आगमन व माजी मंत्री श्रीमती वसुधाताई देशमुख यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट. दुपारी १२.३० वाजता संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन मोर्शी रोड, येथे अमरावती विभागीय शिक्षण मेळाव्यास तसेच सत्कार समारंभास उपस्थिती. दुपारी १.३० वाजता सिटी लँड अमरावती येथे साधना सहकारी बँक लि. च्या नविन शाखेचे उद्घाटनास उपस्थिती. दुपारी २ वाजता अमरावती येथून शासकीय वाहनाने वरूडकडे प्रयाण करतील.

# परतवाडा-अमरावती मार्गावर चार्जिंग स्टेशनचे बांधकाम सर्रास सुरू

## नगर परिषद बांधकाम विभागाने बांधकाम परवानगी संदर्भात चौकशी करण्याची मागणी





**अचलपूर/वार्ताहर**

अचलपूर नगर परिषद हद्दीतील परतवाडा - अमरावती मार्गावरील अष्टमसिद्धी गेट समोरील मौजा खेल त्रिंबक नारायण सर्वे क्रमांक ६९/१ मधील सर्वे क्रमांक ५ या प्लॉट वर गेल्या काही दिवसापासून चार्जिंग स्टेशन चे बांधकाम शासकीय नियमांना तिलांजली देत सुरू आहे.या प्लॉट धारकाने बाजूला असलेल्या प्लॉट ची संबंधित मालकांना कोणतीही माहिती न मनमर्जी प्रमाणे झाड,नाली तोडून साफसफाई करून मोठे नुकसान केले आहे.तसेच महावितरण विभागाकडून मंजूर झालेल्या उच्च दाबाची डी. पी आणि विद्युत खांब बाजूला असलेल्या ४ नंबर धारकांच्या हद्दी समोर उभारल्याने भविष्यात कोणतीही अनुचित घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.एवढेच नव्हे तर त्या व्यक्तीने चार्जिंग स्टेशन साठी कोणतीही शासकीय मोजणी न करता चक्क एका खाजगी व्यक्तीकडून मोजणी करीत बाजूला असलेल्या प्लॉट मध्ये सीमा आखणी केल्याने त्या चार्जिंग स्टेशन चा बांधकामाची सखोल चौकशी करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

यासंदर्भात अचलपूर नगर परिषद मुख्याधिकारी धीरजकुमार गोहाड,महावितरण विभागीय कार्यालय अचलपूर चे कार्यकारी अभियंता प्रदीप अंधारे,अचलपूर नगर परिषद बांधकाम आणि नगररचना विभागा कडे लेखी तक्रार केल्याची माहिती मिळाली आहे.

एकीकडे केंद्र शासनाकडून मंजूर झालेल्या या चार्जिंग स्टेशन निर्मिती मध्ये संबंधित व्यक्ती सर्व शासकीय नियमाचे पालन करीत आहे का? या ची कोणती ही तपासणी संबंधित विभागाकडून करण्यात आलेली नाही.याउलट तो व्यक्ती त्या भागात मजुराच्या सहाय्याने बांधकामसाठी खड्डे खोदून बांधकामाचे साहित्य परिसरात आणत आहे.दुसरीकडे महावितरण विभागाकडून त्या चार्जिंग स्टेशन परिसरात खाजगी डी. पी आणि विद्युत खांब,वाहिनी नुकतीच टाकण्यात आली. आणि डी. पी चे विद्युत खांब प्लॉट क्रमांक ४ चा समोर निर्माण केल्याने नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न चव्हाट्यावर आला आहे.या संदर्भात आता महावितरण विभागीय कार्यालय कडून कोणती कारवाई केली जाते? याकडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे.सोबतच खाजगी मोजणी करून प्लॉट क्रमांक ५ चा धारकाने प्लॉट क्रमांक ४ मध्ये मनमर्जी प्रमाणे सीमा आखणी केल्याने प्लॉट धारकांनी नेमके करायचे तरी काय? हा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.यामुळे या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून त्या चार्जिंग स्टेशन संचालकावर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

आमच्या प्रतिनिधीने अचलपूर नगर परिषद मुख्याधिकारी धीरजकुमार गोहाड यांची भेट घेऊन प्रतिक्रिया घेण्याचा प्रयत्न केला असता संपर्क होऊ शकला नाही.मात्र अचलपूर नगर परिषद नगर रचना विभागाने या प्रकरणी संपूर्ण माहिती घेण्याची प्रकिया प्रारंभ केली असल्याची माहिती समोर आली आहे.

या संदर्भात तक्रार प्राप्त झाली आहे.चौकशी करून कारवाई केली जाणार आहे.

**प्रदीप अंधारे,**
कार्यकारी अभियंता,
महावितरण विभागीय
कार्यालय अचलपूर

### उन्हाच्या तीव्रतेसोबत पाणीपुरवठ्यास जीर्ण, जलवाहिन्यांचा अडसर

# अनेक भागांत कमी दाबाने जलवितरण

**अमरावती/का.प्र.**

विदर्भातील वाढत्या उन्हाच्या तीव्रतेसोबतच अमरावती शहरात पाणीपुरवठ्याचा प्रश्न यंदा अधिक पेटण्याची चिन्हे आहेत. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे पुरेशी जलक्षमता उपलब्ध असली, तरी ३० वर्षांहून अधिक जुन्या झालेल्या जीर्ण जलवाहिन्यांच्या मर्यादिमुळे शहराला पूर्ण दाबाने पाणी पुरवणे कठीण झाले आहे. परिणामी, अमृत-२ योजनेचे काम पूर्ण होईपर्यंत म्हणजेच मार्च २०२७ पर्यंत अमरावतीकरांना पाणीटंचाईचा सामना करावा लागण्याची शक्यता आहे.

अमरावती शहर आणि बडनेरा उपनगराला १९९४ मध्ये कार्यान्वित झालेल्या योजनेद्वारे पाणीपुरवठा केला जातो. सध्या शहरात १ लाख ४ हजार अधिकृत ग्राहक असून, त्यांना एक दिवसाआड पाणी दिले जाते. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या जलशुद्धीकरण केंद्राची क्षमता १५६ एमएलडी असली, तरी सध्याच्या वितरिका केवळ १३० एमएलडीपर्यंतचाच भार सोसू शकतात. उन्हाळ्यात मागणी १४५ एमएलडीवर पोहोचण्याचा अंदाज आहे, मात्र दाब वाढवल्यास जीर्ण वाहिन्या फुटण्याची भीती प्रशासनाला सतावते आहे.कुलरचा वाढता वापर आणि घसरलेली भूगर्भीय पाणीपातळी यामुळे पाण्याची गरज १४२ एमएलडीपर्यंत पोहोचली आहे. अनेक भागात पाण्याचा अनिबंध वापर होत असल्याने कृत्रिम टंचाई निर्माण होत आहे. जुन्या दुरुस्तीसाठी लागणाऱ्या वेळेमुळे जलवाहिन्या फुटल्यास त्यांच्या पाणीपुरवठ्याचे कोलमडते.अप्पर वर्धा धरणातून ५८ दलघमी पाण्याचे आरक्षण असून आपण सध्या ४८ दलघमी पाण्याचा वापर करत आहोत. उन्हाळ्याचे नियोजन पूर्ण असून टंचाई भासू दिली जाणार नाही. मात्र, पूर्ण क्षमतेने पुरवठा करण्यासाठी अमृत-२ योजनेतील नवीन वितरिकांचे काम पूर्ण होण्याची प्रतीक्षा करावी लागेल, असे जीवन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.

**एक दिवसाआड पाणी**

अमरावती शहराला महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून एक दिवसाआड पाणीपुरवठा केला जात आहे.उन्हाळा असल्याने पाण्याची गरज जास्त भासत आहे. मात्र, शहरात दिवसाआड पाणीपुरवठा केला जात आहे.तोही नियमित केला जात नसल्याने लोकांची प्रचंड बाराजी आहे.पूर्ण एक तासही नळाला पाणी येत नसल्याचे लोकांचे म्हणणे आहे.शहरातील अनेक भागांत पिण्याचे पाणी कमी दाबाने मिळते.

अमरावती शहर हे 'ड वर्ग' महापालिका क्षेत्रात असून, सध्याची लोकसंख्या ही जवळपास ८ लाख इतकी आहे. शहरापासून ५५ किलोमीटर लांब असलेल्या मोर्शी येथील अप्पर वर्धा धरणाच्या जलाशयातून पाणीपुरवठा करणारी योजना ही १९९४ मधील आहे. त्यानंतर २०१६-२०१७ मध्ये अमृत अभियान अंतर्गत अमरावती शहराकरिता २०३३ ची लोकसंख्या ८ लाख ८३ हजार ९५४ इतकी गृहीत धरून प्रस्तावित करण्यात आली होती. मात्र ती स्थिती आजच निर्माण झाली आहे.

# रुस्तमपूर येथे हनुमान जन्मोत्सव उत्साहात

### शेकडो भाविकांनी घेतला महाप्रसादाचा लाभ



**आसेगाव पूर्णा/वार्ताहर**

चांदूरबाजार व भातकुली तालुक्याच्या सीमेवरील रुस्तमपूर येथील जागृत मारुती देवस्थानात हनुमान जन्मोत्सव मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात संपन्न झाला.रुस्तमपूर येथील हनुमान मंदिर प्राचीन असून 'जागृत देवस्थान' म्हणून पंचक्रोशीत प्रसिद्ध आहे. या मंदिरात हनुमान जन्मोत्सवानिमित्त आसेगाव पूर्णा, टाकरखेडा पूर्णा, विरूळ पूर्णा, हिवरा पूर्णा, पोहरा पूर्णा, पूर्णा नगर व गोविंदपूर परिसरातील भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.उत्सवानिमित्त दोन दिवस विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सर्व जाती-धर्मातील नागरिकांनी उत्सवात सहभाग घेत एकात्मतेचा



संदेश दिला.दरम्यान, मंदिरात महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. सकाळपासूनच भाविकांची मोठी गर्दी दिसून आली. शेकडो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.या उत्सवामुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

# मुंधडा महाविद्यालयात पदवी वितरण समारंभ उत्साहात





**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

शहरातील स्वर्गीय मदनगोपाल मुंधडा महाविद्यालय येथे पदवी वितरण समारंभ मोठ्या उत्साहात, शिस्तबद्ध वातावरणात झाला. हा समारंभ महाविद्यालयाच्या शैक्षणिक परंपरेला अधोरेखित करणारा ठरला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयंत कारमोरे होते. प्रमुख अतिथी म्हणून संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ चे सिनेट सदस्य डॉ. नितीन टाले, चांदूर रेल्वेच्या नगराध्यक्ष प्रा. प्रियंका निलेश विश्वकर्मा, माजी नगरसेवक रवि दीक्षित तसेच डॉ. ज्योती ठाकरे, डॉ. मीनाक्षी भांदकक्कर, प्रा. संजय गवई व प्रा. कांचन मेश्राम मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमापूजनाने आणि विद्यापीठ गीताने करण्यात आली. यावेळी प्रा. प्रियंका विश्वकर्मा यांनी आपल्या भाषणात पदवी वितरण समारंभ हा विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील महत्त्वाचा टप्पा असून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी प्रेरणादायी ठरतो, असे सांगत पदवीधरांना शुभेच्छा दिल्या. डॉ. नितीन टाले यांनी आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांना समाजाभिमुख दृष्टिकोन ठेवून देशाच्या प्रगतीत आपला सहभाग नोंदवण्याचे आवाहन केले. तर शेवटी अध्यक्षीय भाषणात डॉ. जयंत कारमोरे यांनी महाविद्यालयाच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेत विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.या समारंभात कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील तसेच यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ अंतर्गत शिक्षण पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. विद्यापीठात संस्कृत विषयात प्रथम क्रमांक मिळविणारा गुणवंत विद्यार्थी श्याम साखरवाडे याचा विशेष सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. स्नेहा मोरे यांनी केले. प्रास्ताविक डॉ. वासुदेव उईके यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. सुषमा मावंदे यांनी मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. समारंभासाठी प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच तीनही शाखांतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### अवकाळी पाऊसामुळे शेतकऱ्यांचे नुकसान

**बेलोरा-**संध्याकाळी झालेल्या अवकाळी वादळी पाऊस व हवेमुळे बेलोरा राजुरा चिंचोली काळे बराणपुर रिद्धपूर वा ठंडा ग्रामीण परिसरातील शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. सुरुवातीलाच सुलतानी आणि अस्मानी संकटात सापडलेल्या शेतकऱ्याला हमीभाव मिळत नसताना झालेल्या पावसामुळे शेतात उभी असलेली पिके मका,गहू,कांदा,फळांचा राजा आंबा अक्षरशः जमीनदोस झाले आहे. बेलोरा गावानजीक असलेले शशांक दौरे यांच्या शेतातील उभे असलेले कणसे धरलेली मक्याचे पिके संपूर्णतः जमीनदोष झाले तसेच कांदा पिकांचेही आंब्यांचा नुकसान यावेळेस गहू ह्या पिकाचा कापणी हंगाम सुरू असताना गहू ओलावून शेतामध्ये पडलेला आहे. जोराचा पाऊस असल्यामुळे अनेक संत्रा झाडावरील लहान संत्रा फळे तसेच आंब्यावर झाडावरील आंबा फळे खाली पडल्या असल्यामुळे शेतकऱ्यांची अवस्था अतिशय बिकट झालेली आहे.

# कृषी पुरस्काराचे प्रस्ताव सादर करण्यासाठी १५ एप्रिल पर्यंत मुदत वाढ

**अमरावती/का.प्र.**

महाराष्ट्र राज्य हे कृषि उत्पादन व कृषि उद्योग क्षेत्रात देशात अग्रगण्य राज्य म्हणून ओळखले जाते. राज्यामध्ये दरवर्षी शेती व पूरक क्षेत्रात अतुलनीय व उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकरी, महिला, व्यक्ती तसेच संस्थांचा सन्मान महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत करण्यात येतो. यामध्ये डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न, वसंतराव नाईक कृषिभूषण, जिजामाता कृषिभूषण, वसंतराव नाईक शेतीमित्र, वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी, उद्यानपंडित पुरस्कार, कृषिभूषण (सेंद्रिय शेती), युवा शेतकरी पुरस्कार तसेच कृषी विभागातील अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठीचा पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी सेवारत्न पुरस्कार इत्यादी पुरस्कारांचा समावेश आहे. हे पुरस्कार महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल यांच्या शुभहस्ते प्रदान करून संबंधितांना सन्मानित करण्यात येते

यापूर्वी विविध कृषी पुरस्कारांचे प्रस्ताव चार प्रतींमध्ये ऑफलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येत होते. प्रस्ताव बनविण्यासाठी व आवश्यक कागदपत्र जमा करणेसाठी होणारा त्रास व लागणारा खर्च यामुळे सर्व इच्छुक शेतकरी अर्ज करू शकत नव्हते. या पारंपारिक पद्धतीमुळे प्रस्ताव सादरीकरण, पडताळणी व संकलनासाठी अधिक कालावधी लागत होता. या पार्श्वभूमीवर पुरस्कार प्रस्तावांची प्रक्रिया अधिक सुलभ, वेळबद्ध, पारदर्शक व प्रभावी करण्याच्या दृष्टीने कृषी विभागामार्फत पुरस्कार प्रस्ताव ऑनलाईन स्वरूपात स्वीकारण्यासाठी स्वतंत्र संगणकीय प्रणाली विकसित करण्यात आलेली आहे. सदर प्रणाली कृषी विभागाच्या संकेतस्थळावर (https://krishi.maharashtra.gov.in) कृषी पुरस्कार टॅब मध्ये उपलब्ध आहे.

या संगणकीय प्रणालीच्या माध्यमातून पुरस्कार प्रस्ताव सादरीकरण, तपासणी, मूल्यांकन तसेच अहवाल निर्मिती ही संपूर्ण प्रक्रिया डिजिटल स्वरूपात राबविणे शक्य होणार आहे. यामुळे पुरस्कार प्रक्रियेची कार्यक्षमता, विश्वासार्हता व परिणामकारकता अधिक बळकट होणार आहे.

इच्छुक शेतकरी, व्यक्ती, संस्था, गट यांना सन २०२५ करीता विविध कृषी पुरस्कार बाबतचे अर्ज ऑनलाईन संगणक प्रणालीद्वारे सादर करणेची अंतिम मुदत दि.३१ मार्च २०२६ होती. परंतु दहत्म्हा प्रणालीचे पहिलेच वर्ष तसेच शेतकऱ्यांना पुरस्कारासाठी आवश्यक असलेला जिल्हा पोलीस अधिक्षक यांचेकडील चारित्र्य पडताळणी दाखला प्राप्त करून घेण्यास लागणारा कालावधी या कारणास्तव काही अर्ज शेतकरी स्तरावर प्रलंबित असल्याचे निदर्शनास येत आहे. यामुळे शेतकरी स्तरावरून व क्षेत्रीय स्तरावरून सदरची मुदत वाढवून मिळणेबाबत होत असलेल्या मागणीच्या अनुषंगाने सन २०२५ करीता विविध कृषी पुरस्कार बाबतचे अर्ज ऑनलाईन संगणक प्रणालीद्वारे सादर करणेस कृषी विभागाकडून मुदतवाढ देण्यात आलेली असून अंतिम मुदत दि.१५ एप्रिल २०२६ करण्यात येत आहे.

तरी इच्छुक शेतकऱ्यांनी वरील नमूद मुदतीत अर्ज करण्याबाबतचे आवाहन कृषी विभागाव्दारे करण्यात आले आहे. या अनुषंगाने इच्छुक उमेदवारांनी विविध कृषी पुरस्कार बाबतचे त्यांचे अर्ज ऑनलाईन संगणक प्रणाली द्वारे

कृषी विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर १५ एप्रिल पर्यंत सादर करावे, असे आवाहन कृषी संचालक यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

# शासनाच्या स्थगितीनंतरही ग्रामीण भागात कर्जवसूलीचा तगादा

**अंजनगाव बारी/वार्ताहर**

मागील वर्षी अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी महाराष्ट्र सरकारने जाहीर केलेली कर्जवसुली स्थगिती प्रत्यक्षात ग्रामीण भागात प्रभावी ठरत नसल्याचे चिंताजनक चित्र दिसत आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांकडून बँकांनी कर्ज वसुली न करणे, थकबाकी नोटीस न पाठवणे आणि खाते NPA मध्ये न टाकणे असे स्पष्ट निर्देश असूनही अनेक प्राथमिक सहकारी संस्था बँका तगादा लावत असल्याच्या तक्रारी वाढत आहेत.

**अतिवृष्टीमुळे झालेले नुकसान- घोषणांनंतरही दिलासा नाही**

गतवर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे सोयाबीन, कापूस, तूर, भाजीपाला तसेच फळबागांचे मोठे नुकसान झाले. राज्य सरकारने नुकतीच या शेतकऱ्यांसाठी कर्जवसुलीवरील स्थगिती जाहीर केली असली, तरी अनेक खातेदारांना अद्याप वसुली नोटीस, व्याज भरण्याची मागणी आणि जबरदस्तीचा तगादा सहन करावा लागत आहे.

बँक कर्मचाऱ्यांकडून 'मुख्यालयाकडून आदेश नाहीत', 'सिस्टीम अपडेट नाही', 'स्थगिती फक्त काही खात्यांना लागू आहे' अशा कारणांवर वसुलीचा दबाव आणला जात असल्याचे शेतकरी सांगत आहेत.

**कर्जमाफी प्रक्रियेबाबत मुख्यमंत्र्यांची घोषणा**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकत्याच केलेल्या कर्जमाफी घोषणेत ३० जून २०२६ पर्यंत समग्र कर्जमुक्ती प्रक्रिया पूर्ण करण्याचे लक्ष्य जाहीर केले आहे. सरकारने



अर्थसंकल्पात २ लाखांपर्यंतची कर्जमाफी आणि नियमित कर्जफेड करणाऱ्यांना ५०,००० पर्यंत प्रोत्साहन जाहीर केले आहे. दरम्यान, शासनाकडून अद्याप बँकांचा एकत्रित डेटा मागवण्यात येत असून पात्रतेचे अंतिम निकष एका उच्चस्तरीय समितीद्वारे निश्चित करण्यात येणार आहेत. यामुळे प्रत्यक्ष लाभ मिळण्यास विलंब होणार असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत.

**शेतकऱ्यांची कोंडी**

'नेमके कोणावर विश्वास ठेवायचा?'-शेतकरी संभ्रमात आहेत. त्यांच्या मते 'सरकार स्थगिती सांगते, पण बँकांचे फोन, नोटिसा सुरूच आहेत. आम्ही कोणावर विश्वास ठेवायचा? नुकसान भरून निघाले नाही, त्यात बँकेचा तगादाष्ठ आम्ही कुठे जाणार?'काही शेतकऱ्यांवर व्याज जमा करण्याची सक्ती, खाते बंद करण्याचा दबाव, तर काहींना नवीन कर्ज नाकारल्याच्या तक्रारीही समोर येत आहेत. अनेक शाखांना शासन निर्णयाची अधिकृत प्रत वेळेवर मिळाली नसल्याचे बँक अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. स्थगितीची अंमलबजावणी स्पष्ट नसल्याने काही शाखा जोखीम टाळण्यासाठी सर्व ग्राहकांना तगादा लावत असल्याचेही उघड झाले आहे.

**शेतकरी संघटनांचा निषेध कारवाईची मागणी**

शेतकरी संघटना, ग्रामपंचायतींचे पदाधिकारी व इतर संस्थांनी या कारवाईचा जोरदार निषेध नोंदवला आहे. तहसील कार्यालय, जिल्हाधिकारी आणि विभागीय निबंधकांकडे तक्रारी दाखल करण्यात येत असून स्थगिती सर्व बँकांना सक्तीने लागू करावी तगादा लावणाऱ्या शाखांवर कारवाई करावी व्याज आणि वसुलीचा दबाव तात्काळ थांबवावा अशा मागण्या करण्यात येत आहेत. काही संघटनांनी पुढील आठवड्यात मोर्चाचा इशाराही दिला अधिकृत प्रतिसादाची प्रतीक्षा जिल्हा प्रशासनाकडून अद्याप कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही. तज्ज्ञांचे मत आहे की स्थगितीची काटेकोर अंमलबजावणी व्हावी, यासाठी सर्व बँकांना बंधनकारक असे सविस्तर शासन परिपत्रक तातडीने जारी होणे अत्यावश्यक आहे. शासनाने जाहीर केलेल्या स्थगिती आणि कर्जमाफीच्या आश्वासनांनंतरही बँकांचा तगादा कायम राहिल्याने प्रत्यक्ष दिलासा शेतकऱ्यांच्या हातात पोहोचत नाही. कर्जमाफीची प्रक्रिया सुरू असताना वसुलीचा दबाव कायम राहिल्यास शेतकऱ्यांचा त्रास वाढण्याची भीती असून शासनाने सुस्पष्ट आणि कठोर आदेश जारी करून तात्काळ हस्तक्षेप करण्याची गरज आहे.

# ‘नोटीसवर नोटीस’ ४७.६३ कोटींची वसुली अजूनही रखडलेलीच !

## तहसीलदारांचा ‘नोटीस बॉम्ब’ फुटणार का ?

### गाजीपूर अवैध उत्खनन प्रकरण

**समीर ठाकूर**

**अकोला** : अकोट तालुक्यातील गाजीपूर येथील अवैध गौण खनिज उत्खनन प्रकरणात आता प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. २०२४ मध्ये संतोष लुणकरण चांडक आणि विलास काल्‌ू चिमोटे यांच्यावर कोट्यवधींचा दंड ठोठावण्यात आला होता. या कारवाईविरोधात चांडक यांनी उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठात याचिका दाखल केली होती.

उच्च न्यायालयाने ९ ऑक्टोबर २०२५ रोजी याचिका निकाली काढताना स्पष्ट निर्देश दिले होते की, संबंधित प्रकरणात ४ आठवड्यांच्या आत प्राधिकरणाकडे अपील दाखल करावी. मात्र, विहित मुदतीत अकोट एसडीओ कार्यालयात कोणतीही अपील दाखलच झाली नाही. त्यामुळे पुढील कायदेशीर कारवाईचा मार्ग मोकळा झाला होता.

याच पार्श्वभूमीवर अकोट एसडीओ यांनी २३ फेब्रुवारी २०२६ आणि १० मार्च २०२६ रोजी अकोट तहसीलदारांना लेखी स्मरणपत्र पाठवून स्पष्ट निर्देश दिले होते की, हायकोर्टाच्या आदेशानुसार अपील न झाल्याने दंडाची रक्कम सक्तीने वसूल करावी, आरसीसी (Recovery Certificate Case) ओपन करून कारवाई करावी आणि त्याचा अहवाल जिल्हाधिकारी अकोला तसेच एसडीओ कार्यालयाला सादर करावा. मात्र, या स्पष्ट आदेशानंतरही तातडीची कारवाई होणे अपेक्षित असताना, प्रत्यक्षात तसे घडले नाही. उलट, सुमारे १५ दिवसांचा विलंब होऊ देत अकोट तहसीलदारांनी २५ मार्च २०२६ रोजी केवळ संतोष चांडक यांनाच कसूरदार मागणीची नोटीस बजावली. कोट्यवधींच्या या प्रकरणात थेट आरसीसी ओपन करून जप्तीची प्रक्रिया सुरू करण्याऐवजी पुन्हा नोटीस देण्याचा मार्ग अवलंबण्यात आल्याने प्रशासनाचा हेतूच संशयास्पद ठरत आहे.

#### ‘पाठीशी घालत नाही; पुढे जप्तीची कारवाई होईल’

या प्रकरणी अकोट तहसीलदार चव्हाण यांनी सांगितले की, संतोष चांडक यांना कुठल्याही प्रकारे पाठीशी घातले जात नाही. त्यांना नियमानुसार कसूरदार मागणीची नोटीस बजावण्यात आली आहे. दिलेली मुदत संपल्यानंतर पुन्हा नोटीस देण्यात येईल, त्यांच्या मालमत्ता शोधण्याचे काम सुद्धा सुरू आहे. त्यानंतर मालमत्ता जप्ती व इतर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

#### हायकोर्ट आदेशानंतरही मुदतीत अपील नाही-

उच्च न्यायालयाने अपीलसाठी मुदत दिल्यानंतरही अपील दाखल झाले नाही. त्यानंतर एसडीओने सक्तीच्या वसुलीचे स्पष्ट निर्देश दिले. तरीही आरसीसी ओपन न करता पुन्हा नोटीस देण्यात आली. त्यातही फक्त एका व्यक्तीला नोटीस, दुसऱ्याला वगळणे - या सर्व घडामोडींमुळे प्रकरणात हेतुपुरस्सर विलंब आणि निवडक कारवाईचा संशय बळावत आहे.

यातील सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, या प्रकरणात सुरुवातीपासूनच दंडाची कारवाई दोघांवर अर्थात संतोष चांडक आणि विलास काल्‌ू चिमोटे यांच्यावर करण्यात आली होती. मात्र, २५ मार्च रोजी बजावलेल्या नोटीसमध्ये केवळ चांडक यांनाच लक्ष्य करण्यात आले, तर चिमोटे यांना नोटीस का पाठविण्यात आली नाही ? हा मोठा प्रश्न उपस्थित झाला आहे. दोघेही एकाच प्रकरणातील जबाबदार असताना, एकावर कारवाई आणि दुसऱ्यावर मौन - यामागे नेमके कोणते ‘गणित’ आहे, की पुन्हा एकदा अपिलार्थी साठी हायकोर्टात जाण्याचा रस्ता मोकळा करण्यात आला आहे का ? याबाबत संशय व्यक्त केला जात आहे.

दरम्यान, या प्रकरणात एसडीओ कार्यालयात पुन्हा एकदा अपील याचिका दाखल झाल्याची चर्चा सुरू असून, त्याच आडून कारवाईला विलंब केला जात आहे का, असा सवाल उपस्थित होत आहे. एकीकडे हायकोर्टाचे स्पष्ट आदेश, त्यानंतर एसडीओचे लेखी निर्देश, तरीही आरसीसी ओपन न होणे आणि प्रत्यक्ष वसुली न होणे, ही बाब केवळ प्रशासकीय ढिलाई म्हणून पाहता येत नाही, असे जाणकारांचे स्पष्ट आणि रोखठोक मत आहे.

दरम्यान, ज्या ठिकाणी अवैध उत्खनन उघड झाले त्या परिसरात संबंधित फर्मचा व्यवसाय सुरू असल्याची चर्चा असून, प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे खदान माफियांचे मनोबल वाढत असल्याचे चित्र आहे. दंड ठोठावला, नोटीस दिली, पण अंमलबजावणी नाही हीच परिस्थिती सध्या अकोटमध्ये दिसत आहे.

एकूणच, गाजीपूर अवैध उत्खनन प्रकरणात आता हायकोर्टाचे आदेश, एसडीओचे निर्देश आणि महसूल यंत्रणेची अंमलबजावणी यांच्यातील विसंगती उघड झाली आहे. कोट्यवधी रुपयांचा महसूल थकित असताना देखील ठोस कारवाई होत नसल्याने प्रशासनाच्या विश्वासार्हतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आता तरी आरसीसी ओपन करून थेट जप्तीची कारवाई होणार का, की ‘नोटीसवर नोटीस’ देत हा प्रशासकीय खेळ सुरूच राहणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# मद्यधुंद दुचाकीस्वारांमुळे अपघात; चौघे गंभीर जखमी

## शेंदुरजना घाट परिसरातील घटना




**अमरावती/प्रतिनिधीः-** दारूच्या नशेत आणि भरधाव वेगात चालवलेल्या दुचाकीमुळे शेंदुरजना घाट परिसरात बुधवारी दि. १ एप्रिल रोजी भीषण अपघात घडला. धनोडी फाट्याजवळ दुपारी साडेतीन ते चार वाजताच्या सुमारास दोन दुचाकींची समोरासमोर जोरदार धडक होऊन चार जण गंभीर जखमी झाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, सलीम शहा हमीद शहा (वय ४३, रा. आमनेर) आणि हमीदाबी नाजीम शहा (वय ३०, रा. शेंदुरजना घाट) हे शेंदुरजना घाटहून वरुडकडे जात असताना समोरून ☞(पान २ वर)

# चाकू हल्ल्यात दोघे जखमी

## नागपुरी गेट हद्दीत घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** नागपुरी गेट पोलीस ठाणे हद्दीत दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये चाकू हल्ल्यात दोघे जखमी झाल्याची ☞(पान २ वर)





# चाकूचा धाक दाखवून ट्रकसह २५० क्विंटल तूर लंपास

## -दर्यापूर बाजार समितीत विकला काही शेतमाल
## -यवतमाळच्या लोहारा पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल



**खल्लार/प्रतिनिधीः-** एका ट्रक मालकाला चाकूचा धाक दाखवून थेट एमआयडीसी परिसरातून ट्रक सहित २५० क्विंटल तूर लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली होती. या घटनेसंदर्भात यवतमाळच्या लोहारा पोलिस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता. लोहारा पोलिसांनी तक्रारीच्या आधारे गुन्ह्याचा तपास सुरू केला असता सदर शेतमाल तूर २५० क्विंटल विविध बाजार समितीमध्ये आरोपींनी विकल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.

लोहारा पोलिसांनी या घटने संदर्भात सखोल तपास करुन दोन आरोपींना ताब्यात घेतले असून त्या आरोपीकडून विचारपूस केल्यानंतर काही शेतमाल हा मुर्तीजापूर,कारंजा व दर्यापूर कृषी उत्पन्न बाजार समिती येथे टोळे ट्रेडर्स यांच्याकडे विकल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाले आहे. तर या आरोपींनी आणखी सुद्धा बाजार समितीमध्ये चोरीचा शेतमाल विकला असल्याचे उघडकीस आले आहे. जवळपास २० लाखाचा मुद्देमाल असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे . दर्यापूर बाजार समितीत गुरुवारी दुपारी लोहारा पोलिस दाखल झाल्यानंतर एकच खळबळ उडाली होती. घटनास्थळी व्यापारी अडते व शेतकऱ्यांची☞(पान २ वर)

# घरगुती गॅसचा तुटवडा, पहाटेपासूनच रांगा

## शितल गॅस एजन्सीचा बेफिकीर कारभार कधी थांबणार!

**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर तालुक्यात सध्या घरगुती गॅसचा तीव्र तुटवडा निर्माण झाला असून, सामान्य नागरिकांचे हाल अक्षरशः असह्य झाले आहेत.



■ सध्या गॅस सिलेंडरचा मुबलक साठा असल्यामुळे सिलेंडर ग्राहकांना पॅनिक होऊन सिलेंडर बुकिंग न करण्याचे आवाहन करण्यात आलेले आहे तसेच गॅस एजन्सीना वेळोवेळी भेटी देण्यात येत आहे आणि ग्राहकांना कुठल्याही प्रकारची गैरसोयीचा सामना करायला लागू नये यासाठी तालुक्यातील गॅस एजन्सीना सूचना देण्यात आल्या आहेत.

**-वैभव महाजन,** पुरवठा अधिकारी, दर्यापूर

रोजच्या जिवनातील अत्यावश्यक असलेला गॅस सिलेंडर मिळवण्यासाठी नागरिकांना पहाटेपासूनच रांगेत उभे राहावे लागत आहे. तासन्तास उन्हात थांबूनही अनेकांना रिकाम्या हाताने परतावे लागत असल्याने संतापाची लाट उसळली आहे.

सरकारचे नियोजन नसल्याने नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.आजही दर्यापूर येथे गॅसचा पूर्णता तुटवडा आहे.

**-खासदार बळवंत वानखडे,** अमरावती

विशेष म्हणजे, या गंभीर परिस्थितीकडे शितल गॅस एजन्सी मात्र पूर्णपणे☞(पान २ वर)

# रघुवीर मिठाईच्या सातव्या शाखेचा थाटात शुभारंभ

## -५५ वर्षांची परंपरा

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरासह जिल्हा आणि विदर्भात सुप्रसिद्ध रघुवीर मिठाईच्या सातव्या शाखेचा आज गुरुवार २ एप्रिल रोजी हनुमान जयंती निमित्त थाटात शुभारंभ करण्यात आला. इंदिराबेन आडतिया आणि हंसाबेन पोपट ☞(पान २ वर)





# धामणगावात हनुमान जयंती साजरी

## नगराध्यक्षा अर्चना अडसड-रोठे यांनी घेतले हनुमानाचे दर्शन

**धामणगाव रेल्वे/प्रतिनिधीः-** संकटमोचन, बलोपासनेसह बुद्धीची देवता असलेल्या महाबली हनुमानाची जयंती पवनपुत्र हनुमान की जय, संकटमोचन हनुमान की जय, अशा घोषणांनी तालुक्यात साजरी करण्यात आली.

नगराध्यक्षा अर्चना अडसड - रोठे यांनी हनुमानाचे भक्ती भावाने दर्शन घेतले आहे.

धामणगाव शहरातील टिळक चौक येथील जागृत हनुमान मंदिर, हिरापुरातील पुरातन मारुती मंदिर, तरोडा येथील सर्वेश्वर मंदिर, सर्वोदय कॉलनी येथील हनुमान मंदिर, कोष्टी खेड्यातील हनुमान मंदिर , नेहरू मैदान येथील मारुती मंदिर, भगतसिंग चौकातील रामदेव बाबा मंदिरा☞(पान २ वर)



# जळकापट येथे हनुमान जयंतीला भक्तीचा महासागर

## बैलांशिवाय ओढल्या दहा गाड्या



**अमरावती/प्रतिनिधीः-** आधुनिक युगातही श्रद्धेचा प्रभाव कायम असल्याचे जिवंत उदाहरण धामणगाव रेल्वे तालुक्यातील जळकापट येथे हनुमान जयंती निमित्त पहायला मिळाले.☞(पान २ वर)

# हनुमंत रायाच्या भक्तीत अंबानगरी तल्लीन

## -मंदिरात दर्शनासाठी भक्तांची मांदियाळी












**अमरावती/प्रतिनिधीः-** अंजनीसूत व राम भक्त हनुमानाचा जन्मोत्सव आज गुरुवार २ एप्रिल रोजी सर्वत्र आनंदाने साजरे करण्यात आला. सकाळ पासूनच शहरातील सर्व हनुमान मंदिरामध्ये भक्तांची मांदियाळी होती. जय हनुमान ज्ञान गुण सागर... संकटमोचन नाम तिहारो... अंजनीच्या राया...सह गाणी आणि हनुमान चालीसा पाठ सर्वत्र ऐकायला मिळत होता. जागोजागी महाप्रसाद ही आयोजित करण्यात आला होता. हनुमान जयंती निमित्त अपार उत्साह भक्तांमध्ये होता. विविध आयोजन मंदिरामध्ये करण्यात आले होते. हनुमानाची पूजा अभिषेक आणि आरती सर्वत्र करण्यात आली. सकाळी ६ वाजता थाटात जन्मोत्सव सोहळा पार पडला. यावेळी जागोजागी सामूहिक हनुमान चालीसा पठण करण्यात ☞(पान २ वर)

## उडाणपुलाच्या कामात निष्काळजीपणा;

# ठेकेदाराविरुद्ध गुन्हा दाखल

### लोखंडी प्लेट डोक्यावर पडून मजुराचा मृत्यू झाल्याचे प्रकरण

**मोर्शी/प्रतिनिधीः-** मोर्शी तालुक्यातील रिध्दपूर येथील रेल्वे गेटजवळ उडाणपुलाच्या बांधकामादरम्यान घडलेल्या गंभीर अपघातात एका मजुराचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना १ एप्रिल २०२६ रोजी घडली आहे. बांधकामादरम्यान लोखंडी प्लेट डोक्यावर पडल्याने हा अपघात झाला असून, याप्रकरणी ठेकेदाराविरुद्ध निष्काळजीपणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ईश्वर उदयभानजी भुरभुरे (वय ४२, रा. दाभेरी, ता. मोर्शी) हे आपल्या एका सहका-यासोबत घरगुती सिलेंडर आणण्यासाठी चांदूर बाजार येथे मोटारसायकलने जात असताना रिध्दपूर येथील उडाणपुला☞(पान २ वर)

# वर्षा लड्ढा महापालिका आयुक्त, तर सत्यम गांधी जिप चे नवे सीईओ

**अमरावती/प्रतिनिधीः-** राज्य शासनाने गुरुवारी (दि.२) भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश निर्गमित केले आहेत. यात अमरावती जिल्ह्याला दोन नवीन वरिष्ठ अधिकारी मिळाले आहेत. वर्षा लड्ढा यांची अमरावती महानगरपालिकेच्या आयुक्तपदी, तर सत्यम गांधी यांची अमरावती जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी नियुक्ती करण्यात आली आहे.अमरावती महानगरपालिकेच्या आयुक्त सौम्या शर्मा-चांडक☞(पान २ वर)



# सामूहिक अत्याचार प्रकरणातील आरोपींवर कठोर कारवाई करा

## भाजप पदाधिका-यांची पोलीस आयुक्तांकडे मागणी

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील भानखेडा मार्गावर तरुणीवर सामूहिक अत्याचार करण्यात आला. ही घटना संतापजनक व निंदनीय असून, यामुळे संपूर्ण शहरात भीतीचे व संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे घटनेतील आरोपींविरुद्ध कठोर कारवाई करण्यात यांवी अशी मागणी भाजपाच्या वतीने पोलीस आयुक्त राकेश ओला यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, अशा प्रकारच्या अमानुष ☞(पान २ वर)

